# माणूस

शनिवार । २० जानेवारी १९७९ । ७५ पैसे

राजकीय विरोधकांच्या आणि निष्पाप नागरिकांच्या रक्तानं डागाळलेलं शहांचं मयूरसिंहासन गदगदा हलू लागलंय ......

प्रत्यक्ष ज्यांच्या कुटुंबातले बळी या रक्ताहुतीत पडले, त्या इराणी विद्यार्थ्यांशी बातचीत केल्यावरती हेच जाणवलं की ...

कोणत्याही क्षणी शहा देश सोडून चालता होईल.

पण त्यामुळे इराणच्या समस्या सुटणार नाहीत. ... आधुनिकीकरणाचा लादलेला वेग न पेलणारी पण जुन्या संस्कृती व रुढींमध्येही रमू न शकणारी इराणी जनता आज एका धोक्याच्या वळणावर उभी आहे.

आर्थिक समस्यांपेक्षाही इराणचं राजकीय आणि सामाजिक भवितव्य अधिक अंधःकारमय आहे. इथल्या समाजात असा एक आत्मसंदेह निर्माण झाला आहे, की त्यामुळे या समाजाची लयच बिघडली आहे.

**आपल्या देशाचा प्रजासत्ताकदिन**
**साजरा होत असतानाच**
**एका मावळत्या राजसत्तेचे**
**केलेले विश्लेषण....**

---

## माणूस : यापुढील अंक

---

## इराण विशेषांक

---

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक चौतिसावा
२० जानेवारी १९७९
मूल्य ७५ पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९


# उद्योगपतींनी इशारा दिलेला आहे....

**श्री. ग. मा.**

प्रसिद्ध उद्योगपती श्री. गोदरेज यांच्यावर झालेल्या खुनी हल्ल्याचा सार्वत्रिक निषेध झाला तो योग्यच म्हटला पाहिजे. मालकवर्गाने एकमुखाने निषेध व्यक्त करणे स्वाभाविकच होते; पण कामगारवर्गाचे नेतेही या निषेधात सामील होते हे विशेष आहे. शासनानेही या घटनेची गंभीर दखल घेतली असावी असे दिसते. गृहराज्यमंत्री श्री. भाई वैद्य यांनी 'मिसा' लागू करण्याची सूचना एरवी याच वेळी केली नसती. मजूरमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांची मुलाखत या अंकी आलेली आहे. ती शासनाचा याबाबतचा निर्धार पुरेसा स्पष्ट करणारी आहे. हिंसाचाराचा कडक बंदोबस्त व्हायला हवा, अशी मागणी बहुतेक वृत्तपत्रांनीही केली आहे व सर्वसाधारण लोकमतही अशा उपाययोजनेला अनुकूलच आहे. दत्ता सामंतांचा जामिनकीचा अर्ज फेटाळून न्यायालयानेही याबाबत आपण मागे नाही, हेच सिद्ध केले आहे. घटनाच तशी औद्योगिक जगताला हादरा देणारी आहे. तिचे साद-पडसाद असे तीव्र स्वरूपात नसते उमटले तरच आश्चर्य होते. शासन, उद्योगपती, कामगारसंघटना यांनी एकत्र येऊन काही उपाययोजना नक्की केली, तिची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली तरच अशा घटना पुन्हा होणार नाहीत. एरवी दहशतवाद सर्व क्षेत्रात वाढतोच आहे. औद्योगिकक्षेत्र त्यापासून अलिप्त राहणे कठिण आहे. परस्पर दोषारोपांनी प्रश्न सुटण्याऐवजी चिघळण्याचीच शक्यता अधिक आहे आणि प्रश्न असा चिघळत गेला तर त्याचे राजकीय परिणामही फार धोकादायक आहेत. लोकशाहीवरचा लोकांचाच विश्वास उडेल आणि हुकूमशाहीची मागणी सर्व थरांतून डोके वर काढील. सर्व थरांतून एखादी मागणी पुढे येऊ लागली तर तिला आवर घालणे कुठल्याही सत्तेला अशक्य ठरते, हा तर नेहमीचा, सर्व ठिकाणचा अनुभव आहे. हा अनुभव आपल्याला येणार नाही, या आशावादात काही तथ्य नाही शेवटी सुरक्षितता सर्वांनाच हवी असते. अनिर्बंध स्वातंत्र्य, विस्कळित समाजजीवन ही स्थिती वर्षानुवर्षे चालू शकत नाही. उद्योगधंदे याविरुद्ध प्रथम आवाज उठवतात आणि हळूहळू त्यांना प्रवक्तेही लाभतात. गोदरेज घटनेनंतर या दिशेने वारे वाहू लागले नसतीलच असे सांगवत नाही. मुंबईची उद्योगपतींची १२ जानेवारीला झालेली सभाच या दृष्टीने बोलकी आहे. ' सत्तेच्या खेळात गर्क झाल्यामुळे, कायदा-सुव्यवस्था राखण्याचे मूलभूत कर्तव्य बजावण्यात सध्याचे सरकार असमर्थ ठरत असल्याचे खेदजनक चित्र त्वरित बदलले गेले नाही तर, या लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा विचार जनतेला करावा लागेल! ' असा कडक इशारा या उद्योगपतींनी एका ठरावान्वये शासनाला या सभेत दिलेला आहे. एका वक्त्याने तर शांतता – सुव्यवस्थेची हमी मिळेपर्यंत कुठल्याही ' राजकारण्याला ' निवडणुकीसाठी निधी द्यायचा नाही अशी शपथ घेण्याचे आवाहन व्यापारी-उद्योपतीवर्गाला या सभेत केले. या आवाहनाला खरोखरच पाठिंबा मिळाला तर आपली लोकशाही किती दिवस टिकू शकेल?

निवडणुका खर्चिक असतात व अगदी लोकप्रिय नेत्यांनाही निवडणूक-खर्चासाठी व्यापारी-उद्योगपतींचे साहाय्य घ्यावे लागते. किती काळ असे साहाय्य करणाऱ्या वर्गाचे दडपण राजकारण्यांना टाळता येतील ?

शिवाय वस्तुस्थिती अशी आहे की, मनापासून या वर्गाने जनता पक्षाला आपला पाठिंबा अद्याप दिलेला नाही. जनता पक्ष हा बड्या भांडवलदारांचा पक्ष आहे, अशी टीका धंदेवाईक डाव्या पुढाऱ्यांकडून वरचेवर होत असली, तरी खरोखरच खेड्यातल्या व शहरातल्या लहान-मध्यम घटकांच्या बळावर हा पक्ष उभा आहे. लहान शेतकरी, मध्यमवर्ग यांना इंदिरा गांधींची हुकुमशाही असह्य वाटली आणि त्यांनी इतर घटकांचे साहाय्य मिळवून शेवटी ती उखडून टाकली. इतर घटकांनी सहकार्य केले तरी अद्याप या घटकांना हा पक्ष आपलासा वाटत नाही, ही वस्तुस्थिती आहे. या पक्षाची ध्येयधोरणे, नेतृत्व यावर मध्यमवर्गीय आदर्शांची छाप अगदी स्पष्टपणे उमटलेली आहे. आजवर या वर्गाने मास्तरकी-कारकुनी केली, दुकानदारीत पैसा मिळवला. खेड्यातले आपले लहानसे शेत नांगरून तो कसाबसा आपला उदरनिर्वाह करीत होता. जनता पक्षामुळे या वर्गाच्या हाती प्रथमच सत्ता आली. दिल्लीत पूर्णपणे, मुंबईत अर्धी-मुर्धी. आजवर सत्तेचा उपभोग घेतलेल्या वर्गांना हे नवे सत्तान्तर मानवलेले नाही. तसे ते कोणालाच कधी मानवत नसते. सत्ता गेलेली मानवणे हे मनुष्यस्वभावाला सोडून आहे. खांडेकरांच्या कादंबरीतल्या नायकाने, सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलाने किंवा हेडगेवारांच्या गटप्रमुखाने खेड्यात जाऊन शाळा चालवावी, तुरुंगात जावे, त्याग-सेवा करावी. यासाठी त्याचा गौरवही व्हावा; पण त्याने सत्तेला भिडावे? राज्याची स्वप्ने पाहावीत ? शासन ताब्यात घ्यावे ? मंजूर नाही. हे होणे नाही. हे त्याचे काम नव्हे, अशी इतर घटकांची या नव्या जनता शासनाबाबत वृत्ती आहे आणि संधी मिळताच हे मध्यमवर्गीय शासन खाली खेचण्यासाठी सगळे एकत्र आले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. 'पॅरिस कम्युन' हा कामगारांनी, मळके कपडे घालणाऱ्यांनी प्रथमच सत्ता हाती घेण्याचा गेल्या शतकातला फ्रान्समधला प्रयोग होता. दोनच महिन्यांत या प्रयोगाचा शेवट झाला. का ? इतर वर्गांना कामगारांनी अशी सत्ता हाती घेणे, कामगारांनी राज्यकर्ते होणे मंजूरच नव्हते. वर्गाचे संदर्भ वेगळे असले तरी तशी काहीशी परिस्थिती आपल्याकडे या जनता शासनाबाबत आजही आहे. उद्योगपती, वरिष्ठ नोकरशाही, श्रीमंत जमीनदार, थोडक्यात समाजातला एक अगदी वरचा थर आपापसात आजवर सत्तेचे वाटप करून शासन चालवीत होता. भारतीय जनताही या वाटपावर सर्वसाधारणपणे खूष होती. इंदिरा गांधींनी अतिरेक केले नसते तर ही वाटपव्यवस्था आणखीही काही काळ तशीच चालूही राहिली असती; पण अतिरेक झाले, असंतोष वाढला, तो संघटितही झाला आणि अचानक आजवर दुकाने-शाळा चालवणारे लोक सत्तास्थानांवर अक्षरशः फेकले गेले. 'भाकरी आणि स्वातंत्र्य' असे म्हणत म्हणत या वर्गाने सत्ता स्वीकारली खरी; पण ही कसरत त्याला अद्याप तरी जमलेली नाही. या दोनपैकी एक टोक धरून नाकासमोर बेगुमानपणे पुढे जाणे हे या वर्गाच्या मूळ प्रकृतीला न मानवणारे आहे. या वर्गाला स्वातंत्र्याची महती पटलेली आहे; पण भाकरीशिवाय जगता येत नाही, हेही तो विसरू शकत नाही. डाव्या आणि उजव्या टोकांची सतत दडपणे या मधल्या वर्गावर आहेत आणि या दडपणांना पुरून उरण्याइतका तो ताकदवानही नाही. ताकद कमी पडली तर शक्यता आहे, कनिष्ठ मध्यमवर्गाकडे गेलेली सत्ता पुन्हा वरिष्ठ वर्गाकडे पूर्ववत खेचून आणण्याची पहिली संधी साधली जाईल आणि हा जनता शासनाचा खेळ खतम होईल. फक्त वैशिष्टच असे राहील की, आत्यंतिक वरिष्ठ वर्ग आत्यंतिक कनिष्ठ वर्गाच्या साहाय्याने हे सत्तान्तर आपल्याकडे घडवून आणण्याचा प्रयत्न करील. झोपडपट्टी आणि पंचतारांकित वर्तुळे यासाठी एकत्र होतील. कारण जनता पक्षाचे मध्यममार्गी शासन या दोन्ही वर्तुळांना मनापासून नकोच आहे. आदर्शातच फार तफावत आहे, जीवन पद्धतीच भिन्न आहेत. परंपरेपासूनही दोन्ही वर्तुळे तुटलेली आहेत. पाळेमुळे हरवून बसलेली आहेत. एक वंचित ठेवले गेले म्हणून; दुसरे सतत अमेरिकेकडे डोळे लावून बसलेले असते म्हणून. शिवाय यापैकी एकही वर्तुळ केवळ स्वतःच्या बळावर सत्तान्तर घडवून आणू शकत नाही, ही अडचण आहेच. पंचतारांकित वर्तुळांना, बड्या उद्योगपती-व्यापारी वर्गाला समाजाचा व्यापक पाठिंबा नाही. पैसा, आर्थिक सत्ता हे या वर्गाचे एकमेव बलस्थान. उलट झोपडपट्ट्यांना, तळागाळातल्या दलित-मागास वर्गांना गमावण्यासारखे काहीच जवळ नसल्याने तो, कधी या तर कधी त्या आकर्षणांना बळी पडणे मुळीच अस्वाभाविक नाही. प्रश्न आहे मध्यमवर्गाचा—शहरातल्या आणि खेड्यातल्याही. यांच्याजवळ गमावण्यासारखे थोडे-फार साठलेले असते. काही किडुक-मिडुक, २–४ एकर जमीन, बैल-बारदान, घर-दार, ब्लॉक, सुरक्षित नोकरी, सामाजिक स्थान वगैरे वगैरे. या वर्गाच्या हाती केवळ योगायोगाने आज सत्ता आली आहे. नवखेपणामुळे अनेक चुका-घोटाळे होताहेत. आत्मविश्वासाचा अभाव जाणवत आहे; पण किती काळ जनता याकडे क्षमाशीलतेने पाहील ? ही एक कसोटीची वेळ आहे. स्वातंत्र्य टिकवून केवळ भाकरीच नाही तर शांतता आणि सुव्यवस्था यांचीही हमी या मध्यममार्गी जनता शासनाला देता आली पाहिजे. अशी हमी मिळाली नाही तर लोक हे शासन फेकून देतील, मध्यमवर्ग सत्ता राबवायला नालायक आहे, असा शिक्का

कपाळी बसेल. राजस्थानमध्ये जे शासन खंबीरपणे पुरोगामी धोरणे अंमलात आणू शकते, शांतता-सुव्यवस्था यांची हमी देऊ शकते, ते इतरत्र का नाही देऊ शकणार? आज मजूरसंघटनांच्या प्रतिनिधित्वावरून वाद माजताहेत, खुनाखुनी सुरू आहे. राजस्थान शासनाने पूर्ण लोकशाही पद्धतीने हा प्रश्न केव्हाच सोडवून टाकलेला आहे, याची दखल का घेतली जाऊ नये? तेव्हा जनता-शासन स्थिर व मजबूत राहून पुरोगामी वाटचाल करू शकणारच नाही, कनिष्ठ मध्यमवर्गाला सत्ता हाती टिकवता येणारच नाही, असे समजण्याचे काही कारण नाही; पण कुठे तरी आत्मविश्वास कमी पडताना दिसतो आहे. महाराष्ट्रात तर हे फार तीव्रतेने जाणवत आहे. सत्ता झुगारून पुन्हा अधिक उज्ज्वल व निर्णायक यशासाठी मैदानात घुसण्याची हिंमतही नाही आणि मिळालेली अर्धीमुर्धी सत्ता राबवण्याची कुवतही नाही, अशा अर्धवट स्थितीत महाराष्ट्रातील जनता पक्ष चाचपडत आहे. जुन्याच काँग्रेसी नेतृत्वाचे पाय धरणे त्यामुळे त्याला प्राप्तच झाले. गोदरेज हल्ल्यासारख्या घटना वरचेवर घडल्या तर खंबीर व ठाम उपाययोजना करणे अशा अर्धामुर्धा सत्ताधाऱ्यांना शक्य आहे का? उद्योगपतींनी इशारा दिलेलाच आहे. लवकर काय ते ठरवा नाही तर आम्ही हा खेळ बंद करू, अशीच जवळजवळ धमकावणी उद्योगपती-व्यापाऱ्यांनी दिलेली आहे. त्यांचा पर्यायही स्वच्छ आहे. इंदिरा गांधी त्यांना अधिक जवळच्या आहेत. वल्लभभाईंपेक्षा नेहरू त्यांना जवळचे वाटत होते, हे पूर्वसूत्र विसरून कसे चालेल? ही अगदी वरिष्ठ वर्तुळे आणि तळागाळातले समुदाय इंदिरा गांधी एकत्र आणू शकतात, तसे त्यांचे जोरदार प्रयत्न सुरूच आहेत. अशी ही वरून आणि खालून आग भडकली तर जनता शासनाचे 'पॅरिस कम्युन' होणारच नाही, असे छातीठोकपणे आज तरी सांगणे कठीण आहे. □

# कम्युनिस्ट जग

## संघर्ष निर्माण का होतात?

वा. दा. रानडे

दोन कम्युनिस्ट राष्ट्रांमधील संघर्षाचा प्रश्न कंबोडियाच्या अनुषंगाने पुन्हा नव्याने उपस्थित झाला आहे. कंबोडिया आणि व्हिएटनाम यांच्यातील सध्याच्या संघर्षाचा तपशीलवार विचार न करता दोन कम्युनिस्ट राष्ट्रांत संघर्ष का निर्माण होतात, या अधिक व्यापक व मूलभूत प्रश्नांसंबंधी काही विचार येथे मांडत आहे.

भांडवलदारी राष्ट्रांमधील संघर्षाकडे कम्युनिस्ट नेहमी लक्ष वेधीत असतात; पण तसे करताना कम्युनिस्ट राष्ट्रांमधील संघर्षाकडे मात्र ते सोयिस्कर दुर्लक्ष करीत असतात. असतात. कम्युनिस्ट चळवळीतील संघर्षांचा अनेक दृष्टिकोनांतून विचार करता येईल. येथे फक्त दोन कम्युनिस्ट राष्ट्रांमधील संघर्षापुरतेच विवेचन मर्यादित करीत आहे.

पहिला प्रश्न, दोन कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये संघर्ष का निर्माण व्हावेत? कम्युनिस्ट विचारप्रणालीचा एक सिद्धान्त असा की, कम्युनिस्ट समाजपद्धतीत आर्थिक हितसंबंधांच्या पायावर उभारलेले वर्गच नसल्याने वर्गसंघर्ष नष्ट होतात. उत्पादनामागे खासगी नफ्याची प्रेरणा नसल्याने कामगारवर्गाची पिळवणूक होत नाही. त्यामुळे दोन कम्युनिस्ट राष्ट्रांत संघर्ष निर्माण होण्याचे तत्त्वतः कारण नाही. असे असतानाही संघर्ष होत असतील तर त्याचे कारण त्यापैकी कोणत्या तरी एका राष्ट्राने कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली सोडलेली असते. दोघेही एकमेकांविरुद्ध आरोप करीत असतात. त्यातले खरे कोणाचे मानावयाचे असा प्रश्न निर्माण होतो, त्यातल्या प्रबळ राष्ट्राचीच बाजू मुख्यतः बरोबर मानली जाते आणि बहुसंख्य कम्युनिस्ट राष्ट्रे व कम्युनिस्ट पक्ष त्या राष्ट्राच्याच भूमिकेस पाठिंबा देतात असा आत्तापर्यंतचा सर्वसाधारण अनुभव आहे; पण हे योग्य आहे का? कम्युनिस्ट राष्ट्रांमधील काही संघर्षांच्या अनुषंगाने याचा विचार करायला हवा.

यशस्वी कम्युनिस्ट क्रांती प्रथम रशियात झाली; त्यामुळे रशियाकडे स्वाभाविकच आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे नेतृत्व आले. कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली, धोरण, कार्यक्रम, कार्यपद्धती याबाबतीत रशिया सांगेल तेच बरोबर, तेच धोरण जगभरच्या कम्युनिस्ट पक्षांनी स्वीकारले पाहिजे, असा आग्रह रशियन नेत्यांनी धरला. रशियाचे परराष्ट्रधोरण हेच आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे धोरण असे. हे धोरण मुख्यतः रशियाच्या हितसंबंधानुसारच आखलेले असे. स्टालिनने हिटलरशाहीत अनाक्रमणाचा करार करताच जगभरच्या कम्युनिस्ट पक्षांनी त्याचे समर्थन केले. पुढे हा करार मोडून हिटलरच्या फौजांनी रशियावर स्वारी करताच साम्राज्यशाही युद्धाचे एका रात्रीत लोकयुद्धात रूपांतर झाले आणि अमेरिका, ब्रिटन रशियाचे दोस्त बनले. भारतासारख्या वसाहतदेशाच्या दृष्टीने युद्धाच्या साम्राज्यशाही स्वरूपात काहीही बदल झालेला नव्हता; पण भारतीय कम्युनिस्टांनी युद्धविरोधाचे धोरण बदलून एकदम युद्धसहकार्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्ष राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहापासून बाजूला पडला. कम्युनिस्ट पक्षांना आपापल्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार स्वतंत्र धोरण आखण्याची मोकळीक असली पाहिजे, हे धोरण पुढे रशियाने क्रुश्चेव्हच्या काळात तत्त्वतः मान्य केले; पण या प्रश्नावर पहिला मोठा संघर्ष स्टालिन आणि टिटो यांच्यात झाला. टिटोंनी आपले धोरण निर्धाराने अंमलात आणले आणि

रशियाने त्यांना अखेर त्यांच्याशी मिळते घेऊन सहकार्याचे सबंध प्रस्थापित करणे भाग पाडले.

पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रे रशियापासून जास्तीत जास्त स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण तेथील प्रस्थापित राजवटींविरुद्ध उठाव होऊन कम्युनिस्ट राजवटीलाच धोका निर्माण झाल्याचे दिसू लागले, तेव्हा रशियाने लष्करी हस्तक्षेप करून तेथील कम्युनिस्ट राजवटी टिकविल्या. हंगेरीतील हस्तक्षेप यापैकीच होय. पण चेकोस्लाव्हियात १९६८ साली वार्सा करार राष्ट्रांनी केलेला हस्तक्षेप तेथील राजवट टिकविण्यासाठी नव्हे तर तिचा पाडाव करून तेथे रशियाला अनुकूल राजवट स्थापण्यासाठी होता. रशियन पद्धतीचाच साम्यवाद आपल्या देशात आणण्याचे चेकोस्लोव्हाकियाचे कम्युनिस्ट नेते डचुबकेक यांनी नाकारले. साम्यवादावर लोकशाहीचे कलम करण्याचा त्यांचा प्रयोग होता. हे लोण पुढे रशियात पसरेल आणि आपल्या सत्तेला त्यातून धोका निर्माण होईल, असे रशियन नेत्यांना वाटले आणि त्या प्रयोगावर प्रतिगामित्वाचा शिक्का मारून लष्करी बळावर तो मोडून काढण्यात आला.

अलीकडे रशियाच्या चालीने चालण्याचे नाकारून रुमानिया स्वतंत्र धोरण अवलंबीत आहे. वॉर्सा–करार राष्ट्रांचे लष्करी बळ वाढविण्यासाठी आपला लष्करी खर्च वाढविण्याचे त्याने नाकारले. रशियाच्या विरोधाला न जुमानता चीनशी संबंध सुधारले आणि अगदी अलीकडची घटना म्हणजे रशिया व पूर्व युरोपातील इतर कम्युनिस्ट राष्ट्रांप्रमाणे कंबोडियातील नव्या राजवटीस मान्यता देण्याचे रुमानियाने नाकारले.

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्वेकडे रशिया-चीन संघर्ष वाढत गेला. रशियाच्या नेत्यांचे प्रथमपासूनचे धोरण कम्युनिस्ट चीनला फार प्रबळ होऊ द्यावयाचे नाही असे होते; कारण त्यातून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीमधील आपल्या नेतृत्वास प्रतिस्पर्धी निर्माण होईल अशी भीती त्यांना वाटत होती. वास्तविक जगातील कम्युनिस्ट क्रांतीचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्याला पूर्वेकडे एक चांगला सहकारी मिळत आहे म्हणून रशियाला आनंद वाटावयास हवा होता. आपसातील धोरणविषयक मतभेद ह्या दोन्ही राष्ट्रांच्या नेत्यांना वाटाघाटींनी मिटविता आले असते; पण कम्युनिस्ट क्रांतीपेक्षा आपलीच भूमिका बरोबर, जागतिक कम्युनिस्ट चळवळीवर आपलेच प्रभुत्व हवे, या अपप्रवृत्तींच्या आहारी या दोन्ही राष्ट्रांचे नेते गेले. आणि त्यांच्यातील संघर्ष वाढत गेला. त्यातून आपापली बाजू बळकट करण्यास सोयीचे पवित्रे या दोन राष्ट्रांनी टाकले. अमेरिकेविरुद्ध रशिया कडवी लढाऊ भूमिका घेत नाही, म्हणून रशियन नेतृत्वावर टीका करणाऱ्या चीनने अमेरिकेशी मैत्रीचे संबंध जोडले, तर व्हिएटनामला मोठ्या प्रमाणावर मदत करून त्याच्या रूपाने आशियात चीनला प्रतिस्पर्धी सत्ता निर्माण करण्याचे धोरण रशियाने अवलंबिले. व्हिएटनाम प्रबळ होण्यासाठी पूर्वीचा संबंध इंडोचायना म्हणजे व्हिएटनामच्या जोडीला लाओस आणि कंबोडिया हे देश व्हिएटनामच्या नियंत्रणाखाली हवेत, ही व्हिएटनामी नेत्यांची आकांक्षा आणि चीनच्या प्रभावाला आळा घालण्यासाठी रशियालाही ते हवे असल्याने हे उद्दिष्ट साधण्यासाठी रशियाने व्हिएटनामला भरपूर मदत केली, पण व्हिएटनामचे प्रभुत्व मानण्याचे कंबोडियाच्या पोल पोट सरकारने नाकारल्याने त्याच्याविरुद्ध लढण्यासाठी आपल्याला अनुकूल असलेल्या कंबोडियन नेत्यांची आघाडी व्हिएटनामने उभारली आणि कंबोडियावर आक्रमण करून तेथे आपल्याला अनुकूल राजवट स्थापली.

रशिया व व्हिएटनामने याबाबतीत अमेरिका व चीनवर मात केली. सुरक्षा समितीत तक्रार करून घडलेल्या गोष्टी काही ही राष्ट्रे फिरवू शकणार नाहीत; पण या साऱ्या संघर्षातून प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे, राष्ट्रीय हितसंबंध व सत्ताकांक्षा अखेर कम्युनिस्ट चळवळीपेक्षा प्रभावी ठरतात व त्यातून कम्युनिस्ट चळवळीची हानी होते. सत्ताकांक्षेने जेव्हा कम्युनिस्ट राष्ट्रेही झपाटली जातात तेव्हा कम्युनिस्ट चळवळीच्या मूळ उद्दिष्टांपासून ती दूर जातात. लोकशाही पद्धतीने निर्णय घेण्याच्या प्रथा कम्युनिस्ट चळवळीत डावलल्या गेल्याने या अपप्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत. कम्युनिस्ट चळवळीत लोकशाही प्रथांबद्दल आग्रह धरणे हाच त्यावर उपाय आहे. □


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १०.सप्टेंबर १९७८ )

—डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.


बचतीचा शुभारंभ
त्यासाठीं पद्धत—संचयिका
'संचयिका'— विद्यार्थ्यांनी चालविलेल्या या बचत बँकेचे आपण सभासद आहांत कां ? नसल्यास, आपल्या शाळा/कालेजातील या अपूर्व 'बचत मंडळा' चे सभासद व्हा.
अर्थ व्यवस्थापन आणि बँकेचा व्यवहार यांचे युवकांना प्रशिक्षण देण्यासाठीं संचयिका-तर्फे उत्कृष्ट संधी पुरविण्यात येते. त्यात आनंदाबरोबरच आपला फायदा पण होतो, हे आपणांस समजेल.
हल्ली, देशांत अशा सुमारे २५००० विद्यार्थी बँका असून, त्यात सत्तर लक्ष ठेवीदार आहेत.
davp 78/342 Marathi
राष्ट्रीय विकास कार्याला ही मदत, निश्चित भूषणावह आहे.
बचत करण्याची संवय चांगली. मधमाशीचे बोधचिन्ह (खाली दिलेले) बचतीच्या भक्कम पद्धतीचे प्रतीक आहे. संचयिका ही त्यातीलच एक पद्धत आहे.
अधिक माहितीसाठीं कृपा करुन लिहा:
राष्ट्रीय बचत संघटना
पोस्ट बॉक्स नंबर ९६, नागपुर-४४०००१

मुंबई वार्ता । विनय सहस्रबुद्धे

# कामगार अशांतता

## मजूरमंत्री सुशिलकुमार शिंदे यांची मुलाखत

एखाददुसऱ्या कारखान्यातील कामगार-कलह किंवा एखादा छोटा-मोठा संप ही बाब मुंबईत नवी नाही; पण प्रीमियरसारख्या बलाढ्य कंपनीतील टाळेबंदी, ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात वारंवार उद्‌भवणारे संघर्ष, भरीत भर म्हणून बँक कर्मचाऱ्यांसारख्या पांढरपेशा लोकांनी उपसलेले संपाचे हत्यार, त्याला व्यापारी वर्गाने हरताळ पाळून दिलेले चोख उत्तर या मुळातच तापलेल्या वातावरणात गेल्या मंगळवारी प्रसिद्ध उद्योगपती श्री. नवरोज गोदरेज यांच्यावर सुरीहल्ला झाल्यामुळे मुंबईतील एकूण समाजजीवनच ढवळून निघाले आहे.

या सगळ्या प्रकरणांना उत्तरदायी कोण ? म्हटलं तर कोणीच नाही आणि म्हटलं तर आपण सगळेच; पण कायदेशीर आणि घटनात्मक जबाबदारी आहे ती राज्यशासनाची. जनतेत आज अशी एक भावना रुजली आहे की, भांडवलदार उद्योगपती आणि चळवळे कामगार व त्यांचा हिंसाचार यांच्या पकडीत सरकार सापडले असून त्यामुळे शासनाला काहीही परिणामकारक उपाय योजता येत नाहीत. खरोखरच सरकारची परिस्थिती अशी आहे काय ? ह्या साऱ्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवरच राज्याच्या मजूरमंत्र्यांची भेट घेतली.

'माणूस'ला दिलेल्या मुलाखतीत मजूरमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी स्पष्टच सांगितले की, 'सरकारचे परिस्थितीवर लक्ष आहे व सरकार पूर्णतः निःपक्षपाती वृत्तीने आपले कर्तव्य पार पाडीत आहे. येत्या काही दिवसांतच दहशतवादाला रोखण्यासाठी सरकार योजीत असलेल्या उपाययोजनेचे स्वरूप स्पष्ट होईल. (अनधिकृत सूत्रांनी पुरविलेल्या बातमीनुसार राज्यसरकार लवकरच मिनी-मिसासारखा वटहुकूम काढणार आहे. )'

श्री. शिंदे यांच्या मते शासनाची ही संभाव्य उपाययोजना हिंसाचार काबूत आणण्यात प्रभावी ठरेल. श्री. दत्ता सामंत यांच्या कारवायांबद्दल बोलताना श्री. शिंदे म्हणाले की, 'हा प्रश्न दत्ता सामंत या एका व्यक्तीचा नसून एकूणच हिंसक प्रवृत्तीचा आहे. वास्तविक कोणत्याही प्रकारे कामगार-चळवळ दडपली जाऊ नये म्हणून आमच्या सरकारने अधिकारपदावर येताच कामगारांना अनुकूल असे धोरण स्वीकारले होते; पण कामगार त्याचा गैरफायदा घेत आहेत. आंतर-संघटना-स्पर्धेमुळेच मुख्यतः हिंसाचार वाढीस लागला आहे. शिवाय यापूर्वी केवळ एकाच विशिष्ट संघटनेला प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारीरीत्या राबविले गेले; परंतु आता तसे नाही व त्यामुळे त्या संघटना नाराज आहेत. त्यांच्यातलेच काही हिंसाचाराला खतपाणी घालत असावेत.'

त्याआधी एका पत्रकार परिषदेत पत्रकारांनी सुशिलकुमार शिंदे यांना विचारले होते की, 'केवळ एका उद्योगपतीवर हल्ला झाला म्हणून लगेच शासनाचे धोरण बदलणार आहे काय ?' यावर शिंदे यांचे उत्तर असे की, 'सरकार कामगारांच्या हिंसक कारवायांवर निर्बंध घालणार याचा अर्थ कामगारांच्या समस्यांकडे शासन दुर्लक्ष करीत आहे असा नाही. सरकारने नव्याने नेमलेल्या समितीकडे प्रचलित कामगार कायद्यात बदल सुचविण्याचे काम सोपविण्यात आले आहे. ही समिती मुंबई औद्योगिक संबंध कायदा व अन्य कायद्यांत बदल सुचविणार आहे. ह्या बदलांमुळे गुप्त मतदान पद्धतीने कामगार संघटनेला मान्यता देण्यासाठी कायदेशीर तरतूद केली जाईल. त्यामुळे दोन संघटनांतील वाढत्या वैमनस्याला काही प्रमाणात आळा बसेल.

'याच कायद्यातील आणखी एक आवश्यक बदल म्हणजे लवादाच्या वेळकाढू धोरणाबाबत. एकदा प्रश्न लवादाकडे सोपविण्यात आल्यानंतर तो सुटण्यासाठी वर्षानुवर्षे कामगारांना वाट पहावी लागते व या काळातच अस्वस्थ कामगार हिंसेला निमंत्रण देतात. सरकार लवादावर निर्णय देण्यासाठी वेळेचे बंधन घालण्याची तरतूद संकल्पित बदलांमध्ये करणार आहे. या बाबतचे विधेयक विधानसभेच्या आगामी अधिवेशनापुढे येईल.'

श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी उद्योगपतींच्या कामगारविरोधी आणि केवळ स्वार्थप्रेरित भूमिकेलाही कामगार असंतोषासाठी जबाबदार धरले आहे. या बाबत शिंदे यांनी सांगितलेला किस्सा उद्योजकांनी वाचण्यासारखा आहे.

एका कारखान्यात कामगार पगारवाढीसाठी संपावर गेले होते. मालकाच्या विनंतीवरूनच श्री. शिंदे यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे ठरविले. आपली बाजू मांडताना या उद्योजकाने आपल्या हिशेबाची सर्व कागदपत्रे मंत्रिमहोदयांसमोर दाखविली. या प्रामाणिकपणाने व उद्योजक खरोखरच पगार वाढविण्याच्या स्थितीत नाही याची खात्री झाल्याने प्रभावित झालेल्या मंत्रिमहोदयांनी कामगारांना संप मागे घेण्याचे तळमळीने आवाहन केले.

आता आपली बाजू मांडण्याची कामगारांची पाळी होती. मालकांनी दाखविलेला हिशेब खोटा आहे. अनेक खोटी बिले त्यात आहेत. मालकाला नफा होत नाही या म्हणण्यात काहीच तथ्य नाही हे या कामगारांनी इतक्या सबळ पुराव्यासह सिद्ध केले की, मंत्रिमहोदय अवाक झाले. याचे स्पष्टीकरण देताना उद्योजकाची मात्र तारांबळ झाली. याच उद्योजकाने मागाहून कामगारांना पगारवाढ व २०% बोनस दिला !

श्री. शिंदे यांनी मुलाखतीत हेही स्पष्ट केले की, 'जिथे आवश्यक असेल तिथे कामगार-तंटचात सरकार जरूर हस्तक्षेप करील. आतापर्यंत अनेक कामगार-तंटचांत सरकारने यशस्वी हस्तक्षेप केला आहे. प्रीमियर-प्रकरणातही योग्य वेळी सरकार हस्तक्षेप करील.'

'विडी-कामगारांची असुरक्षितता संपावी यासाठी शासन कायदेशीर तरतूद करणार आहे.' असेही श्री. शिंदे म्हणाले. बालकामगारांबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. शिंदे म्हणाले की, 'वयाच्या १५ व्या वर्षी मी स्वतः बालकामगार म्हणून काम केले आहे. त्यांच्या व्यथा मी जाणतो व त्याबाबत या वर्षी निश्चितपणे उपाययोजना केली जाईल.' □

# वक्तृत्वाची उपासना

चित्रकला काय किंवा संगीत काय, या कलाविषयांचे सर्वसाधारण शास्त्र आधीच बनले आहे आणि आता तर एखादी स्वतंत्र विद्याशाखा जशी विकसित होते तसा चित्रकला आणि संगीताचा विकास आजतागायत होत आला आहे. या दोन्ही कलांचा निखळ

व्यावहारिक उपयोग हे या विकासामागचे एक प्रमुख कारण सांगता येईल.

पण वक्तृत्वाचे तसे नाही. वक्तृत्व हा व्यक्तिमत्त्वविकासाचा एक अविभाज्य घटक आहे, हे तर निर्विवादच; पण असे असूनही वक्तृत्वाचा व्यावहारिक उपयोग सामान्यतः फारसा लक्षात येतोच असे नाही. कदाचित यामुळेच की काय, बहुसंख्य महाविद्यालयात आणि एकूणच समाजात वक्तृत्व हे क्षेत्र काहीसे उपेक्षित राहिले आहे.

वक्तृत्वकलेबाबत सर्वसाधारणतः आढळणारी उदासीनता आणि अनास्था या पार्श्वभूमीवर, वक्तृत्वात गेली अनेक वर्षे दबदबा निर्माण करणाऱ्या मुंबईच्या रुईया महाविद्यालयाने वक्तृत्वाचा जो अभ्यासवर्ग किंवा जे कृतिसत्र आयोजित केले होते, तो एक आशेचा किरण ठरू शकेल.

वक्तृत्वासाठी असे कृतिसत्र मुळात आवश्यक आहे काय ? आणि अशा कृतिसत्रांमुळे वक्तृत्वकला आत्मसात करता येते काय ? या प्रश्नांना उत्तर देताना या कृतिसत्राचे संयोजक आणि रुईयाच्या वादसभेचे प्रमुख प्रा. अशोक मोडक म्हणाले की, 'या कृतिसत्राचे मुख्य दोन उद्देश आहेत. एक म्हणजे एरवी सर्वच महाविद्यालयांत वक्तृत्वाचा जो स्पर्धाभिमुख अभ्यास होत असतो त्याऐवजी, व्यक्तिमत्त्व-विकासाच्या दृष्टीने त्याचा अभ्यास व्हावा हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. शिवाय वक्तृत्व आणि वादविवादाचे जे विविध पैलू आहेत ते शास्त्रोक्त पद्धतीने कसे हाताळावेत व कसे विकसित करावेत याचे एकत्रित प्रशिक्षण मिळण्याच्या दृष्टीनेही अशी कृतिसत्रे फलदायी ठरतात.'

गेल्या शनिवारी दि. ६ ला दुपारी या कृतिसत्राला सुरुवात झाली. उद्घाटनाचा औपचारिक कार्यक्रम पार पाडला तो अगदी साधेपणाने. महाविद्यालयाचा एक माजी विद्यार्थी आणि एक प्रथितयश तरुण इंग्लिश कवी गंगाधरन नायर याने एका छोटचाशा भाषणाने कृतिसत्राचं उद्घाटन केलं. उद्घाटनात फारसा वेळ न दवडता रुइयाच्या बहुभाषिक वक्त्यांची ही फौज 'सांसदीय चर्चेसाठी' सज्ज झाली. गेली तीन वर्षे रुइयात कृतिसत्रांचा उपक्रम होत होता; पण या वर्षी प्रथमच सांसदीय चर्चा या विषयाचा त्यात नव्याने समावेश करण्यात आला होता. मराठी, हिंदी, गुजराती आणि इंग्रजी या चार भाषांतून या सांसदीय चर्चा पार पडल्या. सर्व विभागात 'कामगारांचा संपाचा हक्क काही काळ रद्द करावा' या आणि 'भारतात सांसदीय लोकशाही अयशस्वी ठरली आहे' या प्रस्तावांवर उलटसुलट चर्चा झाल्या.

वक्तृत्वाचा एक नवा प्रकार या निमित्ताने हाताळण्यात आला. ह्या चर्चा म्हणजे एरवीच्या अभिरूप लोकसभेचा प्रकार नव्हता. त्यामुळे व विषयांचे स्वरूपच मूलतः चिकित्सक असल्यामुळे, खऱ्या लोकसभेत होते त्यापेक्षा कमी नाटचपूर्ण पण अधिक उच्च पातळीवरून चर्चा झाली.

या कृतिसत्रात उत्स्फूर्त भाषणांचेही एक सत्र होते. उत्स्फूर्त भाषण हा नेहमीच वक्तृत्ववीरांना एक आव्हानात्मक प्रकार वाटत आला आहे. या कृतिसत्रातील ही भाषणे ध्वनिमुद्रित करून ठेवण्याची पद्धत उल्लेखनीय आहे. आवाजाची खोली, चढ-उतार, आवाजातील आवाहन, पल्लेदारपणा अशा किती तरी पैलूंचे खरे स्वरूप आपलाच आवाज ऐकताना लक्षात येते.

रविवारी ७ तारखेला कृतिसत्राचा उत्तरार्ध होता. मुंबईत जसे प्रत्येक कलेचे व्यावसायिक आहेत, तसेच वक्तृत्वाचेही आहेत. गेली दोन वर्षे अशा—वक्त्यांची शाळा—चालविणाऱ्यांना रुईयाने पाचारण केले होते; पण अखेर व्यवसायी वक्त्यांचा एकूण दृष्टिकोनच वेगळा असतो, ह्याची जाणीव झाल्यावर ह्या वर्षी हौशी महाविद्यालयीन वक्त्यांनाच खास निमंत्रित म्हणून बोलविण्यात आले होते. व्यासपीठे गाजविण्यात पटाईत असलेल्या या विद्यार्थी—वक्त्यांनी आपलाच मित्रांना आपले अनुभव मोठ्या मनमोकळपणाने सांगितले. मुख्य म्हणजे ह्या सगळ्याच बाहेरच्या वक्त्यांनी रुईया कॉलेजच्या विद्यार्थ्यांना वक्तृत्वाच्या क्षेत्रात जे सक्रीय प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळते त्याचा आपल्याला हेवा वाटतो, असेही सांगितले.

अर्थात, ही गोष्ट सांगायला तिऱ्हाइताची गरज नाही. वक्तृत्व-स्पर्धांतील यश आणि चांगले वक्ते यांची रुईयातील परंपरा गेली अनेक वर्षे अव्याहत आहे. विशेषतः सर्व भाषिक प्राध्यापक एकीने आणि उदंड उत्साहाने असे उपक्रम यशस्वी करण्यासाठी जे परिश्रम घेतात ते दुर्मिळ आहेत.

या कृतिसत्रात या वर्षीच केलेला आणखी एक नोंदणीय उपक्रम म्हणजे विविध भाषांतील वक्तृत्वाच्या विकासाचा अभ्यास. 'धर्मयुग'चे संपादक श्री. महावीर अधिकारी, गुजराती प्राध्यापिका श्रीमती भारती मुजमदार, माजी खासदार श्री. एन. दांडेकर आणि चाळीसगाव महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. म. वि. फाटक या चार भाषांतील चार वक्त्यांनी आपापल्या भाषेतील वक्तृत्वाच्या विकासाचा आढावा घेतला.

खरं तर या चौघांचीही, पण विशेषतः श्री. दांडेकर आणि श्री. फाटक यांची भाषणे विशेष चांगली झाली. श्री. दांडेकर यांनी आपल्या भाषणात वक्तृत्वाची आराधना करताना जी मूलभूत पथ्ये पाळायची असतात ती प्रभावी पद्धतीने सांगितली. आपल्या ठसकेबाज शैलीतील प्रसन्न इंग्रजीने त्यांनी श्रोत्यांना सहज जिंकले. ते म्हणाले की, 'कोणतीही गोष्ट पूर्वतयारीशिवाय होत नाही, हा न्याय यशस्वी वक्तृत्वालाही लागू आहे. मी आज ७२ वर्षांचा आहे, आयुष्यात शेकडो भाषणे केली आहेत; पण आजही मी भाषणापूर्वी नेहमी मुद्द्यांचे टाचण करीत असतो. इतकेच नव्हे तर, कोणत्या मुद्द्यावर किती वेळ बोलायचे हेही मी आधीच ठरविलेले असते.' श्री. दांडेकर यांनी सांगितलेला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे समोरच्या श्रोत्यांकडे पाहून बदलता येईल इतकी लवचिक वक्तृत्वशैली आत्मसात करणे आवश्यक आहे. श्रोत्यांच्या आवडी-निवडीचा सर्वसाधारण अंदाज भाषणाच्या प्रारंभीच घेता आला पाहिजे.

प्रा. फाटक यांनी आपल्या भाषणात माडखोलकरांपासून अत्र्यांपर्यंत मराठीतील विविध वक्त्यांच्या आपल्या अशा वैशिष्टचपूर्ण शैलीचा परिचय करून दिला. प्रा. फाटक म्हणाले की, 'वक्तृत्वाचे स्वरूप स्थल-कालानुसार बदलत असते. लोकसभा, शोकसभा, सार्वजनिक सभा आणि महाविद्यालयाचा वर्ग या विविध ठिकाणी विविध प्रकारची शैली हाताळावी लागते.

'एके काळी सभा जिंकण्याचे काही हुकमी एक्के होते. संस्कृत सुभाषितांचा खच्चून वापर केला की, वक्ता विद्वान असल्याची (गैर) समजूत श्रोते करून घेत असत; पण आता तसे राहिलेले नाही. उलट कमीत कमी बोजड शब्द वापरून व अधिकाधिक सोप्या, सरळ आणि सुगम भाषेत श्रोत्यांना जिंकून घेणं याला आता स्वाभाविकतःच महत्त्व आले आहे.'

वक्तृत्वाच्या या कृतिसत्रामुळे यात सहभागी होणारे विद्यार्थी एकदम पट्टीचे वक्ते बनतील असे मानण्याचे कारण नाही. खुद्द कृतिसत्राच्या संयोजकांचाही असा समज खचितच नाही; पण या निमित्ताने साठ-सत्तर विद्यार्थ्यांनी या आपल्या आवडीच्या कलेबाबत थोडेसे श्रवणीय ऐकले, या कलेच्या विकासाच्या पद्धती समजून घेतल्या, वक्तृत्वाचे विविध प्रकार बघितले हेही काही कमी महत्त्वाचे नाही.

निदान, कॉलेजचा कट्टा हेच कार्यक्षेत्र मानणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांपेक्षा हे विद्यार्थी अधिक सक्रिय आहेत, हेही नसे थोडके. □

# राजपुत्र सिंहनुकाची शोकान्तिका

प्रा. अशोक मोडक

अखेर काम्बोडियातले पोलपोत सरकार पदभ्रष्ट झाले आहे. आता त्या ठिकाणी व्हिएतनामशी एकनिष्ठ राहाणारे हेन्ग साम्रिनचे सरकार विराजमान झाले आहे. म्हणजे अप्रत्यक्षरित्या चीन व सोव्हिएत संघ यांच्यातल्या वितुष्टात सोव्हिएत नेतृत्वाचा विजय झाला आहे. या विजयामुळे घडलेल्या घटनाचक्राचे अनेक पैलू आहेत. त्या साऱ्या पैलूंची चर्चा जगातल्या वृतपत्रांतून मोठ्या चवीने चालू आहे; पण माझ्या मते काम्बोडियाचा राजपुत्र सिहनूक याची शोकान्तिका हा या घटनाचक्राचा फार मोठा पैलू आहे.

वास्तविक राजपुत्र सिहनूक यांच्या दृष्टीने अशा रीतीने आपल्याच देशाला निर्वासित होणे ही काही अभूतपूर्व घटना नाही. यापूर्वी म्हणजे सन १९७१ मध्ये अमेरिकेशी निष्ठा दाखविणाऱ्या मंडळींनी काम्बोडियावर मांड ठोकली होती. तेव्हाही चीनमध्ये जाऊन परक्या भूमीवर त्याला आपले सरकार स्थापन करावे लागले होते व आपलेच सरकार सर्वार्थाने न्याय्य आहे हे सांगण्यासाठी भाषणे करावी लागली होती. पत्रकार-परिषदा घ्याव्या लागल्या होत्या. बरं, आपल्या देशाला परागंदा होणाऱ्या राजा-राणीची आणि धर्मगुरूंची संख्या जगात कमी नाही. इथिओपियाचा राजा हेले सिलासी, नेदरलॅन्डची राणी युलियाना, तिबेटचा दलाई लामा ही सारी उदाहरणे याच पंगतीतली आहेत; पण तरी सिहनूक राजपुत्राची कहाणी मुलखावेगळी आहे व म्हणूनच प्रस्तुत लेखाचा प्रपंच आहे.

एक तर या राजपुत्राने आपल्या आतापर्यंतच्या जीवनात अक्षरशः शत्रूचे मोहोळ उभे केले आहे व त्यामुळे खऱ्याखुऱ्या अर्थाने अनिकेत अथवा भटक्या म्हणून वणवण हिंडणे हेच या राजपुत्राच्या कपाळी आले आहे. दुसरे म्हणजे ज्या देशाचा हा राजपुत्र मोठा अभिमान बाळगतो तो देशही कालचक्राच्या पकडीतले एक असहाय खेळणे बनला आहे व तिसरे म्हणजे आग्नेय आशियातल्या एका चिमुकल्या देशाच्या नाजूक राजपुत्राला सैरावैरा पळावे लागल्याने मोठमोठे देशही जाम हादरले आहेत.

मागे म्हणजे सन १९७१ साली हा राजपुत्र सरळ उठला आणि पेकिंगला जाऊन राहिला. त्या ठिकाणी म्हणे त्याची फारच झकास बडदास्त ठेवण्यात आली होती. त्या मुक्कामातच या राजपुत्राने एक मुलाखत दिली व पुढे ती मुलाखत My war with the C I. A. या नावाने पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली. सदर पुस्तकात सिंहनुकची चीननिष्ठा व सोव्हिएत संघ आणि अमेरिका या देशांवरची अप्रीती पदोपदी प्रकट झाली आहे. सिंहनुकचे दुर्दैव असे की, त्याच अमेरिकेने सुरक्षा परिषदेत काम्बोडियाच्या पोल पोत सरकारची वकिली करावी, कमीत कमी नव्या व्हिएतनामनिष्ठ सरकारवर हल्ला करावा, यासाठी सध्या सिंहनुक राजा धडपडत आहे. बरं, चीनच्या आशीर्वादाने गादीवर आलेल्या पोल पोतने अथवा किउ सम्फानने अथवा इएन्ग सारीने जे अत्याचार केले ते काही या राजपुत्राला मान्य नाहीत. खुद्द राजपुत्रालाच या मंडळींनी नजरकैदेत ठेवले होते. शेवटी असंतुष्ट व दुःखी कष्टी झालेल्या लोकांना दिलासा देण्यासाठी पुनश्च सिंहनुकची प्रतिष्ठापना करण्यात आली; पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. वाघाच्या मरून पडलेल्या शरीरात पेंढा भरला म्हणजे काही खरा वाघ उभा राहात नाही किंवा माणसाच्याच अंगावर आडवेतिडवे पट्टे चितारले म्हणजेही वाघ उभा राहात नाही. साहजिकच अशा वाघाला कोणीही घाबरत नाही. उलट जो तो या ओंगळवाण्या रूपाला पाहून हसत सुटतो. सिहनूक या राजपुत्राचीही अशीच स्थिती झाली. त्यामुळे नावापुरताच राहिलेला हा सिहनूक स्वतःची प्रतिष्ठा गमावून बसला. पोल पोतला आणि त्याच्या इतर सहकाऱ्यांनाही सिंहनुकचे प्रेम काडीचे नव्हते. कदाचित् म्हणूनच सिंहनुकने अमेरिकन वृत्तपत्रांना मुद्दाम सांगितले की, पदभ्रष्ट झालेल्या पोल पोत सरकारचे वर्तन त्याला मान्य होणारे नव्हते; पण 'व्हिएतनामी फौजांचे आक्रमण थांबवा' यासाठी मात्र सिहनूक पदर पसरून उभा आहे. सिंहनुकच्या या दुटप्पी धोरणामुळे पोल पोतच्या सरकारातली माणसे व खुद्द त्या सर्वांना पाठीशी घालणारा चीनदेखील दुखावला गेला आहे. आज नव्या काम्बोडियन सरकारला मॉस्कोने मान्यता दिली आहे. तेव्हा सोव्हिएत सरकारच्या दृष्टीने तर सिंहनूक म्हणजे शत्रू क्रमांक एक आहे. सिंहनूक अशा रीतीने सर्व समर्थ राष्ट्रांना आणि आपल्या प्रजेलाही गमावून बसला आहे. साधा आश्रय मिळावा यासाठी पायाला भिंगरी बांधून दौड करीत राहाणे एवढेच काय ते या राजपुत्राच्या नशिबात उरले आहे. काय गंमत आहे पहा, या राजपुत्राला आपला आवाका कधीच कळला नाही. मोठमोठ्या वल्गना करणे व अंकोरवटाची म्हणजे जुन्या परंपरेची ग्वाही देत भाषणे देत राहाणे हा या राजपुत्राचा स्वभाव आहे. My war with the C. I. A. या आपल्या पुस्तकात प्रस्तुत राजपुत्राने अल्पविकसित देशांनी कसा विकास करावा यावरही प्रवचन केले आहे. सोव्हिएत नेतृत्वावर कडाडून ताशेरे ओढले आहेत; पण लौकरच राजपुत्रावर पश्चात्ताप करण्याची पाळी आली व कम्युनिझमच्या विळचाकोयत्याचा प्रसादही खावा लागला. म्हणून आज हा केविलवाणा राजपुत्र तुम्हाआम्हाला सांगतोय – 'मी खरे म्हणजे बुद्धाचाच अनुयायी आहे!' राजपुत्राची ही केविलवाणी धडपड कम्युनिस्ट नसलेल्या मंडळींना खूष करण्याची शक्यता तर अजिबात नाही; पण रुमानिया व युगास्लाव्हिया या कम्युनिस्ट देशांना मात्र नक्कीच रुष्ट करणारी आहे. याच दोन देशांची नावे आता घेतली आहेत कारण, रशियाबरोबर सख्य करण्याऐवजी या दोन्ही पूर्वयुरोपीय

राष्ट्रांनी नव्या काम्बोडियन सरकारला अजून तरी मान्यता देण्याचे नाकारले आहे. ' धोबी का कुत्ता, ना घरका ना घाटका ' अशी म्हण आहे. आता या म्हणीचा वाक्यात उपयोग करायचा असेल तर काम्बोडियाच्या सिंहनूक राजपुत्राचे उदाहरण खुशाल लक्षात ठेवावे.

### एक असहाय्य देश

या निमित्ताने साऱ्या आशिया खंडात आणि विशेषत: आशियाच्या आग्नेय भागात केवढी खळबळ माजली आहे ! मुळात ASEAN म्हणजे Association of South East Asian Nations या नावाची संघटना स्थापून त्या ठिकाणच्या काही गैरकम्युनिस्ट देशांनी फळी मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. फिलिपाइन्स, इंडोनेशिया, थायलंड व सिंगापूर या सर्व गैरकम्युनिस्टांना आपल्या घरातून ठाण मांडून बसलेल्या चिनी नागरिकांच्या घरभेदी वृत्तीचे भय वाटत आहे. दुसऱ्या बाजूने अमेरिकन सैन्याशी यशस्वी टक्कर, देऊन शेवटी अखंड झालेल्या व्हिएतनामचेही भय वाटत आहे. आश्चर्य कसे आहे पाहा, देशाच्या अंतरंगात चिनी आहेत व देशाच्या किनाऱ्यावर व्हिएतनामी सैन्य आहे. म्हणजे आतून आणि बाहेरून दोन्ही बाजूंनी लाल बावटयाचे भय आहे, पण मार्क्स कबरीत लोळत असेल अशी परिस्थिती आहे. हे लाल बावटे परस्परांच्याच उरावर बसू पाहात आहेत. म्हणूनच चीनच्या पुढाऱ्याने म्हणजे तेंग सियाओ पिंगने सरळ थायलंडला जाऊन व्हिएतनामच्या साम्राज्यवादाचे भूत दाखविले आहे, तर व्हिएतनामने संपूर्ण आग्नेय आशियातून चिन्यांची हकालपट्टी झाली पाहिजे असा जणू नाराच दिलेला आहे.

चीन आणि व्हिएतनाम यांच्या टकरीत काम्बोडियाचा बकरा मात्र बळी म्हणून कापला जात आहे. अर्थात नोव्हेंबर १९७८ मध्ये सोव्हिएत संघाने व्हिएतनामबरोबर दीर्घ मुदतीचा सुरक्षा करार केला आहे. तेव्हा प्रत्यक्षात चीनचा सुंद आणि सोव्हिएत संघाचा उपसुंद धुंद झाले आहेत व काम्बोडियाचा जीव कासावीस झाला आहे. एका अर्थाने सोव्हिएत संघाने चीनच्या भोवती आपल्या मित्रराष्ट्रांचे जाळे उभे केले आहे. अफगाणिस्तानबरोबर डिसेंबर १९७८ मध्ये, व्हिएतनामबरोबर नोव्हेंबर १९७८ मध्ये व भारताबरोबर सन १९७१ मध्येच सोव्हिएत–करार झाला आहे. आता चीन व अमेरिका यांचा मधुचंद्र उत्साहाने साजरा होत आहे व काम्बोडियाच्या नव्या सरकारनेही सोव्हिएत युनियनच्या किंडरगार्टनमध्ये आपले नाव नोंदविले आहे. काम्बोडियाच्या या करुण कहाणीमुळे जगाने जुनाच धडा नव्याने गिरवला पाहिजे. धडा हा सर्वांना परिचित आहे–दोन बैल जेव्हा एकमेकांशी लढतात तेव्हा जमिनीवरची हिरवळ चक्क तुडविली जाते.

व्हिएतनाम आणि काम्बोडिया यांचे कधी ना कधी जुंपणार, हे परमेश्वर बोलून चुकला होता; पण इतक्या वेगाने सर्व घटना घडतील असे भाकीत कुणीच केले नव्हते. अमेरिकेला या क्रांतीमुळे अथवा उद्रेकामुळे आनंद झाला आहे का ? पोल पोत सरकारने जे अमानुष व राक्षसी अत्याचार केले ते काही समर्थनाच्या लायकीचे नव्हते. तेव्हा व्हिएतनामच्या मदतीने पोल पोतच्या विरोधकांनी जर बंडाचा झेंडा उठविला तर, गैर व्यवहार घडला आहे असे म्हणता येत नाही. इथे उपमा दिली जाते ती बांगला देशाच्या मुक्तियुद्धाची. बांगला देशावर याह्याखानाने केवढे नृशंस अत्याचार केले होते. त्यावेळी अमेरिका व इंग्लंड या दोघांनी मिठाच्या गुळण्या धरल्या होत्या–शेवटी सोव्हिएत युनियनने भारताबरोबर वीस वर्षांचा सुरक्षा करार केला व बांगला देशाच्या मुक्तीयुद्धात महत्त्वाची भूमिका पार पाडली. आताही परत सोव्हिएत संघानेच व्हिएतनामबरोबर करार करून काम्बोडियाच्या क्रांतीला हातभार लावला आहे. एकंदरीत चिन्हे अशी आहेत की, व्हिएतनामी सहकार्याने मांडला गेलेला हा देव तिथल्या प्रजेला पावणार आहे या देवाला उध्वस्त करणे पोल पोतला शक्य नाही; कारण त्या कर्दनकाळाला लोक कधीच विटले आहेत. राजपुत्र सिंहनूक तर काय, दुबळा बाहुला आहे. तेव्हा या भरंवश्याच्या राजपुत्राला टोणगाच होणार, ही सर्वांची खात्री आहे. अमेरिकेच्या कार्टरसाहेबास हे नवे बाळंतपण कितपत परवडेल ?

पंचाईत झालीय ती भारताची. व्हिएतनामने मखरात मांडलेला देवच खरा देव आहे असे मान्य केले तर पेकिंगची भिंत नाराज होईल व व्हिएतनामी आक्रमणाची निंदा केली तर क्रेमलिनचा बुरूज रुसून बसेल. कदाचित आपले विदेशमंत्री पेकिंगचा प्रवास करून परत येतील तेव्हाच यासंबंधीची आपली सरकारी भूमिका उजेडात येईल. तोपर्यंत 'आग्नेय आशियातल्या तणावपूर्ण परिस्थितीची आम्हास काळजी वाटते व सर्व प्रश्न शांततेनेच सुटावेत' अशी पत्रके दिल्लीतून निघत राहतील.

राजपुत्र सिंहनूक कधी न्यूयॉर्कमध्ये तर कधी पेकिंगमध्ये जोगवा मागत हिंडत राहील. शेवटी विजनवासात डोळे मिटून काळाच्या उदरात गडप होईल !

□


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला !**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

## एक भ्रमंती

# जयप्रकाशांचा बिहार कुठे चालला आहे ?

अविनाश सहस्रबुद्धे

जवळजवळ दीड दिवसाचा प्रवास करून मी पाटणा स्टेशनवर उतरत होतो. यापूर्वी जायचं जायचं म्हणूनही जमलं नव्हतं ते आज जुळून आलं होतं. या वेळीही प्लॅटफॉर्मवर गाडी लागेपर्यंत मनात धास्तीच होती. डब्यातल्या सगळ्याच लोकांच्या चेहऱ्यांवर अनेक शंकाकुशंका होत्या. बायका भीतीनं धास्तावलेल्या. सुखरूप घरी पोहोचू की नाही ही प्रत्येकाला काळजी. वर्तमानपत्रामधून बिहार-मधील दंगलीच्या, उसळत्या असंतोषाच्या बातम्या अगदी फ्रंट पेजवर रोजच छापून येत होत्या. जमशेटपूरला स्टेशनवर तुफान दगडफेक. तिकिट-कलेक्टरच्या ऑफिसला आग लावण्याचा जमावा-कडून प्रयत्न. मुजफ्फरपूरला गोळीबार. पाटण्यात दंगल. बसेस आणि मोटारी जाळल्या. पाटणा बंद. आग्र्यात पोलीस व जमावात धुमश्चक्री. आगगाड्यांवर दगडफेक. या झाल्या अगदी ताज्या घटना. राखीव जागांच्या प्रश्नावरून घडलेल्या. बिहारभर अजूनही घडत असलेल्या; पण याशिवायही अनेक भीषण घटना दूरदूरच्या खेड्यापाड्यांतून गेल्या एक-दोन महिन्यांत घडून गेल्या होत्या. आजही घडत होत्या; पण त्यांची बातमी वर्तमानपत्रांमधून कुठे कोपऱ्यात चार-दोन ओळीत आली तर. तीही जिथं अगदी माणसं मेली असतील तिथलीच. बाकी अनेक घटनांकडे वर्तमानपत्रवाल्यांचं दुर्लक्ष होण्याचीच शक्यता जास्त. आल्याच तर फार उशीरा. सगळी सामसूम झाल्यावर.

बिहारमध्येच बेलछीचं अमानुष हत्याकांड घडून गेलं. तिथून खरी सुरुवात झाली. आता फार दूरवरची मजल त्यानं गाठली आहे. त्याचा डोंब रोज एखाद्या गावाला तरी भाजून काढीत आहे. अनेक छोटी छोटी गावं बेचिराख होताहेत. हरिजन आगीत फेकून जिवंत जाळले जात आहेत. बंदुकीच्या गोळ्यांनी त्यांचे प्राण घेतले जाताहेत. वस्त्याच्या वस्त्या उजाड होताहेत. देशोधडीला लागलेली माणसं शहरातून आसरा शोधताहेत; पण तिथे तरी कुठे आहे आसरा ? गावातही परतता येत नाही. गावच्या वेशी बंद झालेल्या, नेहमीसाठी. सोडून आले तेव्हाच. आणि उरलं तरी काय होतं मागं की अगदी जीव धोक्यात घालून तिथं परतावं ? झोपड्यांवरून जमीनदारांचे नांगर फिरलेले. होतं किडूक-मिडूक तेही त्यांच्या गुंडांनी लुटून नेलेलं. शेतातली उभी पिकं कापून काढलेली. नासधूस केलेली. आता होत्या त्या अत्याचारांच्या भेसूर खुणा. निष्पाप जीवांचं इथं-तिथं सांडलेलं रक्त आणि वर्णव्यवस्थेचे, दारिद्र्याचे हजारो वर्षांचे शाप.

बिहारमध्ये हे आता नित्याचंच झालेलं आणि हे सगळं पुरेसं नव्हतं की काय, म्हणून आता 'दलितांसाठी' राखीव जागांच्या प्रश्नानं उग्र रूप धारण केलंय. त्यावरून रोज होणाऱ्या दंगलींच्या कल्लोळात बिहार सापडलाय. पटना, आरा, मुजफ्फरपूर, जमशेटपूर ही या धुमसणाऱ्या आगीची प्रमुख केन्द्रं. इथूनच बिहारभर हा वणवा पसरतोय. आपल्याकडे मराठवाड्यात पसरला तसा. मराठवाड्यात विद्यापीठाचं नामांतर निमित्त झालं व सवर्ण हिंदूंनी दलित जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले त्यातून हेच सिद्ध झाले की, आजही समाजात जातीयतेचे विष खोलवर भिनलेले आहे. बिहारमध्ये अशा एखाद्या निमित्ताचीही गरज भासली नाही. कारण हा प्रश्नच उघड उघड दलितांसाठी असलेल्या राखीव जागांचा होता.

बिहार ही बुद्धाची भूमी. तशीच ती महावीराचीही. इथूनच करुणेचा आणि शांतीचा संदेश साऱ्या जगभर गेला. आता या इति-हासात आणखीही बरीच भर पडते आहे. आता इतिहास सांगतो की, ही जशी बुद्धाची, महावीराची भूमी, तशीच ती हरिजनांवरील अत्याचारांची भूमी. वर्णव्यवस्थेचा बळी ठरलेल्या दलितांची भूमी. हीच भूमी आज वर्णद्वेषाच्या आणि वर्गसंघर्षाच्या तोंडावर येऊन ठेपलेली आहे. पेटत्या असंतोषाला जन्म देते आहे. भविष्यात हा असंतोष तिला कुठे घेऊन जाणार आहे त्याच्या खाणाखुणा आजही तिच्या अंगा-खांद्यांवर सर्वत्र दिसताहेत. खरं तर गेल्या वीस महिन्यां-तील 'दुसऱ्या स्वातंत्र्या'च्या काळात देशात दलितांवरील अन्याय-अत्याचारांच्या घटना सतत घडत आलेल्या आहेत. असंघटित शेत-मजुरांवरही सतत हल्ले होत आहेत. त्यांच्या जमिनी जुलुम-जबर-दस्तीने हिसकावून घेतल्या जात आहेत. दलितांवरील, शेतमजुरां-वरील अत्याचारांच्या अमानुष घटनांनी सारे राजकीय पक्ष व सामा-जिक-राजकीय विचारवंत यांना चक्रावून टाकले आहे. गेल्या दोन महिन्यांतील अगदी ताज्या घटनांकडे पाहिले की असे दिसते की, बिहार तर अशा अत्याचारांची 'उत्सवभूमी' झाला आहे आणि हे इथेच थांबतील याची ग्वाही कुठलाही राजकीय पक्ष देऊ शकत नाहीये.

असे व्हायचे कारण काय ?

जयप्रकाशांच्या 'समग्र क्रांती'च्या आंदोलनाला जन्म देणारा बिहार आज क्रांतीचा पुढचा टप्पा गाठण्याऐवजी तिला पुन्हा मागं नेतो आहे. याचे तरी कारण काय ?

बिहारमधील वाढते अत्याचार वर्गसंघर्षाची नांदी तर ठरणार नाही आहेत ?

या सगळ्या प्रश्नांची उत्तरं बिहारमधील ताज्या घटनांचा, घडामोडींचा मागोवा घेतल्यावरच मिळू शकतील.

## कर्पूरी सरकारला अस्थिरतेचे वरदान

आज देशातील समग्र जीवनच एका खोल अस्थिरतेने ग्रासलेले आहे. संसदीय व्यासपीठावर वावरणाऱ्या व केन्द्रात वा राज्यात अधिकारावर असलेल्या साऱ्या राजकीय पक्षांतील मतभेद, जाहीर झगडे, फाटाफुटी आता चव्हाट्यावर आल्या आहेत. अशा विघटनादर्शक क्रिया दररोजच्या घटना बनल्या आहेत. परिणामी राजकीय पक्ष तर जनतेचा विश्वास गमावून बसलेच आहेत, पण त्यांच्या कामगार-किसान व सांस्कृतिक आघाड्या याही समुदायांच्या विश्वासार्हतेच्या दृष्टीने कमकुमत ठरत आहेत.

बिहारमधील घटनांचा मागोवा घेताना व त्यांचा अन्वयार्थ लावताना बिहारमधील आजची वैशिष्टयपूर्ण परिस्थिती, राजकीय–सामाजिक चित्र व देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचा संदर्भ असा दुहेरी विचार करणे आवश्यक आहे. अशा समग्र विचारातून निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देणे व बिहारचे लोण किंवा पुनरावृत्ती, जी इतरत्र तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्र अशा राज्यांमधून घडत आहे, तिला थोपवण्यासाठी करावयाची दक्षतापूर्ण सिद्धता त्वरित करणे शक्य होणार आहे.

१९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकांत आणीबाणीच्या अरेरावी सत्तेचा जनतेने पराभव केला व त्या वेळी उपलब्ध असलेला एकमेव निवडणूक-पर्याय म्हणून जनता पक्ष केन्द्रात सत्तेवर आला. बिहार-मध्येही तो सत्तेवर आला आणि कर्पूरी ठाकूर मुख्यमंत्री झाले. ते मुख्यमंत्री झाले तेव्हापासूनच त्यांचं मंत्रिमंडळ फार दिवस टिकणार नाही, अशा अफवा पसरायला सुरुवात झाली. आजही तसे बोलले जाते. त्यांचेच सहकारी मंडल यांना मुख्यमंत्री करण्याचा घाट कर्पूरी ठाकुरांच्या विरोधकांकडून, 'जनता'तील असंतुष्ट गटांकडून घातला जातोय; पण कर्पूरी ठाकूर त्यांचे सगळे डावपेच तेवढ्याच खंबीरपणे उधळून लावीत आहेत. कर्पूरी ठाकूर यांचं दुसरं वैशिष्टय असं की, बिहारमधलं समग्र जीवन कितीही अस्थिरतेनं ग्रासलेलं असो, अत्याचारांचा हैदोस जरी तिथं घातला जात असला तरी ते त्याचं फारसं मनावर घेत नाहीत. अशा घटनांवरचं भाष्य त्वरित करायचं, मात्र उपाययोजनेच्या संदर्भात काहीच करायचं नाही, हे त्यांच्या कारभाराचे मुख्य धोरण आहे. लहानपणी पैलवान होण्याची स्वप्नं पहाणारे व डफ वाजवणारे कर्पूरी ठाकूर हे 'नापित' समाजातले. दारिद्र्यात वाढलेले. आजही त्यांची गावात झोपडी आहे. बायको रोज संध्याकाळी गवताचा भारा डोक्यावरून वाहून आणते. वडील अजूनही गावातील राजपुतांची दाढी करतात. अशा एकंदर पार्श्वभूमीवर बिहारमधील दलित-श्रमिकांना, मागास जातीतील लोकांना ते आपले कैवारी वाटले नाहीत तरच नवल. त्यात कर्पूरी ठाकूर हा अत्यंत बोलघेवडा माणूस. त्यामुळे तर त्यांच्या या कैवारीपणाला आणखीनच वजन प्राप्त होते. आज कर्पूरी ठाकूर उत्तरेतले 'अण्णा दुराई' समजले जाताहेत ते याच सगळ्या बळावर. त्यात कर्पूरी ठाकूर हे चरणसिंगांचे कट्टर समर्थक. त्यांच्या गोटातले; त्यामुळे बिहारमधल्या जाटांचाही त्यांना पाठिंबा लाभलेला. तेव्हा 'ठाकूर' मंत्रिमंडळ मधूनमधून घरघर लागूनही अजूनपावेतो टिकलंय ते मागास जनतेच्या आणि जाटांच्या पाठिंब्यावर ! आजच्या अस्थिर जीवनात मागासलेल्या जातींना, दलितांना कर्पूरी ठाकुरांचा आधार वाटतोय. कारण त्यांची जागा घेणारा आज तरी कोणी दुसरा त्यांच्या डोळ्यांसमोर नाही. थोडक्यात आजची ही अस्थिरताच कर्पूरी ठाकूर मंत्रिमंडळाला वरदान ठरली आहे. कर्पूरी ठाकूर मागास जातींना आपले रक्षणकर्ते वाटताहेत आणि उत्तरेतल्या या 'अण्णा दुराई'च्या बिहारचे दुर्दैव असे की, तिथेच आज दलितांवर, शेतमजुरांवर सर्वांत जास्त अत्याचार होताहेत, हे तिथल्या गेल्या दोन तीन महिन्यांतील घटनांचा मागोवा घेतला की लगेच कळते. प्रत्यक्षात बिहारचे सरकार हे दलित-श्रमिकांना संरक्षण देण्यास असमर्थ ठरले असले तरी न्हाव्याचा मुलगा बिहारचा मुख्यमंत्री झाला, याचा अभिमान त्यांना एकीकडे वाटतोय आणि हाच न्हाव्याचा मुलगा इथल्या गब्बर जमीनदारांच्या, सधन वर्गाच्या डोळ्यांत सलतोय. त्यांना त्यांचा तो अपमान वाटतोय.

## वाजिदपूरची हृदयद्रावक कहाणी

बेगुसराय जिल्ह्यातील वाजिदपूर या गावी १५ नोव्हेंबर ७८ हा दिवस उजाडला तोच मुळी गावातल्या लोकांसाठी काळोख घेऊन. हे गाव प्रामुख्याने दलितांचे. त्यांचीच तिथे वस्ती जास्त. त्या दिवशी या गावातील नऊशे माणसांवर एका उन्मत्त जमीनदाराने व त्याच्या माजोरी गुंडांनी जे अत्याचार केले, हत्या, लूटमार आणि बलात्काराचे जे तांडव नृत्य झाले, ते यापूर्वीच्या बेलछी, पथेडा, विश्रामपूर इत्यादी ठिकाणच्या अत्याचारांनाही लाजवणारे होते. इकडे सगळे गाव उद्ध्वस्त केले जात होते, स्त्रियांवर सामूहिक बलात्कार होत होते आणि त्याच दिवशी १५ नोव्हेंबर रोजी वाजिदपूरहून फक्त छप्पन किलोमीटर अंतरावरच्या समस्तीपूरमध्ये याच शोषित-दलित जनतेचे तारणकर्ते कर्पूरी ठाकूर 'राखीव जागां'च्या मोबदल्यात त्यांची मते 'जनता'च्या उमेदवारासाठी गोळा करीत होते !

फक्त नऊशे लोकवस्तीचे वाजिदपूर हे गाव. एकशेबासष्ट कुटुंबांपैकी पंचवीस घरं हरिजनांची, पन्नास विणकरांची, तेली आणि सुतारांची प्रत्येकी तीस-तीस आणि न्हावी, यादव व कानूंची अनुक्रमे पाच, पंधरा आणि सहा. गावातले बहुतेक दारिद्र्यरेषेखाली जगणारे. त्यांच्या जमिनी इथल्या जमीनदारांनी जुलुम–जबरदस्तीने हडप केलेल्या. या जमिनी वाजिदपूर व आसपासच्या गावातील शेतमजुरांच्या 'खतियानी' म्हणजे खतावणीवरच्या जमिनी आहेत; पण जमीनदारांनी त्या काल्पनिक नावांनी– ज्याला ते 'फर्जी' म्हणतात– गणेश, शंकर, विष्णुसारखी देवदेवतांची नावे त्यात येतात– तसेच ज्यांचा ठावठिकाणा नाही अशा व्यक्तींच्या नावावर बळकावलेल्या. वाजिदपूरच्या या गरीब लोकांनी आपल्या जमिनी परत मिळाव्या अशी मागणी केली आणि त्यासाठी वेळ पडल्यास संघर्ष करण्याच्या तयारीला ते लागले. जमीनदारांच्या घशात गेलेल्या त्यांच्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात हीच त्यांची मागणी होती; पण ती उन्मत्त जमिनदारांना कशी मान्य व्हावी ? परिणाम असा झाला की, वाजिदपूर हे सबंध गावच्या गाव उद्ध्वस्त झालं. बेचिराख झालं.

दडपशाही आणि अमानुषतेचा नंगा नाच घातला गेला !

बुधवार, १५ नोव्हेंबर ७८ या दिवशी समस्तीपूर जिल्ह्यातील हसनपूर गावच्या दुर्गाप्रसाद सिंह या सहाशे एकर जमिनीच्या मालकाने ( त्यातली तीनशे एकर वाजिदपूर आणि आजुबाजूच्या गावातील शेतमजुरांची बळकावलेली ) चारशे गुंड आणि हत्यारांनी भरलेले ट्रक, ट्रॅक्टर्स घेऊन वाजिदपूरच्या दिशेने कूच केले. दुर्गाप्रसादची ही फौज दुपारी बारा वाजता वाजिदपूर गावात शिरली आणि त्यांनी बेसावध गावकऱ्यांवर, हाती लागतील त्या बायका-मुलांवर क्रूर हल्ले केले. काठ्या, बंदुका घेतलेले चारशे गुंड तब्बल पाच तास गावावर अक्षरशः तुटून पडले होते. त्यांचे हे आक्रमण संध्याकाळी पाच वाजताच शांत झाले. जोगेश्वर साहू हा त्यांच्या या आक्रमणाची शिकार ठरला. त्याला इतके बेदम मारण्यात आले होते की, दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये तो मरण पावला. गुंडांनी वाजिदपूर गावातून पन्नास बैलांच्या जोड्या, आठ म्हशी, जवळजवळ शंभर गायी आणि तीनशे बकऱ्या व शेजारच्या बटराहा वस्तीतून शंभरएक गुरे–ढोरे जाताना बरोबर नेली. शिवाय घराघरातलं सामान, भांडी–कुंडी, कपडे, धान्य मिळेल ते घेऊन गेले! शिजवलेल्या अन्नाचीही त्यांनी नासधूस केली आणि हे सगळे कमी होते म्हणून की काय, ते जाताना गावातल्या एकुलत्या एक विहिरीत विष टाकून गेले ! खायला तर त्यांनी काही शिल्लक ठेवले नाहीच, पण पाणीही नासवून टाकले !

हल्लेखोरांनी या पाच तासांत दिसेल त्या स्त्रीवर बलात्कार करून आपल्या पाशवीपणाचे प्रदर्शनच केले. गांगोरायच्या अठरा वर्षांच्या मुलीवर–मंजूवर तर किती तरी जणांनी अंगणातच बलात्कार केला. ओरखड्यांनी तिचे सगळे शरीर रक्तबंबाळ केले. अतहदासच्या गर्भार बायकोला या हैवानांनी दया-माया दाखवली नाही.कैकजणांच्या पाशवी बलात्काराने ती बेशुद्ध पडली. तिचा गर्भपात झाला ! अशी किती उदाहरणे सांगायची ? येवढे करूनही त्यांची वासना शमली नव्हती म्हणून की काय, ते जाताना रक्तबंबाळ मंजूला बरोबर घेऊन गेले. तिच्यावर त्यांनी काय काय अत्याचार केले असतील याची कल्पनाही करवत नाही. नंतर काही दिवसांनी तिला शोधून काढण्यात पोलिसांना यश मिळाले. सापडल्यावर तिने बलात्कार करणाऱ्यांची नावे सांगितली आणि आपली रक्ताने भिजलेली साडी पोलिसांच्या हवाली केली. नंतर पोलिसांनी वाजिदपूर प्रकरणात तेरा जणांना पकडले. वीसजण आपणहून पोलिसांच्या हवाली झाले. या सगळ्यांना कोर्टात हजर केले गेले आणि त्याच दिवशी त्यांना जामिनावर सोडूनही दिले गेले. त्यातल्या काहीजणांनी वाजिदपूरला परतणाऱ्या लोकांना धमक्या दिल्या आहेत की, 'गावात पाय तर टाका, आता तुम्हाला जिवंतच जाळू!' जे पळून गेले नव्हते, गावातच राहिले होते तेही घराबाहेर पडायला घाबरतात. इतके दहशतीचे वातावरण अजूनही आहे. कारण सरकारने गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ज्या पोलिसांचा पहारा वाजिदपूरवर बसवला आहे ते पोलीसच जमिनदारांकडचा पाहुणचार घेण्यात मश्गुल आहेत. असले पोलीस गावकऱ्यांना कसला दिलासा देणार ?

वाजिदपूरची ही घटना झाल्यावर पाटणामधल्या दैनिकांनी तिला प्रसिद्धी द्यायची नाही असे ठरवले होते; पण सी. पी. आय्. च्या 'जनशक्ती'ने सगळा वृत्तांत छापला आणि ही करुण कहाणी उजेडात आली. ही कुठली लोकशाही आहे ? 'दुसरे स्वातंत्र्य' मिळाल्यानंतर आणि वृत्तपत्रांवरचे सगळे निर्बंध दूर झाल्यावरही ही स्थिती आहे !

## कैलातील हत्या

बिहारमध्ये दलितांवरील अत्याचाराच्या घटना इतक्या एकामागोमाग एक घडताहेत की काल घडलेली घटनाही आज जुनी वाटावी. सगळ्या घटना हेच दर्शवितात की सधन वर्ग संघटित होऊन गरीब शेतमजुरांवर, भूमिहीन लोकांवर अत्याचार करतो आहे. त्यात हरिजन अधिक भरडले जाताहेत; पण या घटना एक सत्य हेही सांगतात की, अत्याचार करणारे प्रथम श्रीमंत असतात. मग कुठल्या विशिष्ट जातीचे. त्यांच्यात जसे उच्च जातीतले आहेत तसेच मागासलेल्या जातींमधलेही आहेत; पण हे सगळे प्रामुख्याने सधन वर्गात मोडणारे.

वाजिदपूरचीच पुनरावृत्ती कैला या गावी नुकतीच घडून गेली आहे. तिथे तीन व्यक्तींचा अमानुषपणे बळी घेण्यात आला.

कैला हे पाटण्यापासून चाळीस किलोमीटर अंतरावरचं नालंदा जिल्ह्यातलं अगदी छोटसं गाव. बहुतेक वस्ती हरिजनांची. त्यातही 'दुसाध' या डुकरं पाळणाऱ्या जातीतले लोक जास्त. आजूबाजूच्या गावातून कुर्मी (कुणबी) लोकांचं वर्चस्व. त्यांचा दबदबा नेहमीच हरिजनांवर रहात आलेला. तेही दबदबा कायम रहावा या प्रयत्नात नेहमी असलेले. गावातल्या लोकांच्या म्हणण्यानुसार कैलाची घटना ही जमिनीच्या संघर्षातून उद्‌भवलेली. हरिजनांनी संघटित होऊन कुर्मींच्या वर्चस्वाला, अन्यायाला विरोध करायचे ठरविले आणि त्यातून पुढचे हत्याकांड घडले.

कैलापासून थोड्या अंतरावर असलेल्या बावीस एकर जमिनीचा खटला गेली पंचवीस वर्षे कोर्टात चालू आहे. या खटल्यात हरिजनांकडून खीरू दास आणि कुर्मींकडून रामजी महतो हे प्रामुख्याने लढताहेत. या खटल्याच्या संदर्भात अनेक गोष्टी बोलल्या जातात. काही जणांचं म्हणणं, खटला कुर्मी लोकांनी जिंकला आहे, तर काहींचं म्हणणं निकाल हरिजनांच्या बाजूने लागला आहे. एवढं मात्र खरं की, गेली अनेक वर्षं या जमिनीवरून दोघांच्यात तंटा चालू आहे. कधी जमीन हरिजन कसायचे, तर कधी कुर्मी; कारण जमिनीवर दोघांचाही दावा आहे. ही तेढ वाढत गेली आणि सात डिसेंबरला कैलातील काही हरिजनांना कुर्मींनी घेरले व त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. हाती लागले त्यांना फरफटत, मारत नेलं गेलं. त्यात रामचंद्र पासवान घायाळ झाले. महतो कुटुंबातील माणसाने बंदूक चालवली आणि गोळी त्यांच्या पायात घुसली. गेले कित्येक महिने एक सबइन्स्पेक्टर व सहा सशस्त्र पोलीस यांची नेमणूक गावात

**'दुसरं स्वातंत्र्य' मिळालं पण परिस्थितीत बदल नाही !**

मुद्दाम केलेली असूनही हरिजनांचे प्राण धोक्यात येण्याचा हा प्रकार घडला. आश्चर्य म्हणजे त्यानंतरही पोलीस सावध राहिले नाहीत आणि दोनच दिवसांनी, ९ डिसेंबरला कैलाचे हत्याकांड घडून आले. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे हरिजनांवर अनर्थ ओढवला आणि तिघांचा बळी गेला!

त्या दिवशी धानी मांझी नेहमीप्रमाणे गावाबाहेर गुरांना चरायला घेऊन गेला. एकाएकी हातात धारदार हत्यार आणि काठचा घेतलेल्या समूहाने त्याला चारी बाजूंनी वेढले व त्याच्यावर काठचांचा मारा केला. त्याला प्रतिकार करायची संधीही मिळाली नाही. काही सेकंदातच तो जमिनीवर कोसळला! तो पडल्यावर तीक्ष्ण शस्त्राने कापून त्याचं मुंडकं धडापासून वेगळं केलं गेलं आणि धड फरफटत थोड्या अंतरापर्यंत नेलं गेलं. त्याच्या खुणा नंतरही तिथे होत्या. कापलेलं मुंडकं अकरा डिसेंबरला पोलिसांना शेजारच्या सुलेमानचक गावातील तळचात सापडलं.

हे घडलं तेव्हा गावात फार थोडे लोक होते. बहुतेक काम-धंद्यावर गेलेले. चौकीदार बाल गोविंदाने मात्र झाला प्रकार पाहिला आणि त्याने पळत जाऊन गावातल्या सुरक्षा अधिकाऱ्याला खबर दिली; पण त्याने तिकडे कानाडोळा केला. उलट त्यालाच 'खोटं बोलतोयस' असे दटावले. खात्री वाटत नसेल तर पुन्हा जाऊन नीट पाहून ये, म्हणून सांगितले. तो बिचारा पुन्हा त्या जागेवर आला—जिथे धानी मांझीला मारले होते. आणि आपसूक गुन्हेगारांच्या तावडीत सापडला. त्याचीही दिवसाढवळ्या क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्याच्या हत्येची बातमी त्याच्या तरुण मुलाला—डोयनला—कळली आणि तो संतापाने पेटून तिकडे धावला. गुन्हेगारांना पहाताच त्याला एकंदर परिस्थितीची कल्पना आली आणि तो मागे फिरला; पण गुन्हेगारांनी त्याला गाठलेच आणि फरफटत आणले. बापाची जी गत झाली तीच मुलाचीही झाली. एकाच जागेवर दोघेही मारले गेले!

गावात मुद्दाम तैनात केलेला पोलिसफाटा असूनही काही तासांत तीन माणसांचे बळी घेतले गेले! याचाच अर्थ पोलिसांनी जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष केले. नंतर त्यांना तिथून काढून दुसरीकडे त्यांची बदली केली गेली. कदाचित सस्पेंडही केले गेले असेल; पण त्याने काय होणार? गुन्हेगारांना त्वरित शासन व्हायला पाहिजे, ते तर अजून त्यांची नावं कळूनही झालेलं नाही. कधीच होणार नाही; असं गावात बोललं जातंय! मृत्युमुखी पडलेल्या तिन्ही व्यक्तींच्या विधवांनी ज्यांच्यावर खुनाचा आरोप ठेवलाय त्यांची नावं आहेत— गंगा महतो, मुन्ना, किशोरी महतो, रामजी महतो व हरिनारायण महतो. सगळे कुर्मी जातीतले आणि धनाढ्य कुटुंबातले आहेत. कायद्यालाही विकत घेण्याची शक्ती त्यांच्यात आहे!

बळी ठरलेल्या धानी मांझी मागे त्याची विधवा पत्नी फनिमूर्ती आणि एक मुलगी आहे. बालगोविंदाची पत्नी रामरतिया आता विधवा म्हातारी आहे आणि तिची सून तरुण विधवा जिला दोन मुलं आहेत, यांना आता आधार कोणाचा नाही. या तिन्ही विधवांना एक—दोन वर्षं नाही तर सगळं उभं आयुष्य काढायचंय आणि सरकारने त्यांना प्रत्येकी फक्त तीन हजार रुपये देण्याचं आश्वासन दिलं आहे. सरकारने मानवी जीवाची किंमत फक्त तीन हजार रुपये करावी? का ते जीव दारिद्र्यात जगणारे होते म्हणून त्यांची किंमत इतकी कमी?

## उन्मत्त मठाधीशाचे अत्याचार

मुजफ्फरपूरहून चौदा किलोमीटरवर एक छोटसं रेल्वेस्टेशन आहे— तुरकी. स्टेशनाच्या अगदी जवळच तुरकी कबीरा मठ आहे आणि मुजफ्फरपूरहून येणाऱ्या सडकेपाशी आहे रामजतनबाबाने वसवलेली रामजतन हरिजन कॉलनी. या कॉलनीत एकूण बेचाळीस घरे आहेत आणि त्यात रहाणारे सगळे हरिजन दुसऱ्यांच्या जमिनीत काम करणारे शेतमजूर आहेत. बारा नोव्हेंबर रोजी पहाटे साडेचार वाजता काळोखातच आकांत कोसळला! कबीरामठाचे मठाधीश गिरिजानंदन वीस-पंचवीस दणकट गुंडांना घेऊन आले व त्यांनी कॉलनीत अक्षरशः धिंगाणा घातला. झोपलेल्या लोकांवर हल्ला केला. लोक जीव घेऊन पळू लागले. बायका—मुलं, जी आत राहिली त्यांनी दारं बंद करून घेतली. दारं, भिंती मोडून त्यांना बाहेर काढण्यात आले व बेदम मारहाण केली गेली. वसाहतीतून पळालेल्या लोकांनी रामजतनबाबाला सगळी हकीगत सांगितली आणि ते त्यांना घेऊन आले. रामजतनबाबाला पाहिल्यावर तर मठाधीशाचा संताप अनावर झाला. कारण त्यानेच या हरिजनांना जमीन दिली होती. घरं बांधून दिली होती. मठाधीशाने हातातील बंदुकीच्या गोळ्या झाडल्या. लोक जागा दिसेल तिकडे पळू लागले. रामजतनबाबाला पहिली गोळी लागली आणि ते खाली पडले. त्यांना उचलण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही गोळ्या झाडल्या गेल्या. एक-एक करत तेही जमिनीवर कोसळले. गोळी लागून घायाळ झालेल्यांना नंतर लगेच हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. वसाहतीत कोणीच उरले नाही. तेव्हाच मठाधीश आणि त्याचे पाळलेले गुंड परत गेले!

इथल्या हरिजनांनी या पूर्वीही गिरिजानंदनच्या जुलमाला कंटाळून पोलिसात, सरकारदरबारी तक्रारी केल्या होत्या; पण त्यांचा काही उपयोग झाला नव्हता. या वेळीही त्यांना खात्री होती की, आपल्याला न्याय मिळणार नाही; पण तरीही त्यांनी पोलिस-चौकीत कंप्लेंट नोंदवली. गावातल्या लोकांनी आणि नोकरीपेशातील अधिकाऱ्यांनी हरिजनांच्या बाजूने कोर्टात साक्षी देऊनही अजून मठाधिशावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही.

मठाधीशाकडून हरिजनांवर झालेला हा काही पहिला अत्याचार नाही. यापूर्वी अनेक वेळा असे अत्याचार झालेले आहेत. त्याच्या शोषण आणि क्रूर कर्मांचा एक प्रदीर्घ इतिहास आहे जो आजूबाजूच्या पंचक्रोशीतल्या लोकांना ठाऊक आहे. एक्कावन साली ते या तुरकी कबरा मठाचे मठाधीश झाले. आज त्यांच्याकडे मठाच्या नावाखाली हजार एकराहून जास्त जमीन आहे, हरिवासा मठाची चारशे एकर, शिशवार मठाची दोनशे एकर, समस्तीपूर मोसवर मठाची पंधरा एकर, मुजफ्फरपूर तुरकी मठाची चारशे एकर आणि चतरपट्टी मठाची अठरा एकर. एवढ्या प्रचंड जमिनीचा गिरिजानंदन हा स्वामी आहे. साहजिकच त्याचं सरकारदरबारी वजन आहे. धर्माच्या नावाखाली त्यांनी भाविक लोकांनाही आपल्या प्रभुत्वाखाली ठेवले आहे. त्यांची ही 'ताकद' माहीत असल्यामुळेच निवडणुकीच्या काळात त्यांना बरेच महत्त्व प्राप्त होते. राजकारणी लोकांची त्यांच्याकडे त्या वेळी रीघ लागते. हरिजन वसाहतीतली ही घटना घडून गेल्यावर, त्यांच्यावर कोर्टात केस चालू असताना आणि त्यांच्या विरुद्ध स्थानिक लोकांकडून मोर्चे काढले गेल्यावरही चार

नोव्हेंबरला मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर प्रशिक्षण महाविद्यालयाच्या उद्‌घाटनासाठी गावात आले असताना समारंभाच्या वेळी व्यासपीठावर हाच निर्लज्ज मठाधीश बसलेला लोकांनी पाहिला होता. असे आहे सगळे तर हरिजनांनी न्यायाची अपेक्षा तरी का करावी ?

दलितांवरील श्रमिकांवरील अत्याचारांची ही काही उदाहरणे सांगितली. बिहारमध्ये बेलछी ते कैलापर्यंत या हिंसाचाराने, अत्याचारांनी एक दीर्घ प्रवास गेल्या वीस महिन्यांत केला आहे. होणारा बहुतेक हिंसाचार दलित व श्रमिक विभागांच्या स्वतःच्या न्याय्य हक्कांसाठी, आकांक्षांसाठी चाललेल्या प्रयत्नांविरुद्ध झालेला दिसतो.

बिहारमधल्या या वाढत्या अत्याचारांचा मागोवा घेतला तर असे दिसते की, त्यांचे मूळ प्रामुख्याने जमिनीच्या संघर्षात आहे— आणीबाणीच्या काळात समाजातील दुर्बल घटकांसाठी म्हणून जी काही अर्धवट पण निश्चित अशी पाऊले टाकली गेली. उदाहरणार्थ, कमाल मर्यादा आणून अतिरिक्त जमिनीचे वाटप, घरांसाठी जागा, व्यापाऱ्यांवर वचक-निर्बंध, त्यामुळे जुना जमीनदारवर्ग व बडा शेतकरी हे दुखावले गेले होते. बिहारमध्ये तर असा सरंजामी वर्ग मोठ्या प्रमाणावर अजूनही आहे. १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत आणीबाणीच्या अरेरावी सत्तेचा जनतेने पराभव केला व त्या वेळी उपलब्ध असलेला एकमेव निवडणूक पर्याय म्हणून जनता पक्ष सत्तेवर आला. अरेरावीचा अंत करण्यासाठी होकारात्मक व राजकीय पर्याय म्हणून नकारात्मक, असे जरी या मतदानाचे स्वरूप असले तरी जनता सरकारच्या स्थापनेनंतर आणीबाणीत दुखावलेला, विशेषतः उत्तर व पूर्व भारतातील संपन्न जमीनदार व मोठा शेतकरी नवे राज्य आणले आहे, असे बोलू व वागू लागला. त्यामुळे नकळतच दलित-श्रमिक विरोधी वातावरण तापू लागले. वाटप केलेल्या जमिनी परत घेण्याचे प्रकार घडू लागले. सरंजामदारांकडून शेतमजुरांचे वाढत्या प्रमाणावर शोषण होऊ लागले. अशा परिस्थितीत दलित, भूमिहीन, शेतमजूर व एकूण कष्टकरी वर्गाची जागृत झालेली अस्मिता वाढण्याचा क्रम देशभर अनेक वर्षे बळावत होता ती आता धारदार व टोकदार, तीक्ष्ण बनू लागली. ताब्यातील जमीन सोडायला नकार, जमीनदारांनी जुलूमजबरदस्तीने बळकावलेल्या जमिनी परत मिळवण्यासाठी संघर्ष, किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी हालचाल इत्यादींतून दलितांच्या–श्रमिकांच्या अस्मितेचे नवे आविष्कार घडू लागले. बिहारमध्येही हेच झाले व होत आहे. तिथे या संघर्षाने अधिक उग्र रूप धारण केले. कारण तिथे आजही जमीनदार वर्गाचे वर्चस्व मोठ्या प्रमाणावर आहे व हा जमीनदार वर्ग, जुन्या सरंजामी मूल्यांमध्ये वाढलेला सधन वर्ग, दलित-श्रमिकांच्या अस्मितेचा हा नवा आविष्कार पाहून पेटून उठला, त्यांच्या बळकावलेल्या जमिनी त्यांना परत देण्यास नकार देऊ लागला. त्यासाठी हिंसाचार, अत्याचाराचा मार्ग त्याने चोखाळला. बेलछीपासून अगदी नुकत्याच घडलेल्या कैलापर्यंतच्या घटना हेच सांगतात. हे प्रकार जमिनीच्या तंट्यांतूनच घडले. गेल्या दीड-दोन वर्षांतील दलितांवरील अन्याय-अत्याचाराच्या सर्व घटनांच्या खोल अभ्यासातून हेच निष्कर्ष निघतात.

बिहारमधील या वाढत्या अत्याचारांचे स्वरूप पाहिले की, खरोखर आपण कोणत्या जगात वावरतो आहोत असे वाटू लागते. माणसांची हत्या होते, ती जिवंत जाळली जातात, त्यांच्या घरांवरून नांगर फिरतात, स्त्रिया बलात्कारिल्या जातात आणि त्यांची मरणोत्तर किंमत तीन-चार हजारांत केली जाते. गुन्हेगारांना शासन होण्याऐवजी अभय मिळते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी असलेले पोलीसच दलितांच्या-श्रमिकांच्या आंदोलन, संघर्ष हक्कांवर आक्रमण करतात आणि राजकीय पक्ष त्यांची मतं कशी मिळतील या विवंचनेत असतात. जर हेच 'दुसरे स्वातंत्र्य' असेल तर आता 'तिसऱ्या स्वातंत्र्या'ची गरज आहे आणि ते तरी जीवन जगवण्याचे व ते विकसित करण्यासाठी धडपडण्याचे साधेसुधे स्वातंत्र्य असेल याचीही काय शक्यता ?

## राखीव जागांचा प्रश्न

बिहारमध्ये जसे जमिनीच्या संघर्षातून, तंट्यातून दलित-श्रमिकांवर अत्याचार होताहेत तसेच जवळजवळ सगळ्या बिहारभर जातिनिहाय राखीव जागांच्या प्रश्नावरूनही दंगे उसळले आहेत. बिहारचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांनी जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांचा हवाला देऊन नोकऱ्यांमधील राखीव जागांच्या संदर्भात असे धोरण जाहीर केले की, मागास जातींना सरकारी नोकऱ्यांपैकी २६ टक्के जागा राखून ठेवण्यात येतील. बिहारमध्ये याआधीच २४ टक्के राखीव जागा म्हणून हरिजन व आदिवासींसाठी राखून ठेवलेल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी हेही सांगितले की, २६ टक्के याआधीच्या २४ टक्के शिवायच्या राखीव जागांची अंमलबजावणी सरदार वल्लभभाई पटेल व आचार्य नरेन्द्र देव यांच्या जयंतीपासून म्हणजे ३१ ऑक्टोबर ७८ पासून केली जाईल. या २६ टक्के जागांपैकी २० टक्के मागास जातींसाठी, ३ टक्के आर्थिक दृष्ट मागासलेल्यांसाठी व उरलेल्या ३ टक्के स्त्रियांसाठी असतील. राखीव जागांचे हे धोरण जाहीर होताच मागास जातींच्या संघटनांनी व नेत्यांनी त्याचे स्वाभाविकपणेच स्वागत केले तर वरिष्ठ जातींनी, उच्च वर्णीय लोकांनी या धोरणाविरुद्ध चळवळ सुरू केली आणि आज या चळवळीने बिहारभर जातीय दंग्याचे थैमान घातले आहे. समर्थक व विरोधक यांच्यात धुमश्चक्री सुरू झाल्याने पोलिसांना लाठीहल्ले, गोळीबार करावे लागले. शाळा-कॉलेजेस तर कित्येक दिवस बंद होती. विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान झाले. बिहारभर दहशतीचे वातावरण निर्माण झाले व सर्वसामान्य माणसाचे दैनंदिन जीवन पाटणा, मुजफ्फरपूर, आरा इत्यादि शहरांमध्ये सशस्त्र पोलिसांच्या गराड्यातच सुरू ठेवणे शक्य होते, एवढा हा संघर्ष तीव्र होता. ज्या मतदारसंघातल्या मतदारांनी जॉर्ज फर्नांडिसना न पाहताच चार लाख इतक्या प्रचंड मतांनी निवडून दिले होते त्याच मुजफ्फरपूरमधून मुख्यमंत्र्यांच्या राखीव जागांच्या धोरणाचे स्वागत केले म्हणून, भाषण अर्धवट टाकून व चपला-बुटांचा मारा चुकवीत जॉर्जला पळून जावे लागले. या एका उदाहरणावरूनही बिहारमध्ये

**आज बिहार जातीय आणि वर्गीय संघर्षाच्या आवर्तात सापडला आहे.**

जातिनिहाय राखीव जागा हा किती जिव्हाळ्याचा विषय झाला आहे याची कल्पना येऊ शकेल. पटण्यातल्याच एका जाहीर सभेत लोकनायक जयप्रकाश नारायण व्यासपीठावर असताना दगड फेकले गेले. यावरूनही बिहार या प्रश्नाने किती अशांत झाला आहे हे ध्यानात येईल.

नोकऱ्यांमधील राखीव जागांचे हे नवे धोरण जाहीर करण्यामागे कर्पूरी ठाकूर यांचा मुख्य उद्देश १९७७ च्या लोकसभा निवडणुकी-नंतर अधिकारारूढ झालेल्या जनता पक्षाला मागास जातींचा पाठिंबा मिळवणे हा आहे. बिहारमध्ये वरिष्ठ जातींपैकी ब्राह्मण व दलित जातीतील एका मोठ्या वर्गाला इंदिरा गांधी जवळच्या वाटतात व व त्यांनी त्यांना पाठिंबा आहे आणि या शक्तीला शह देण्यासाठी मागास जातींचा अनुनय कर्पूरी ठाकूर करीत आहेत. त्यासाठी त्यांनी राखीव जागांचे आमीष त्यांना दाखवले आहे. स्वतःच्या सरकारची गेल्या दीड-दोन वर्षांतली जी दिवाळखोरी जाहीर झाली आहे तिच्यावरून लोकांचे लक्ष विचलित करून ते या जातीय संघर्षा-वर केन्द्रित करणे, हाही त्यातला एक डावपेचाचा भाग आहे. नाही तर प्रत्यक्षात या जाहीर केलेल्या राखीव जागांपैकी प्रत्यक्षात किती जागा दलित-मागास जातींना मिळतात हे आपण जाणतोच. ते आता उघड गुपित झाले आहे.

बिहारमधल्या वरिष्ठ जातीत प्रामुख्याने ब्राह्मण, कायस्थ, राजपूत व भूमिहार या जाती मोडतात तर मागास जातीत यादव, कुर्मी, कोअरी या प्रमुख जाती व वैश्य, धानुक, तेली इ. इतर जाती येतात. वरिष्ठ जातींचे लोकसंख्येतले प्रमाण सुमारे तीस टक्के आहे तर मागास जातींचे सुमारे चाळीस टक्के. दलित जातींचे प्रमाण चौदा टक्के व आदिवासींचे प्रमाण दहा टक्के आहे. याचा अर्थ असा की, जातींच्या या तीन गटांपैकी मागास जातीचे लोकसंख्येतील प्रमाण सर्वात जास्त आहे. गेल्या काही वर्षांत जमिनी बळकावून व आधुनिक प्रकारे शेती करून या जाती सधन व समर्थ बनलेल्या आहेत. विधानसभा व आर्थिक मोक्याच्या जागा यातले त्यांचे वर्चस्वही वाढत आहे. त्यामुळे या मागास जातींमधील यादव, कुर्मी या सधन वर्गाचे हितसंबंधच राखीव जागांच्या आंदोलनाच्या पुढारी-पणामागे आहेत. या चळवळीचे भांडवल करून हा वर्ग आक्रमक-रित्या पुढे सरसावतो आहे. वर उल्लेखिलेल्या हरिजनांवरील अत्या-चारांच्या प्रकरणातही हाच वर्ग आघाडीवर होता. दलितांवर व भूमिहीनांवर, मोलमजुरी करणाऱ्या शेतमजुरांवर गेली काही वर्षे हा सधन वर्ग सतत हल्ले करतो आहे. **थोडक्यात, मागास जातींच्या नावाखाली स्वतःचे वर्गीय हित साधणारी अशी ही राखीव जागा-वाद्यांची चळवळ आहे. पांढरपेशा नोकऱ्यांमध्ये प्रभुत्व असणाऱ्या व जुने सरंजामी हितसंबंध जपणाऱ्या वरिष्ठ जातींविरुद्ध नव्याने सधन झालेला, जमिनी ताब्यात आलेला, गरीब व मागास जातीं-वरही वर्चस्व असलेला यादव-कुर्मी इत्यादींचा नवश्रीमंत व आक्रमक थर यांच्यातला हा संघर्ष आहे. सर्वसामान्य मागास माणूस या सगळ्याच्या बाहेर आहे. त्याला यापूर्वीही २४ टक्के राखीव जागां-मुळे काही फायदा झालेला नाही आणि नव्याने मिळालेल्या २६ टक्के जागांचा होईल याची खात्री नाही.**

## झारखंड चळवळ

झारखंड चळवळीचा इतिहास जरी फार जुना असला तरी 'स्वतंत्र झारखंड'च्या मागणीसाठी गेली काही वर्षे बिहार, ओरिसा, बंगाल व मध्य प्रदेश या चार प्रांतांत आंदोलने होत आहेत. विशेषतः बिहारमध्ये इतर प्रांतांच्या मानाने झारखंड चळवळ ही अधिक जोमाने चालू आहे. ऑक्टोबर १९७७ मध्ये या चळवळीसाठी एका संघर्ष समितीची स्थापना झाली. होरो सुम्ब्रुई आणि उरोव यांच्या पुढाकाराने या समितीची स्थापना झाली व त्यानंतर आणीबाणीनंतर 'स्वतंत्र झारखंड'ची मागणी विशेष करून जोर धरू लागली. त्यासाठीची चळवळ तीव्र होत गेली. आज दिवसेंदिवस आदिवासींनी त्यासाठी चालवलेला संघर्ष वाढतोच आहे.

एकूण सोळा जिल्हे मिळून झालेल्या भागाला झारखंड म्हटले जाते. हे सर्व जिल्हे बिहार, ओरिसा, बंगाल व मध्य प्रदेश या निरनिराळ्या प्रांतात वाटले गेलेले आहेत. हे सर्व सोळा जिल्हे एकत्र करून स्वतंत्र राज्य निर्माण करावे अशी या झारखंड चळवळीमागची प्रमुख मागणी आहे. या सोळा जिल्ह्यांमधले मूळ निवासी जे आदिवासी आहेत ते ही मागणी करीत आहेत व त्यासाठी चळवळ उभारत आहेत. हे सर्व आदिवासी जवळजवळ दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी या भागात आले व त्यांनी इथे वस्ती केली. गावं वसविली. सिंहभूम, वराहभूम, छोटा नागपूर हे त्यातले महत्त्वाचे भाग. आदिवासींसारखेच झारखंड-मधले दुसरे मूळ निवासी नाग जातीचे लोक आहेत. तेव्हा आदिवासी आणि नाग या इथल्या मूळ निवासी लोकांना त्यांचा स्वतंत्र प्रांत हवा आहे व त्यासाठी ते झारखंड चळवळ चालवीत आहेत.

इथल्या आदिवासींचे शोषण पूर्वापार होत आहे. त्यांच्या जमिनी सरकार आणि सावकाराच्या घशात गेलेल्या आहेत. या भागात पन्नास-साठ वर्षांपूर्वी खाणी सुरू झाल्या तेव्हा ह्याच आदिवासींना गुलामाप्रमाणे खाणीवर राबवण्यात आले आणि नंतर त्यांची गरज संपल्यावर त्यांना दूर करण्यात आले. झारखंड प्रांतात सरकारने ज्या मोठमोठ्या योजना, प्रकल्प हाती घेतले आहेत तेथे पूर्वी आदिवासी रहात असत; पण सुधारणेच्या नावाखाली हजारो आदिवासी कुटुंबांची सरकारने तेथून हकालपट्टी केली. या सगळ्याचा परिणाम आज असा झालाय की, आदिवासींचा विरोध, संघर्ष अधिकाधिक कडवा होत चालला आहे. हिंदू धर्मापेक्षा त्यांचा स्वतःचा वेगळा धर्म व वेगळी संस्कृती असल्यामुळे त्यांना वेगळा आदिवासी कायदा, मातृभाषेतून शिक्षण व स्वतंत्र झारखंड प्रांत या गोष्टी हव्या आहेत. झारखंड हा भाग चार वेगवेगळ्या प्रांतांमध्ये तुटलेला असल्यामुळे व इतरही अनेक कारणांमुळे असा वेगळा प्रांत करणे कितपत शक्य आहे व अशा प्रकारची मागणी योग्य आहे का – कारण आदिवासी फक्त झारखंडमध्येच नाहीत तर देशात इतरत्रही सगळीकडे आहेत या गोष्टी जरी बाजूला ठेवल्या तरी इतके खरे की, आज ही मागणी जोर धरत आहे. त्यासाठी चाललेली आदिवासींची चळवळ तीव्र होत आहे. उद्या तिचे पडसाद देशभर उमटले तर नवल वाटू नये.

## सिंहभूम जंगलातले आदिवासी

सिंहभूम हा झारखंडाचाच एक भाग. दाट अरण्य असलेला. इथल्या आदिवासींची जशी स्वतंत्र झारखंडाची मागणी आहे, तशाच त्यांच्या

आणखीही काही मागण्या आहेत. सिंहभूममधले हेच आदिवासी 'जंगल तोडा' आंदोलन चालवीत आहेत व जंगलातील सागाची झाडे तोडण्याची मोहीम त्यांनी हाती घेतली आहे. झारखंड चळवळी-सारखीच आदिवासींची सागाची लागवड नष्ट करण्याची ही मोहिमही बिहार सरकारची डोकेदुखी होऊन बसली आहे. अर्थात या डोकेदुखीला बिहार सरकार स्वतःच कारणीभूत आहे.

आदिवासींच्या या 'जंगल मुक्ती' आंदोलनात ओरिसाच्या हद्दीला लागून असलेल्या सिंहभूम जंगलातली सागाची लागवड नष्ट केली जात आहे व दुसऱ्या बाजूला रांचीच्या आसपासच्या सिंहभूम जंगलात आगी लावल्या जात आहेत. सागाची झाडं तोडण्याची मोहीम गेल्या १२ सप्टेंबरपासून जोर धरत आहे. त्यातही विशेषत: कुंडरू रेंज, संतरा रेंज या देशातलं अत्यंत महत्त्वाचं समजलं जाणारं दाट जंगल सेरेंडात ही चळवळ जास्त मोठ्या प्रमाणात चालू आहे.

खरं म्हणजे जंगल–विकासाच्या नावाखाली जंगलविनाशाचं बीजारोपण वनविकास मंडळानेच काही वर्षांपूर्वी करून ठेवले होते. त्या वेळी शाल, करंज आणि महुआची झाडं तोडून शंभर-शंभर, पन्नास-पन्नास एकरांच्या सुरक्षित जागेत सागाची लागवड वन-अधिकाऱ्यांकडून केली गेली. सागाचं लाकूड खूप महागडं व इमारती व फर्निचरसाठी उत्कृष्ट असलं तरी आदिवासींच्या दैनंदिनी जंगलात सागाच्या झाडांचा तसा काही उपयोग नाही. त्याउलट शाल, करंज आणि महुआची झाडं, पानं, मुळं ही आदिवासींना वेगवेगळ्या प्रकारे उपयोगी पडतात. खायला, विकायला आणि जळणासाठी तर त्यांचा उपयोग होतोच, पण ती औषधी सुद्धा असतात. त्यात पुन्हा सागाची जिथे लागवड होते तिथे आजूबाजूला दुसरी झाडं जगू शकत नाहीत. सागाची झाडंच जमिनीतलं सगळं पाणी शोषून घेतात. त्यामुळे त्याच्या सावलीत वाढणारी इतर झाडं, रोपं मरतात, खुरटतात. त्यांच्या मुळांच्या आसपास साधं गवतही उगवू शकत नाही. इतकंच नव्हे तर पावसाळ्यात सागाची पानं जेव्हा शेतात वाहून जातात तेव्हा तिथली पिकंही नष्ट होतात. सागामुळे होणारा हा सगळा विध्वंस पाहिला की, साग एक प्रकारे विषारीच झाड असते असे म्हटले पाहिजे. तेव्हा साग जरी सरकारला, खाजगी कंत्राटदारांना भरपूर उत्पन्न मिळवून देत असले तरी जंगलातल्या मूळ निवासी आदिवासींच्या दृष्टीने तो निरुपयोगीच – हानिकारकही. म्हणूनच सिंहभूमच्या आदिवासींच लागवडीला प्रखर विरोध आहे व ते तो आपल्या 'जंगल मुक्ती' चळवळीतून व्यक्त करीत आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनावरच सागाच्या लागवडीने आक्रमण केले आहे. आता चळवळीचाच एक भाग म्हणून आदिवासी सागाच्या 'सुरक्षित भागात' एकत्र होतात व सकाळपासून संध्याकाळपर्यंत जमेल तितकी सागाच्या झाडांची मोडतोड करतात. तोडलेली झाडं ते आपल्यावरोबर घेऊन जात नाहीत, तर तिथंच बाजूला त्यांचा बाजूला ढीग रचून ठेवतात. नंतर ती व्यापाऱ्यांना न विकता आदिवासींपैकीच कुणाला पाहिजे असतील त्यांना विकतात व मिळालेल्या उत्पन्नाचा सार्वजनिक विनियोग केला जातो. मध्यंतरी २५ नोव्हेंबर रोजी जंगल तोडणाऱ्या आदिवासींमध्ये व पोलिसात चकमक उडाली. पाच हजार आदिवासींच्या जमावावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात तीन आदिवासी प्राणास मुकले. आदिवासींनी बाण-कुऱ्हाडींनी अकरा पोलिसांना जखमी केले. त्याआधी म्हणजे सहा नोव्हेंबरला ही दंगल होऊन पोलिसांच्या गोळीबारात एक आदिवासी मरण पावला होता. तेव्हापासूनच आदिवासींचे हे आंदोलन तीव्र झाले आहे व त्यांनी जंगल तोडण्याचा सपाटा लावला आहे. आदिवासींचे हे विलक्षण आंदोलन शैलेन्द्र महतो आणि देवेन्द्र माझी या दोघांच्या नेतृत्वाखाली चालू आहे. आतापर्यंत सुमारे पन्नास-शंभर एकर जागांचे दहा बारा साग फार्मस आदिवासींनी नष्ट केले आहे. मोकळ्या झालेल्या जागांवर त्यांनी शेती करायला सुरुवात केली आहे. तिथे करंज, शाल, महुआ सारखी झाडं पुन्हा लावण्याचीही त्यांची योजना आहे. रांचीजवळच्या जंगलातली सोंगरा रेंजमधली हजारो एकर जमीन वनविभागाने यापूर्वीच हडप केलेली आहे. ती त्यांना परत मिळावी व त्यांचे कैक वर्षांपासून होणारे शोषण थांबावे, अशी तिथल्या आदिवासींची मागणी आहे. जी गावं जंगलात मोडतात ती गावं वनविभागाची संपत्ती समजली जातात. तिथं प्रागैतिहासिक स्वरूपात आजही आदिवासींना नागवले जात आहे. त्यांचे शोषण होत आहे. त्यांना सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या हक्कांपासूनही वंचित ठेवले जात आहे. आदिवासींचे जंगल मुक्ती आंदोलन या सगळ्या विरुद्ध आहे आणि ते आपल्या परीने संघर्षात उतरले आहेत. आदिवासींना नागवणाऱ्या सरकारी धोरणाविरुद्ध लक्ष देत आहेत.

### फसलेले भ्रष्टाचार निर्मूलन आंदोलन

या झाल्या बिहारमधल्या चळवळी आणि प्रमुख घटना. या सगळ्यांमधून खरं म्हणजे बिहारमधल्या सामाजिक जीवनाची तळागाळातून घुसळण व्हायला पाहिजे; पण तसे न होता सरंजामशाहीतील परंपरागत समाजरचना खूपशा प्रमाणात अजूनही आपले अस्तित्व टिकवून उभी आहे. कारण बिहारमधले राजकीय पक्षाचे नेते बिहारमध्ये वेळोवेळी होणाऱ्या विविध प्रश्नांच्या आंदोलनांना अशी दिशा देण्याचा प्रयत्नच करीत नाहीत की त्यातून समाजरचना संपूर्ण मोडून समतेवर आणि स्वातंत्र्यावर आधारलेला नवीन समाजच निर्माण करता यावा ! निदान तशी सामाजिक प्रक्रिया सुरू व्हावी. इथल्या राजकीय पक्षांचे ते उद्दिष्ट नाही. इथल्याच काय, भारतातल्याच राजकीय पक्षांचे ते उद्दिष्ट दिसत नाही. सगळे पक्ष संसदीय राजकारणात आकंठ बुडालेले आहेत आणि सत्तेवर येण्यासाठी उतावीळ झालेले आहेत; पण त्यातून एक राजकीय पक्ष जाऊन त्याची जागा दुसरा राजकीय पक्ष घेतोय व फक्त सत्ताबदल होतोय. म्हणूनच देशातील वाढते दारिद्र्य, विषमता, बेकारी यांचा निरास प्रस्थापित समाजव्यवस्था करू शकत नाही, हे सत्य जरी समुदायांना जाणवत असले तरी प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असणारे पर्याय वापरायचे, या वृत्तीमुळेच १९७७ साली जनतेने सत्ताबदल

**क्रांतीचा पहिला टप्पाच अजून साधलेला नाही !**

घडवून आणला. इंदिरा गांधींची अरेरावी संपुष्टात आणली व जनता पक्ष केन्द्रात सत्तेवर आला. आता फक्त वीस महिन्यांनंतरच पुन्हा चित्र बदलते की काय, अशी शंका यावी इतपत परिस्थिती बदलली आहे. त्याच वेळी म्हणजे गेल्या वर्षी निरनिराळ्या राज्यांत जनता, मार्क्सवादी, अकाली, इंदिरा काँग्रेस–जनता व इतर डावे अशी राज्य सरकारे स्थापन झाली; पण दारिद्र्य, बेकारी, विषमता इत्यादी प्रश्न मात्र आहेत तिथेच राहिले आणि या प्रश्नांवर कुठल्याही राजकीय पक्षाकडून तोडगा नसल्यामुळे केंद्रात व सर्व राज्यांत अस्थिरता व सत्तेवर असणाऱ्यांची भांडणे असे सार्वत्रिक चित्र उभे राहिले. कशाही–कुठल्याही आघाड्या करून, राजकीय पक्षांची मोट बांधून सत्तेवर रहायचे व लोकशाहीच्या, स्वातंत्र्याच्या नावाने बोलायचे; पण जनतेचा कौल मिळवायची मात्र कुणाची तयारी दिसत नाही. देशपातळीवरील पर्यायाने बिहारमधील दलितांवरील वाढत्या अन्याय-अत्याचाराचा संबंध, जातिनिहाय राखीव जागांच्या प्रश्नाचा संबंध या अस्थिर व अरिष्ट परिस्थितीशीच आहे.

जयप्रकाश नारायणांचे नेतृत्व नसते तर गुजरात आणि बिहारच्या भावनाप्रधान तरुणांना एकत्र आणून सत्तांतर घडवणे शक्य झाले नसते, हे जरी खरे असले तरी हे सत्तांतर सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या संदर्भात कितीसे फलदायी ठरले आहे, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर शून्य हेच मिळते. जयप्रकाशांना संपूर्ण क्रांतीचे आंदोलन चालवताना एक राजकीय पक्ष जाऊन दुसरा राजकीय पक्ष येणे हे अभिप्रेत होते का ? काँग्रेस पक्षाचा राजकीय पाडाव घडवून आणणे यासाठी जयप्रकाश झगडत नव्हते; पण काँग्रेसचा पाडाव झाला. कारण जयप्रकाशांना जे अभिप्रेत होते त्यातली ही तुलनेने सोपी असणारी गोष्ट होती. जयप्रकाशांना खरोखरी अभिप्रेत होते ते भ्रष्टाचाराचा पाडाव करणे. त्यांच्या मते स्वार्थासाठी अनुचित मार्गाने पैसा गोळा करणे, अनुचित मार्गाने पक्षासाठी पैसा गोळा करणे हा तर भ्रष्टाचार होताच; पण जयप्रकाशांची भ्रष्टाचाराची व्याख्या यापेक्षा खूप व्यापक होती. अशा अनुचित पैशाला, काळ्या पैशाला त्यांचा विरोध होताच; पण कायद्याने मान्य केलेल्या पांढऱ्या पैशाच्या अर्थरचनेलाही त्यांचा कडवा विरोध होता. सर्वसामान्य जनतेच्या हिताविरुद्ध जाणारे कायद्याचे सगळे राज्यच भ्रष्ट आहे असे त्यांना वाटत होते. या संदर्भात आजच्या बिहारचा विचार केला तर असे स्पष्ट दिसते की, जयप्रकाशांच्या भ्रष्टाचार निर्मूलन आंदोलनाने विकासाचा एकही टप्पा गाठलेला नाही. ते पूर्णपणे फसलेले आहे. याची ग्वाही आजचे तिथले भ्रष्टाचारात लडबडलेले सामाजिक जीवन, राजकीय पक्ष देत आहेत. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे आणि गरीब अधिक गरीब ! दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्यांच्या संख्येत घट होण्याऐवजी तिच्यात भर पडत आहे आणि विषमता भयानक वाढत आहे. सरकारची दिवाळखोरी आज होणाऱ्या सगळ्या विविध चळवळींनीच जाहीर केलेली आहे. विकास खुंटलेला असल्याने युवकांच्या बेकारीत वाढ होत आहे. या सगळ्याची कारणं सध्याच्या समाजव्यवस्थेत आहेत आणि ती बदलण्यासाठी बद्धपरिकर झाले पाहिजे, असा विचार दलितेतर बेकार तरुणांमध्ये पोचविण्यास सध्याचे शिक्षण, विचारवंत, डावे–उजवे पक्ष कुचकामी ठरले आहेत. इतकेच नव्हे तर हेच राजकीय पक्ष जातीय तेढ वाढवीत आहेत. आंदोलनाचा पक्षस्वार्थासाठी उपयोग करून घेत आहेत. त्यामुळे आपल्या बेकारीला केवळ दलितांच्या राखीव जागा कारणीभूत आहेत, असा सोपा पण अत्यंत घातक विचार वैफल्यग्रस्त दलितेतर तरुणांच्या मनात रुजत आहे. त्याला खत-पाणी प्रस्थापित वर्ग व संघटना घालीत आहेत. समाजव्यवस्था बदलण्याच्या मूळ प्रश्नाला चलाखीने बगल देत आहेत. सध्याच्या अरिष्टातून बाहेर पडण्याचा त्यांच्याजवळ मार्ग नसल्याने निराश युवकांना दिशाहीन करण्याचे जाणते प्रयत्न चालू आहेत. आजचा बिहार दारिद्र्य, विषमता, बेकारी, जातीयता, प्रस्थापित सरंजामी मूल्ये, दलित श्रमिकांवरील वाढते अत्याचार यांच्या भोवऱ्यात दिशाहीन होऊन अडकला आहे. वाटतं सगळा बिहार दिशाहीन दलदलीचा प्रदेश झाला आहे. बुद्ध, महावीर यांचे विचार ग्रंथांत अडकून पडले आहेत आणि लोकनायक जयप्रकाश पाटण्यातल्या आपल्या घरात हतबल होऊन बसले आहेत. फसलेली 'संपूर्ण क्रांती' आणि आजचा बिहार यातून बोध हाच घ्यायचा आहे की, एकूण देशाच्या उत्पादनात व सामर्थ्यात वाढ हा विचार जरी महत्त्वाचा असला तरी तो काही काळ दुय्यम समजून ग्रामीण भागात रोजंदारीची वाढ आणि दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या चाळीस टक्के लोकसंख्येच्या टक्केवारीत घट असा विचार जर आपण करू शकलो तरच क्रांतीच्या दिशेने पहिले पाऊल आपल्याला टाकता येईल.

□


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा**
**वेगळा शोध**

**प्रभावी, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

कथा

# अॅबस्ट्रॅक्ट

दिलीप करमरकर

ती दिसायला कशी आहे हे तुमच्या चवीवर आणि प्रामुख्याने वयावर, सेक्सवर अवलंबून राहील. पण तिचं व्यक्तिमत्त्व विलोभनीय, आल्हाददायक होतं हे मात्र निश्चित ! आणि म्हणूनच न थकता तिला वेगवेगळ्या वस्तू दाखवणारा सेल्समन अजूनही उत्साही होता.

हातात पर्स नाचवत रस्त्यावर पायीच फिरणं तिला फार आवडायचं. मोटारीतून जाणं तिला मुळीच आवडायचं नाही. आपल्यासारख्यांनी गर्दीत मिसळू नये असं तिच्या पप्पांनी तिला किती तरी वेळा सांगितलं होतं. पण तिनं त्यांचं कधीच एकलं नाही. गाडीतून फिरण्यानं-माझ्यातला लाइफफोर्स गोठून जातो, असं ती म्हणायची.

' तो तीन माकडांचा सेट दाखवा हो...'

' हो...दाखवतो हं...' सेल्समन मनातून जरा निराशच झाला होता. ' शेवटी यांना माकडांचा सेटच आवडला का...'

तिच्या मम्मीच्या मते ती मूर्ख होती. ( सर्व सुंदर गोष्टींना तिची मम्मी मूर्ख म्हणायची. ) पप्पा म्हणायचे ' अजून लहान आहे. ' तिच्या मैत्रिणींना ती म्हणजे एक कोडंच वाटायची. तिचे मित्र तिला किंचितसे घाबरून असायचे. ' अगदी व्हिमझिकल आहे–' सारे एकमताने म्हणायचे.

एक माकड डोळ्यांवर हात ठेवून बसलं होतं; दुसरं कानांवर, तिसरं तोंडावर–'

' हस्तिदंती आहे ?–' तिनं विचारलं. ' हो ! अगदी खात्रीचा माल आहे बाईसाहेब...' त्यानं तिच्या हातात तो सेट दिला. तिच्या बोटांचा निसटता स्पर्श त्याच्या हातांना जाणवला. सेल्समन बिचारा मोहरून गेला.

रस्त्यावरून जाताना कुणीही धक्का मारला, तरी ती रागावयची नाही. छानसं हसून स्वतःच म्हणायची ' सॉरी ! ' सेल्समन तो सेट काळजीपूर्वक बांधत होता. तिच्याकडे सारखं बघतच रहावं असं त्याला वाटत होतं. मोठ्या मुष्किलीनं तो खाली नजर वळवत होता.

जो तिच्याकडे परत परत वळून पाहणार नाही तो खरा पुरुषच नाही, अशी अनेकांची खात्री झाल्याने प्रत्येकजण तिच्याकडे परत परत मान वळवून पहायचा. तिला सवय झाली होती. अभिमानानं तिची डावी भिवई किंचित् वर उचलली जायची.

' हॅलो वैशू...' कुणी तरी तिला हाक मारीत होतं.

' कोण ? संजू ? तू...! ' वैशालीला आश्चर्य वाटलं. आपली कॉलेजमधील मैत्रीण आत्ता भेटेल अशी तिची अजिबात अपेक्षा नव्हती.

' इकडे कुठे...? '

' आठवडाभर होते ! उद्या जायचंय ! शॉपिंगला आले तो तू दिसलीस ! ' संजीवनीनं उत्तर दिलं.

' ओ ! चल ना ! कुठेतरी बसून खूप गप्पा मारू !'... वैशालीनं तिला जवळ जवळ ओढतच नेलं.

' काय घेणार ?'

' काहीही...'

' दो किंगफिशर...!' वैशालीनं वेटरकडे बघत दोन बोटं नाचवली. ' संजू...! अगदी पूर्वीसारखीच दिसते ! मध्यम अंगलट, लहानसाच चेहरा, पण मोठ्ठे मोठ्ठे डोळे...' याच डोळ्यामुळे ती वैशालीला फार आवडली होती.

' काय म्हणतात मिस्टर...' वैशालीनं विचारलं.

' अं ?... संजीवनीचं उजव्या हाताचं बोट उगीचंच मंगळसूत्राला कुरवाळू लागलं. ' हं... !' तिनं काहीच उत्तर दिलं नाही.

' पण अर्पूनं मला सांगितलं होतं की...'

' अग ! विसरलेच बघ ..' संजीवनीचं मंगळसूत्राशी खेळणारं बोट थरथरलं ..' जुळं झालं...एक मुलगा...एक मुलगी...'

' ओ ¡ ... माय गॉड ! ... ' वैशाली आश्चर्यानं म्हणाली. ' अजून आहे तशीच दिसतेस ! दोन मुलं झाली तुला ? कमाल आहे बाई !'...

संजीवनी लांब पांढऱ्या नळीतून शेवटचा घोट घेत होती. ती पांढरी नळी अकारण फट्फट् आवाज काढत होती. बाजूच्या टेबलावर बसलेला एक माणूस ' मॅनर्स आहेत की नाहीत ' हा प्रश्न कपाळावर उमटवून तिच्याकडे पहात होता.

' नावं काय ठेवलीस ?'...

' तशी वेळच आली नाही. कधीही न उघडण्याकरिता मिटलेले डोळे घेऊनच आले दोघं...' संजीवनीचा चेहरा ताठरला. वैशालीला काय बोलावं ते सुचेना. तिनं निरखून पाहिलं संजूच्या मोठ्या डोळ्यांत अस्पष्ट धुकं दिसू लागलं होतं. तिनं संजूचा हात आपल्या हातात घेतला. ' कमॉन माय गर्ल ! सो व्हॉट ? अजून पाहिजे तितकी होतील'... ती सांत्वन करण्याच्या उद्देशाने म्हणाली.

' ही इज सो टची ! म्हणाला, ' आय वेस्टेड मायसेल्फ ..' वैशालीला जाणवलं की संजूचा हात कापतोय ! पण नंतर तिच्याच लक्षात आलं की तिचाच हात कापतोय. तिनं हलकेच आपला हात मागे घेतला. संजीवनीचे मोठे डोळे निस्तेज वाटत होते. वैशाली अकारण पर्सची उघडझाप करू लागली. अस्वस्थ होऊन तिनं रिस्टवॉचकडे पाहिलं. ' माय गॉड ! मला निघालं पाहिजे... पप्पा वाट पहात असतील...' आपण खोटं बोलतोय हे संजूच्या लक्षात येऊ नये म्हणून तिच्या डोळ्यांत पहात वैशाली म्हणाली.

बिल दिलं गेलं.

' बाय... '

' बाय... '

भेटू असंच कधी तरी...'

' हं... '

संजीवनी निघून गेली. वैशाली आपल्याच चालीनं निघाली. हातातली पर्स वर-खाली नाचत होती. ' काय माणसं असतात बाई ! आय वेस्टेड मायसेल्फ... !' तिची नजर एका नवीनच रंगवलेल्या कचरापेटीकडे गेली. शहरात स्वच्छता-सप्ताह चालू होता. तिथं लिहिलं होतं, ' मी कचरा खातो... मला

मदत करा...!' वैशाली तिथंच थांबून हसायला लागली. सारेजण तिच्याकडे बघू लागले. तिनं हसू आवरलं. ती पुढं चालू लागली. तिला उगीचंच अपराधी वाटत होतं. आणि कहर म्हणजे संजूचे जखमी डोळे सारखे नजरेसमोर येत होते.

¤

संध्याकाळ झालेली होती. गुडनाइट हॉलमधील दिवे जळत होते. लोकांची गर्दी जमलेली होती. बरेचजण वेळ घालवायला आले होते. काहीजणच 'ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग्ज' बघायला आलेले होते. ती देखील वेळ घालवायला म्हणून तिथं गेलेली होती. तिचे गेले दोन-तीन दिवस जरा अस्वस्थच गेले होते. तिला सारखी संजीवनीची आठवण होत होती. संजूची उदासवाणी नजर सारखी चिकटून रहात होती. त्या नजरेला ती वैतागून गेलेली होती. स्वत:वरच चिडलेली होती. आपलं मन दुबळं आहे असंच सारखं तिला वाटत होतं.

एका चित्रासमोर काही कारण नसताना ती बराच वेळ उभी राहिली. खूपसे रंग अस्ताव्यस्त, वेडेवाकडे पसरले होते. त्या चित्राचा अर्थ काय असावा याचा ती विचार करू लागली. 'हे . हे...हात असतील... कदाचित पाय असतील! डोकं असायची शक्यता काही अगदीच नाकारता येणार नाही...

'तुम्हाला आवडलं हे चित्र ?'...कुणी तरी तिला विचारीत होतं.ती भानावर आली. तिनं गोंधळून परत त्या चित्राकडं पाहिलं. एकदम नाही म्हणणं बरं दिसणार नाही असा विचार करून ती काहीच बोलली नाही.

'आवडणारच! किती तरी वेळ या चित्रासमोर तुम्ही उभ्या होता!' त्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरलं होतं... 'मला देखील आवडलं हे चित्र !'... तो प्रेमानं त्या चित्राकडे पाहू लागला.

नेहरूशर्ट, पायजमा, पिंजारलेले केस, गोरा लख्ख रंग, देखणा चेहरा, निळे निळे डोळे... तिथून निघून जावंसं तिला वाटेना.

'चित्रकार कोण आहे ?' त्यानं विचारलं.

'अं...' चित्राच्या कोपऱ्यात चित्रकाराचं नाव न सापडल्याने थोड्याशा अपराधी सुरात ती म्हणाली, 'मला माहीत नाही बाई.'

'मला माहीत आहे! मीच काढलंय ते चित्र ...!' तो घाईघाईने म्हणाला क्षणभर वैशाली त्याच्याकडे पहातच राहिली. नंतर मोठमोठ्यानं हसू लागली.

'हसताय का ? खरंच मी काढलंय हे चित्र !'... तो गोंधळून म्हणाला. वैशालीनं नुसतीच मान हलवली.

'मग मला सांगा हे चित्र तुम्हाला का आवडलं ?'... त्याचा चेहरा प्रश्न विचारताना उजळला होता. अचानक मधेमधे प्रश्न विचारण्याच्या त्याच्या सवयीने वैशाली जरा हबकलीच. 'काय उत्तर द्यावं बरं ?'... रंग चांगला आहे, चित्र मनाचा ठाव घेतं... पाहिल्यावर बरं वाटतं...' बरीचशी उत्तरं ती आठवू लागली; पण तिच्या उत्तराची वाट न पहाता तोच पुढे बोलू लागला. 'हे मनाचं चित्र आहे! मनाला आकार नसतो; पण अस्तित्व असतं. तेच अस्तित्व रंगांच्या सहाय्यानं चितारण्याचा प्रयत्न केलाय्...'

'माय गॉड!' वैशालीला वाटलं की, आता आपण खूप बोअर होणार. हा कविमनाचा वगैरे वगैरे तर नाही ना ? ही दुष्ट शंका तिच्या मनात निर्माण झाली. किंगफिशर घ्यावी असंही तिला वाटू लागलं.

'चहा–कॉफी घेऊ या!' तो अचानक म्हणाला. 'म्हणजे गप्पांना मस्त मूड येईल!'

तिला त्याचा थोडासा रागच आला. तिनं शोधण्याचा प्रयत्न केला. निरखून पाहिलं. त्याचे निळे निळे डोळे स्वच्छ होते. दहापर्यंत घरी गेलं तरी चालण्यासारखं होतं.

गरम कॉफीचे घोट घेत घेत तो म्हणत होता... 'खरं म्हणजे माझी चित्रं कुणालाच आवडत नाहीत. तुम्हाला कसं काय आवडलं बुवा...' न हसण्याचा प्रयत्न करीत वैशाली कॉफी पिऊ लागली.

'तुम्ही काय करता...' त्यानं मध्येच विचारलं.

'अं ? काही नाही...' ती गडबडून म्हणाली.

'काही नाही ? मग तुम्ही चित्र काढा... छान चित्रं काढाल! ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंगचं ते एक मोठं वरदान आहे...' त्याच्या आवाजात मिस्किलपणा आहे हे तिनं ओळखलं आणि वाटतो तितका बावळट नाही. असं तिचं मत झालं.

'चित्र ? छे बाई! मला ब्रशदेखील हातात धरता येत नाही!' संभाषणाची सूत्रं आपल्या हातात घ्यावी या विचारानं ती सावरून बसली.

'छा: ! हातात ब्रश धरायचा, रंगात बुचकळायचा आणि कागदावर फिरवायचा! लहान पोरं नाही का रेघोट्या ओढीत! त्यांना त्यातून कदाचित काही तरी सांगायचंही असेल! प्रत्येक गोष्ट आकारात दाखवायला पाहिजे असे मुळीच बंधन नाही...'

'तुम्ही कविता वगैरे करता काय ?'... वैशालीनं प्रतिहल्ला चढवला.

'अंहं! गाणं गातो...'

'ॲबस्ट्रॅक्ट साँग ?'... तिनं डिवचलं.

'अंहं!' तो मंद मंद हसला. 'रडगाणं गातो... तुमचं आमचं गाणं...' त्याची निळी नजर अचानक काळवंडली. झाकाळून गेली. उदासवाणं गांभीर्य चेहऱ्यावर उमटलं. अचानक वातावरणात गारवा असल्याचं तिला जाणवलं. ती शहारली. अस्वस्थपणे तिची बोटं टेबलावर ताल धरू लागली. तो आपल्या अस्वस्थ बोटांकडे पहातोय हे कळताच तिनं हलकेच आपले हात टेबलाखाली दडवले.

'और दो कॉफी...' त्यानं ऑर्डर सोडली.

कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. तो कॉफीच्या गरम वाफांकडे बराच वेळ पहात राहिला

तिला स्वत:चाच विलक्षण राग आला. 'संजू...आणि आता हा...नर्व्हसनेस... फ्रस्ट्रेशनची साथ पसरविणारे... '

'तुम्ही कंटाळला नाही नं... !'

'छे! मुळीच नाही!'...एवढं धडधडीत खोटं आपण का आणि कशाकरता बोललो याचा विचार ती करीत होती.

'मला तुम्हा बायकांचं फार आश्चर्य वाटतं... ' भिवया ताणून तो म्हणाला.

वैशाली सावरून बसली. तिनं पदर सारखा केला. पर्समधून टीचभर रुमाल काढून घेतला.

म्हणजे मला तसा अनुभव वगैरे काहीच नाही; पण माझे डॅडी म्हणायचे, 'बायकांच्या नादी लागू नकोस. आख्खाच्या आख्खा संपून रिकामा होशील...मनानं... शरीरानं... ! मम्मीनं फार त्रास दिला त्यांना...एखाद्या महारोग्याप्रमाणे झिजले ते... '

आपल्या अंगावर एक मोठं झुरळ चढलंय असा किळसवाणा भास तिला झाला. आवंढा गिळत मनात उमटलेलं झुरळाचं, महारोग्याचं चित्र तिनं पुसून काढण्याचा प्रयत्न

केला. आपल्या समोरची कॉफी प्यावी असं तिला वाटेना.

'मला कळत नाही हे सगळं तुम्हाला का सांगतोय ! तुमची माझी ओळख नव्हती, तरीदेखील... ' तो क्षणभर थांबला. 'तरीदेखील.. वेल् ! प्रत्येक गोष्टीला काही अर्थ असायलाच पाहिजे असं बंधन नसावं या मताचा मी आहे... '

त्यानं बिल दिलं. दोघेही उठले. केव्हा आपण इथनं बाहेर पडतोय असं तिला होऊन गेलं होतं.

'गुडनाइट... '

'गुडनाइट... '

'बाय द वे...माझ्या चित्राचं नाव आठवतं तुम्हाला ?'

'नाही... ' तिनं कोरडचा आवाजात उत्तर दिलं.

'मी सांगतो ! माझ्या चित्राचं...मी काढलेल्या प्रत्येक चित्राचं नाव असतं...As empty as hate... '

'गुडनाइट... '

¤

'As empty as hate... '

वॉटरटँकच्या चौथऱ्यावर ती बसली होती. जवळच चुरमुरे होते. एकेक दाणा उचलून ती पाण्यात टाकत होती. एखादा सोनरंगी मासा तो पटकन गिळून टाकत होता. मावळत्या सूर्याचे उदासवाणे किरण भेसूर होऊन रेंगाळत होते...त्याच वेळी भल्या मोठ्या आकाशाच्या पोकळीच्या उजव्या कोपऱ्यात रुपेरी कडांचे ढग मजेत चरत होते.

ती कंटाळली. तिने सारे चुरमुरे पाण्यात ढकलून दिले. सोनरंगी माशांची भलतीच धावपळ उडाली.

गुडनाइट हॉलमधून आल्यानंतरचे दोन–तीन दिवस केविलवाणे होऊन सरले होते. प्रयत्न करूनदेखील तिला उत्साह वाटत नव्हता. तासन्‌तास ती आरशासमोर उभी राहायची. मनाला वारंवार बजावायची. 'डॉक्टर अंकल माझ्यासारखे मुळीच दिसत नाहीत. तसं म्हणणारे मूर्ख आहेत !' मनाला सांगून सांगून थकली की सोफ्यावर कोसळायची. डोळे घट्ट मिटून घ्यायची. संजूचे मोठ्ठे मोठ्ठे बोलके डोळे तिला चिकटायचे. त्याचा देखणा चेहरा आठवायचा. 'I wasted myself... ' 'महारोग्यासारखे झिजले... ' हे शब्द तिच्या मेंदूत किंचाळून प्रचंड कोलाहल माजवून द्यायचे.

ती डोळे उघडायची. तिला ओरडावंसं वाटायचं; पण ती स्वत:ला सावरून घ्यायची. गप्प राहून तासन्‌तास विचार करून स्वत:लाच विसरून जायला लावणारी घाणेरडी सवय आपल्याला लागली नाही ना, हा तिच्या मनात उभा राहिलेला प्रश्न अंगावर शहारे आणायचा.

'वैशू ! अशी काय दिसतेस ! टोनस सेव्हन घे ! ' वेळात वेळ काढून तिचे पप्पा तिला फक्त एवढेच म्हणाले होते. ते बाहेर गेल्यावर त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे संतापाने पहात ती म्हणाली होती, 'मला मुळीच नकोय टोनस सेव्हन... '

मम्मीचं तिच्याकडे लक्षच नव्हतं. डॉक्टर अंकलबरोबर तिचा वेळ छान जात होता. 'डॉक्टर अंकल...डॉक्टर अंकल...'

काल संदीप काही तरीच सांगत होता. मम्मी आणि डॉक्टर अंकल म्हणे लव्हर्स होते...तिनं स्वत:लाच एक प्रश्न विचारला. 'मम्मीला कुणी फ्रेंड असला तर हरकत असण्याचं काय कारण आहे ? '

.. वैशाली तशी मॉडर्न होती. खरं म्हणजे तिचं समाधान व्हायला पाहिजे होतं. तसंच म्हणायला गेलं तर.. तर...असला प्रश्न देखील मनात यायला सबळ कारण देता येत नव्हतं.

'मग मी अंकलसारखी का दिसते ? '

'आऽऽ! ' तिनं मोठ्यानं आवाज करीत जांभई दिली. हात मागं नेऊन जोरदार आळस दिला. आपण उगीचच काही तरी विचार करतो; पण मग अंकलचं आणि माझं रक्त का जुळावं ? पप्पांचं आणि माझं रक्त वेगळं आहे का? ...'दरवेळेला बापाचं आणि मुलीचं रक्त जुळलंच पाहिजे असा नियम कुठेच नसावा...' तिनं स्वत:चीच समजूत घालायचा प्रयत्न केला; पण मला कालच का संदीप भेटावा ? अजून काही दिवसांनी का भेटला नाही ?.. प्रश्न ...असंख्य प्रश्न...प्रश्नांचा काळाकुट्ट काळोख...काजव्यासारखी चमकून मालवणारी, दुबळी भासणारी उत्तरं...

एखादी छानशी साडी नेसावी, मस्त मेकअप करावा, हातात पर्स नाचवावी, सौंदर्य, अभिमान, तालासुरावर नाचवत रुबाबात पावलं टाकवीत. लोकांनी परत परत आपल्याकडे वळून बघावं, बीअरचे झकास कडवट घुटके घ्यावेत...

खरं म्हणजे किती सोपं ! पण ही साधी गोष्ट देखील तिला करता येत नव्हती. जमत नव्हती. पटत नव्हती. रुचत नव्हती. कधी कधी पचतही नव्हती. कालच ती बाहेर गेली होती. रस्त्यावरच्या जागोजाग असलेल्या कचरापेट्याच तिला जास्त जाणवत होत्या आणि सगळचात कहर म्हणजे महारोग्यांची लांबच लांब रांग तिला दिसली होती. झिजलेल्या हात-पायांतून उसवलेल्या नजरेतून टप्-टप् गळणारी वेडीवाकडी लाचारी-याचना पाहून तिला मळमळून आलं होतं.

तो चित्रकार...संजू...वेस्टेड मायसेल्फ ...अॅज एम्टी अॅज हेट...डॉक्टर अंकल... त्यांच्यात आणि माझ्यात साम्य दाखवणारा भला मोठा आरसा...

'पण पप्पांनी केलं काय ? अॅडस्टजमेंट ...पण...हाऊ इज इट पॉसिबल...'

आता तर सूर्य एकदम अंधारून गेला होता.

¤

'मी पप्पांना विचारू का सगळं ? का मम्मीला विचारू... का डॉक्टर अंकलना...'


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०

तिला चित्रविचित्र भास होऊ लागले. डॉक्टर अंकल एखाद्या बुलडॉगसारखे दिसू लागले. मोठी लांब जीभ काढून ते मम्मीचे हात-पाय चाटत होते. तिला वाटू लागलं– तिचे हात–पाय झिजू लागलेत... नाक आत जातंय... हाता-पायांतून रक्त येतंय...नासकं कुजकं... As empty as hate... ते रक्त डॉक्टर अंकलच्या रक्तासारखं दिसतंय! आरसा मोठा होतोय... लहान होतोय... आडवा फुगतोय.. बारीक होतोय... माझाही आकार बदलतोय...तरीही डॉक्टर अंकलसारखीच मी दिसतेय...!'

'नो...' कानांवर हात ठेवून ती जोरात किंचाळली. तिनं भानावर येऊन आजूबाजूला पाहिलं... केवळ टॉमी जबडा पसरून भुंकत होता.

'कुठे जाऊ...काय करू...कुणाला सांगू. कुणाला विचारू...' तिचं मन आधार शोधू लागलं. 'हां, त्याला भेटावं! कदाचित तो उत्तर देईल! काय बरं त्या चित्रकाराचं नाव? मी नावदेखील विचारलं नाही त्याचं?...'

ती तरातरा आपल्या खोलीत गेली. आरशासमोर जाऊन उभी राहिली.

दहा मिनिटांनी ती बाहेर पडली. शोफरला गाडी आणायला फर्मावलं. बाईसाहेबांनी गाडी आणायला सांगितली याचंच शोफरला आश्चर्य वाटत होतं.

गुडनाइट हॉलसमोर गाडी येऊन थांबली. शोफरनं दार उघडून दिलं. ती घाईघाईनं बाहेर पडली.

हॉलच्या प्रवेशद्वारापाशी तोरणं उभारली होती. कुणाचं तरी लग्न झालेलं होतं. थोड्याच वेळात वरातही निघणार होती.

'मग तो कुठे गेला! प्रदर्शन बंद झालं? कुठे शोधू त्याला?...' ती सुन्न होऊन उभी राहिली. हलकेच मागे वळली. जड पावलांनी शोफरजवळ गेली. तिनं त्याला पुढं पाठवलं. बँडच्या कर्कश सुरात कुठलंसं सिनेमाचं गाणं वाजू लागलं.

तिच्या नजरेसमोर चित्र दिसत होतं. आमच्या...तुमच्या मनाचं चित्र! मनाला आकार नाही; पण अस्तित्व आहे नं! ते चितारण्याचा कुणी तरी प्रयत्न करीत होतं...

□

पुस्तके

# रायबरेली व त्यानंतर

**फार मोठा अपेक्षाभंग!**

बंगलोर ते रायबरेली या पुस्तकाचे लेखक श्री. वि. स. वाळिंबे यांचं 'रायबरेली व त्यानंतर' हे पुस्तक नुकतंच प्रसिद्ध झालं. 'बंगलोर ते रायबरेली' हे पुस्तक अगोदर वाचलं असल्यामुळे व या नव्या पुस्तकाचं शीर्षक 'रायबरेली व त्यानंतर' असं असल्यामुळं या पुस्तकात श्री. वाळिंबे यांनी रायबरेलीला इंदिरा गांधींचा झालेला पराभव या मुद्द्यावरून पुढे सुरुवात केली असेल आणि पुस्तकाच्या शीर्षकातील 'त्यानंतर' या भागावर अधिक भर दिला असेल, अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्ष पुस्तक वाचल्यावर घोर निराशा झाली, हे सुरुवातीलाच सांगितलं पाहिजे.

कारण या दुसऱ्या पुस्तकात पुन्हा नेहरूंच्या काळातलं राजकारण, शास्त्रीजींची निवड, १९६९ सालची राष्ट्रपतिनिवडणूक, मोरारजींची उचलबांगडी, इंदिराजींचे डावपेच, आणीबाणी, त्या काळातील अत्याचार, १९७७ सालच्या लोकसभेच्या निवडणुका याच सगळ्यांचं गुऱ्हाळ पुन्हा लावलेलं आहे आणि १७९ पानांपैकी १२९ पानं खर्ची घातलेली आहेत. उरलेल्या ५० पानांमध्ये जनता पक्ष सत्तेवर आल्यापासून तर इंदिराजींच्या चिकमगळूर विजयानंतरच्या इंग्लंडच्या दौऱ्यापर्यंतच्या महत्त्वाच्या राजकीय घडामोडी एकत्रितपणे मांडल्या आहेत. अर्थात आपल्याच जुन्या पुस्तकातील बराचसा भाग पुन्हा लिहिताना वाळिंब्यांनी शब्द आणि वाक्यरचना, घटनांचा क्रम, प्रकरणांचा क्रम आणि शीर्षकं यात आवश्यक ते वरवरचे बदल केले आहेतच; पण त्यामुळं त्यांची झालेली पुनरावृत्ती लपत नाही. उदाहरणंच देतो.

१. 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकात 'सलामीची झुंज' या पहिल्या प्रकरणात पान क्र. १० वर पुढील मजकूर आहे.

'पक्षाध्यक्ष असल्याने निजलिंगप्पा मतदान करणार नव्हते. स्वतः उमेदवार असल्यामुळे जगजीवनरामांनीही अलिप्त राहायचे ठरविले. म्हणजे आता सहा जणांमध्येच निर्णय होणार होता. अशा वेळी तीन-तीन अशी विभागणी झाली तर ही बैठक अनिर्णित ठेवणे इंदिरा गांधी यांना शक्य होणार होते. तसेच घडेल असा त्यांचा कयास असल्यामुळे मतदानाला त्या तयार झाल्या; पण तसे घडले नाही.

चार विरुद्ध दोन मतांनी इंदिरा गांधी यांची सूचना पराभूत झाली. जगजीवनराम यांच्या उमेदवारीला इंदिरा गांधी आणि फखरुद्दीन अली अहमद यांनी पाठिंबा दिला तर स. का. पाटील, मोरारजी देसाई, कामराज आणि यशवंतराव चव्हाण या चौघांनी संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीचा पुरस्कार केला.'

आता 'रायबरेली व त्यानंतर' या पुस्तकातील 'डावी प्रतिमा' या प्रकरणातील पान २४ वरील मजकूर पहा–

'राष्ट्रपतिपदासाठी काँग्रेस पक्षाचा उमेदवार ठरविण्याकरिता संसदीय मंडळाची बैठक भरली. इंदिरा गांधींनी जगजीवनरामांचे नाव सुचवताच स. का. पाटील यांनी संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीचा प्रस्ताव मांडला. पक्षाध्यक्ष असल्यामुळे निजलिंगप्पा मतदान करणार नव्हते. आपण स्वतः उमेदवार असताना मतदानात भाग घेणे जगजीवनरामांनाही प्रशस्त वाटले नाही. त्यामुळे सहा जणांत निर्णय होणार होता. मोरारजी देसाई, कामराज आणि स. का. पाटील यांचे मत इंदिरा गांधींना माहीत होते. आपल्या बाजूने फखरुद्दिन अलि अहमद आणि यशवंतराव

चव्हाण मतदान करतील अशी त्यांची अपेक्षा होती. इंदिरा गांधी आणि फखरुद्दिन अलि अहमद यांनी जगजीवनरामांच्या बाजूने मत नोंदविले; पण चव्हाणांचे मत संजीव रेड्डींना मिळाले. म्हणून चार विरुद्ध दोन मतांनी इंदिरा गांधींचा प्रस्ताव फेटाळला गेला.'

२. 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकात 'कामराज योजनेचा आधार' या प्रकरणात पान क्र. ३२ वर पुढील मजकूर आहे–

'मागच्या वेळेप्रमाणे याही वेळी पक्षनेत्याची निवड एकमताने व्हावी असे कार्यकारिणीने सुचविले. मागचा अनुभव मोरारजीभाईंच्या लक्षात होता आणि त्यामुळे 'या वेळी माघार घ्यायची नाही' असे त्यांनी ठरविले. गुलझारीलाल नंदा यांनाही या वेळी संधी सोडायची नव्हती. इंदिरा गांधी यांचे नाव पुढे आले तर मात्र आपला निभाव लागणार नाही हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी इंदिरा गांधींची भेट घेऊन विचारले, 'तुम्ही निवडणूक लढविणार आहात काय ?'

या प्रश्नाला इंदिराजींनी काहीच उत्तर दिले नाही. उलट त्यांनी नंदांनाच प्रश्न विचारला, 'तुम्ही का उभे राहात नाही ?' इंदिरा गांधी यांचा आपल्याला पाठिंबा आहे, असे नंदांनी गृहीत धरले.'

आता 'रायबरेली व त्यानंतर' या पुस्तकातील, 'डावी प्रतिमा' या प्रकरणातील पान १७ वरील मजकूर पहा–

'मोरारजीभाईही मागच्या वेळेसारखी या वेळी शेवटच्या क्षणी माघार घेणार नव्हते. त्या वेळी कामराजांचे आपण ऐकले ही आपली चूक झाली, यावद्दल मोरारजीभाईंची खात्री पटली होती. म्हणून त्यांनी संसदीय पक्षनेत्याच्या निवडीचा विचार सुरू होताच आपण निवडणूक लढवणार आहोत, हे जाहीर करून टाकले. मोरारजीभाईंची उमेदवारी जाहीर होताच इतरही नावे पुढे येऊ लागली. नेहरूंच्या निधनानंतर हंगामी पंतप्रधान म्हणून गुलझारीलाल नंदा यांची नेतेपदावर निवड झाल्यामुळे नंदा यांना पंतप्रधानपद सोडावे लागले होते. शास्त्रींच्या निधनानंतरही नंदा पुन्हा एकदा हंगामी पंतप्रधान झाले. या वेळी तरी आपली नेमणूक कायम व्हावी असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. मोरारजीभाईंच्या विरुद्ध उभे राहायचे असेल तर आपण इंदिरा गांधींचा पाठिंबा मिळवला पाहिजे, हे ओळखून नंदा त्यांना भेटले. नंदांनी इंदिरा गांधींना सरळच विचारले, 'माझ्या उमेदवारीला तुमचा पाठिंबा मिळेल ना ?'

इंदिरा गांधी स्वतःच नेतेपदाच्या निवडणुकीसाठी उभ्या राहू इच्छित आहेत याची नंदांना कल्पना नव्हती. इंदिरा गांधींनाही ते तूर्त उघड करायचे नव्हते. म्हणून त्यांनी मोघम उत्तर दिले, 'नंदाजी, इतरांचा तुम्हाला पाठिंबा असेल तर माझाही आहे, असे अवश्य समजा.'

इंदिरा गांधींचे हे आश्वासन ऐकताच भारत सेवक समाजाचे सेवाभावी संस्थापक खूष झाले. मोरारजीभाईंना पराभूत करून आपण निवडून आलेलो आहोत असा त्यांना सारखा भास होऊ लागला.'

३. आता थोडं पुढं जाऊ या. 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकातील 'भ्रष्टाचाराला अभयदान' हे अठरावे प्रकरण पहा. प्रकरणाची सुरवात अशी होते–

'गुजरातमधल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रमुखांनी वसतिगृहातील भोजनाचे दर वाढविताच विद्यार्थ्यांमधील असंतोष प्रकट रूप धारण करू लागला. अन्नधान्याच्या किंमती भरमसाट वाढल्यामुळे, महाविद्यालयप्रमुखांना भोजनखर्चात वाढ करणे अपरिहार्य झाले हे या विद्यार्थ्यांना ठाऊक नव्हते, असे नाही. प्रशासनातील भ्रष्टाचारासंबंधीचा राग त्यांच्या मनात दाटून आला होता आणि त्याला वाचा फोडण्याचे निमित्त भोजनखर्चातील वाढीने पुरविले. अन्नधान्याचे पीक या वर्षी चांगले आलेले आहे असे सरकारतर्फे सांगण्यात येत होते आणि तरीही नागरिकांना टंचाई आणि भाववाढ यांचे चटके सहन करावे लागत होते. ही कृत्रिम टंचाई कोणी निर्माण केली आहे, भाववाढीचा लाभ कोण करून घेत आहे हे सरकारला ठाऊक होते आणि तरीही त्यांच्याविरुद्ध उपाययोजना करण्याबाबत चिमणभाई पटेल यांचे मंत्रिमंडळ उदासीन राहिले. निवडणुकीच्या वेळी जमीनदारांनी आणि व्यापाऱ्यांनी सत्ताधारी पक्षाला पैसा पुरविला असल्यामुळे त्यांची नफेबाजी मोडून काढायला चिमणभाई पटेल आणि त्यांचे सहकारी राजी होणे शक्यच नव्हते. असंघटित ग्राहकवर्गाच्या दुखण्याचे कारण सगळ्यांना कळत होते. या दुखण्याचे निवारण कसे करायचे यासंबंधी मात्र कोणीच पुढाकार घेत नव्हते. ती कामगिरी विद्यार्थ्यांनी उचलली.'

आता 'रायबरेली व त्यानंतर' या पुस्तकातील 'स्वातंत्र्यावर आघात' या प्रकरणातील पान ३६ वरील पुढील मजकूर पहा–

'मोरवी येथल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चालकांनी भोजनाचे दर वाढवताच विद्यार्थी एवढे संतापले की, त्यांनी महाविद्यालयाच्या इमारतींचा आणि आतील उपकरणांचा विध्वंस आरंभिला. भोजनखर्चात वाढ हे या उद्रेकामागचे केवळ निमित्त होते. इंदिरा गांधींच्या आशीर्वादाने मुख्यमंत्रिपदावर आरूढ झालेल्या चिमणलाल पटेल यांच्याविरुद्धचा युवकांमधील संताप बरेच दिवस खदखदत होता. कारण अन्नधान्याच्या कृत्रिम टंचाईला चिमणलाल पटेल यांचेच धोरण कारणीभूत झाले होते. उत्तरप्रदेश विधानसभेच्या निवडणुकीसाठी लागणारा पैसा पुरवण्याची जबाबदारी इंदिरा गांधींनी चिमणभाईंकडे सोपविली होती. चिमणभाईंनी ती रक्कम बड्या शेतकऱ्यांकडून वसूल केली आणि त्यांना या रकमेची भरपाई करून घेता यावी म्हणून खाद्यतेलाच्या किंमती भडकतील अशी तरतूद केली.

मोरवीमधील विद्यार्थी खवळून उठलेले आहेत हे दिसताच हे युवक-आंदोलन साऱ्या गुजरातभर पसरले.'

आता उतारे दाखवणं थांबवतो. विषयांचा नुसता निर्देश करतो. 'बंगलोर ते रायबरेली' आणि 'रायबरेली व त्यानंतर' या दोन्हीही पुस्तकांमध्ये आलेले आणखी काही विषय पुढीलप्रमाणे–१९७४ च्या मेमध्ये वेतनवाढीच्या मागणीसाठी रेल्वे–कर्मचाऱ्यांनी केलेला संप, नगरवाला-प्रकरण, रेल्वेमंत्री ललितनारायण मित्र यांचा बॉम्ब-स्फोटात मृत्यू, तुलमोहन रामचे आयात–परवाने प्रकरण, अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय व त्यानंतरच्या राजकीय घडामोडी, इंदिराजींचे डावपेच, आणीबाणी, विरोधी नेत्यांची धरपकड, संजय–लीला, (हे वाळिंब्यांनीच दिलेले शीर्षक–'दंडपर्वातील धुमाकूळ' या 'बंगलोर ते राय-

बरेली 'मधील प्रकरणावर आधारित असं प्रकरण), आणीबाणीतील अत्याचार, इंदिराजी निवडणुका जाहीर करतात, निवडणुकीचा गदारोळ, जगजीवनरामांचा राजीनामा, जनता पक्षाचा विजय, इंदिराजींचा पराभव.

तेव्हा असं हे पुस्तक आहे. 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकात जी उणीव जाणवली होती तीच याही पुस्तकात जाणवते. ती म्हणजे, कोणत्याही मुद्द्यावर लेखकाने खोलात जाऊन काही विचार, चिंतन आणि पृथक्करण केल्याचं आढळत नाही. अर्थात 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकाच्या बाबतीत ही उणीव राहाणं स्वाभाविक होतं. कारण त्या वेळी असं काही करायला फुरसतच नव्हती. शिवाय वातावरणाचा फायदा घेण्यासाठी पुस्तक लवकरात लवकर बाजारात टाकणं त्या वेळी आवश्यक होतं. पण आता तशी परिस्थिती नव्हती. तेव्हा हे पुस्तक तरी थोडंसं चिंतनात्मक, पृथक्करणात्मक असण्याची अपेक्षा करणं चूक ठरू नये. अर्थात या पुस्तकाच्या सुरुवातीला वाळिंब्यांनी हे पुस्तक लिहिण्यामागील त्यांची भूमिका काहीच स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे तर पुस्तक वाचत असताना काही वेळा, वाळिंब्यांनी त्यांच्याच दीड वर्षांपूर्वीच्या पुस्तकात सांगितलेल्या घटना ते पुन्हा या पुस्तकात का सांगताहेत, असा प्रश्न मनात उभा राहातो. लेखकाने किंवा प्रकाशकाने व्यवसाय जरूर करावा; पण वाचकांची दिशाभूल करू नये. नाही म्हणायला, पुस्तकाचं मुखपृष्ठ मात्र काळ्या, पांढऱ्या अशा दोनच रंगांत फारच आकर्षक झालं आहे. पण तेच चित्र मलपृष्ठावरही का छापलंय ते कळलं नाही. त्याचबरोबर पुस्तकाला अनुक्रमणिका न ठेवण्याचं धोरणही समजू शकलं नाही.

—सतीश कामत

**रायबरेली व त्यानंतर**
वि. स. वाळिंबे
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे १७९, मूल्य २० रु.

# आनंदवनातील आनंदमेळा

**एक अपूर्व सहजीवन**

तबला-पेटीच्या मंद लयीच्या तालबद्ध पार्श्वसंगीतावर समूहगीताच्या सुमधुर लकेरी वातावरणात मिसळत होत्या. रंगीबेरंगी मोहक फुलांनी बहरलेला आनंदवनातील मुक्तांगणाचा सारा आसमंत ह्या वीररसाने भारला गेला होता. आंतरराष्ट्रीय बालकवर्षाच्या निमित्ताने विदर्भाच्या निरनिराळ्या जिल्ह्यांमधून आलेल्या १० ते १४ वयोगटातील सुमारे ४०० बालक-बालिकांच्या कंठांतून स्फुरलेल्या समूहगीतांनीच 'आंतरभारती बाल आनंद मेळाव्याचा' शुभारंभ झाला. मधून मधून यच्चयावत भारतीयांचं सौहार्दपूर्ण नातं दृढमूल करणारे अनेक नारेही मंडप दणाणून सोडत होते.

"आनंदवन हो या गोहट्टी,
अपना देश, अपनी मिट्टी"...

ह्या सगळ्या अव्यंग, सुदृढ बालकांच्या कोरस गीतानंतर आनंदवनातल्याच अंध विद्यार्थ्यांनी आपल्या इतर मित्रांचं स्वागत दोन गीतांनीच केलं. त्या अंधनायकानं— "ह्या निमित्तानं आपला परिचय झाला. आम्हाला फार आनंद झाला," हे स्वागतपर उच्चारलेले शब्द सर्व बालकांच्या आणि इतर उपस्थितांच्या हृदयाला जाऊन भिडले. "हे तर आपणास पाहूच शकत नाहीत ग!"— माझ्या शेजारच्या एका दहा वर्षाच्या चिमुरडीनं व्यक्त केलेली एक ओली प्रतिक्रिया.

"आनंदसाधकांनो, यावे मिळून सारे
मुक्तांगणात यावे ......"

ह्या गीताला उस्फूर्त टाळ्यांचा दीर्घकाळ कडकडाट करून बालकांनी प्रतिसाद दिला.

एवढ्यात विकास आणि प्रकाश या दोघांनी एक व्हीलचेअर ढकलत ढकलत मुलांपुढे आणून उभी केली...... पाहतो तर बाबा आमटे! घसरून पडल्यामुळे कमरेचं हाड दुखावलेलं. स्वाभाविकतःच अंगाचं जिणं जगण्याचा प्रत्ययकारी अनुभव घेताहेत ते सध्या. ते बालकांना गोष्टी सांगणार! राजकुमार, राजकन्या, परी ...... वगैरे स्वप्नील, रोमहर्षक गोष्टी सांगतील अशी सर्वसामान्य अपेक्षा. पण चक्क महारोग्याच्या सेवेसाठी वाहून घेतलेल्या एका सुंदर आयरिश तरुणीची प्रत्यक्ष घडलेली अत्यंत प्रेरणादायी गोष्ट बाबांनी सांगितली. दुसरी तर चक्क चांद्याच्या जंगलातील अनादामियाँ आणि वाघाच्या जिवश्चकंठश्च मैत्रीची आणि त्यागाची घडलेली सत्य गोष्ट सांगून बालगोपालांना त्यांनी अगदी वेगळ्या विश्वात नेले. पण ह्याच निमित्तानं मराठवाड्यातील दलितांवरील हल्ले, बेलछी हत्याकांड, गवईबंधूंचे डोळे काढणे वगैरे जातीय अत्याचाराच्या घटनांचा उल्लेख करून 'तुम्ही स्वतः आपली जात लक्षात ठेवून जनावरापेक्षाही निकृष्ट दर्जाचे मानव बनून जगू नका!' असंहि अत्यंत व्यथित अंतःकरणानं सांगितलं.

'मुक्त अभिव्यक्ती' ... ह्या आगळ्या अभिनव कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सारी बालकं धावली. शिक्षकांनी नेहमीची 'रिंग मास्तरी' बिलकूल करू नये, त्यांच्या जवळपासही फिरकू नये अशी खास सूचना चंद्रकांत शहांनी केली होती. मुलांना आवडेल त्या दालनात त्यांनी दाखल व्हायचं. मुलांच्या सहजप्रवृत्तींना जे रुचेल, जे पचेल तेच त्यांनी स्वीकारावं, शिकावं ही ह्यामागली मुक्त प्रतिभाविष्काराची संकल्पना— आपल्या प्रस्थापित शिक्षण-पद्धतीत सर्वस्वी न आढळणारी.

हे पहा ... 'खेळण्याचे दालन'. मुक्तांगणांच्या सुबक आणि वेधक नाट्यगृहात खेळांचं साम्राज्य प्रस्थापित झालेलं. सगळे बैठे खेळ. किती तरी वेगवेगळे, निरनिराळे, कधी न पाहिलेले. हा पहा ... हुपला, जंपिंग जॅक, मॅग्नेटिक फूटबॉल, किती तरी प्रकारचे

पझल्स, कॅची, नव्हं रॅकर, हॅंड शेकर, एपझन प्लास्टी कामो टॉक-टॅक-टो, बुद्धिबळ, पत्ते... नावं तरी किती घ्यायची ! बालकांचा सगळयात अधिक ओढा ह्या दालनाकडे. सदा खच्चून भरलेलं असायचं हे. माझ्यासारखा तरुणसुद्धा जिथे 'हे कधीही न खेळलेले' खेळ खेळण्याचा मोह न आवरून चक्क प्रत्येक खेळणं हाताळायला लागतो तिथे ही बालकं आपलं संपूर्ण देहभान न विसरली तरच नवल ! खेळण्यासोबतच बौद्धिक–कसरतीला चालना देणारं हे दालन सर्वात लोकप्रिय ठरलं.

'नृत्य दालन'... मुक्तांगणातल्या ओपन ॲअर–थिएटरवरच ह्यानं संसार थाटलेला. 'तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून ...' ह्या गीतावर नृत्य सुरू आहे... बाजूला उभे राहिलेले प्रेक्षक, बालक त्यात केव्हा सामील होताहेत, हे त्यांचं त्यांनाच कळत नाहीये. इच्छा असेल त्यानं घुंगरू बांधायचं आणि बेभान होऊन नाचायचं. वर्ध्याची सुनीती कुलकर्णी एक कॉलेजकन्यका। स्वत: मुलांना प्रात्यक्षिकासह कशी पावलं उचलायची, नेमकी कशी टाकायची, विशिष्ट ॲक्शन का घ्यायची, हे समजावून देत आहे. घुंगरांच्या 'छुमछुम ऽऽ' तालावर त्यांच्या सोबत नाचते आहे. वर्ध्याच्या इतर तरुणींनी आणि सुनीतीनं हे दालन सदा भरगच्च ठेवण्यात यश मिळवलं. गाणी आणि नाच .... तिन्ही दिवस तालबद्ध घुंगरांचा छनछनाट !

चित्रकला, हस्तकला, मातीकाम ह्या तिन्ही कला एकाच दालनात गुण्या-गोविंदानं नांदताहेत. समोर निरनिराळे इंद्रधनुषी रंग ठेवलेले. जवळच ब्रश पडलेले. स्फुरण चढेल त्यानं बसायचं आणि वाट्टेल ते माणसापासून ते डुकरापर्यंत ... मॉडर्न आर्टपर्यंत काहीही चितारायचं. ह्याही दालनात गर्दी म्हणजे महदाश्चर्यच ! मुलांना रंग उधळण्याचं वेडच असतं म्हणा ! उगवत्या सूर्याच्या साक्षीनं उमलणारी फुलं पाहून थबकलो. चित्र पूर्ण व्हायच्या आधीच सौंदर्य निखरू लागलेलं; पण चितारणाऱ्या १५ वर्षांच्या कलावंताची हातची बोटं पार झडून गेलेली. धड हातात ब्रशही धरता येईना. पाय निकामी झालेले. प्रभुदास टाकरे नावाच्या ह्या बालकाची निसर्गाविरुद्ध झगडण्याची अलौकिक जिद्द आणि कल्पनेतलं सौंदर्य कागदावर पकडण्याचं अद्भुत कौशल्य पाहून स्तंभित झालो. अशी किती तरी सुंदर सुंदर चित्रं... रविंद्र भाकरे ह्या मुक्या-बहिऱ्या बालक मित्राचं धावत्या बैल-गाडीचं हे वेधक चित्र.

कोणी कागदाची सुंदर फुलं, प्राणी, फर्निचर बनविण्यात मश्गूल आहेत. हा डूंगा नावाचा हेमलकस्याचा माडीया आदिवासी बालकमित्र ताडपत्त्याच्या चिरफळ्यांपासून किती सुंदर प्राणी हरीण, पोपट, हत्ती, बगळा, हे तर मंदीर, ही झोपडी बनवितो आहे. ही खास परंपरागत 'माडीया' कला. बाबा आमटेंचा मानसपुत्र प्रकाश फडणीस हेमलकस्याला चालवीत असलेल्या प्राथमिक शाळेची ही सर्व माडीया बालकं.

मातीत हात भरवून बैल, कुत्रा, घोडा घडविलेला दिसतोय येथे मुलांनी !

'नाटचाच्या' झाडाखालीच स्थानापन्न झालेल्या दालनात सुरुवातीस कोणीच फिरकेना; पण नंतर बालकांची उदार दृष्टी इकडेही वळली. विशेषत: वर्ध्याच्या ५०, बालकांचा ग्रुप बराच रेंगाळत असे इकडे. प्रा. मो. दा. देशमुख एखादी कल्पना मुलांपुढे ठेवत आणि मग मुलं आपल्या कल्पनाशक्तीप्रमाणं रंगवीत असत, वठवीत असत. मालक आणि मालकीण घराबाहेर गेल्यानंतर वेंधळा नोकर सांगितलेली सर्व कामे अगदी उलटी करून ठेवून घरात आलेल्या पाहुण्यांची कशी त्रेधा तिरपीट उडवून देतो, हे धमाल समयस्फूर्त नाटच स्वाती सरोदे, दीप्ती कावळे, मधुमती सुपे, मनीषा गंधे, जया खडसे, सीमा ह्या बाल-कलाकारांनी फक्कड वठविले. त्यातला स्वाती सरोदेचा महाकल्पक आणि बडबड्या नोकर विशेष उल्लेखनीय. दीप्ती कावळेची मालकीणही प्रशंसनीय अशी बरीच सुरेख, समय स्फूर्त–नाटचं मो. दा. नी येथे घडविली.

अनेक बालक लिचडे ह्या अंधशिक्षकाभोवती गोळा होऊन अवघ्या ६ टिंबांच्या स्पर्शज्ञानावर जगातल्या वाटेल त्या भाषेत पाहिजे ती गोष्ट अभिव्यक्त करू शकणाऱ्या ब्रेल लिपीची सप्रमाण ओळख करून घेत होती.

सगळयात जास्त अस्पर्श राहिले ते 'शब्द-दालन'. एखादा दुसरा भावी शब्द प्रभू काही कागदावर खरडायचा. बहुतेक आजवर पाठ झालेली गाणी, ऐकलेल्या गोष्टीच शब्दबद्ध केल्या जात. काहींनी मात्र आपलं मनोगतही व्यक्त केलेलं. 'इथे आल्यास आपल्याला चांगल्या सवई लागतात...आंधळे कपडे कसे विणतात ते पाहिलं. खूप आश्चर्य वाटलं !' उपेन्द्र निवासकरची ही बोलकी कॉमेंट !

'खण खण कुदळी, मन मन माती, इंग्रजांनी राज्य घेतलं मध्यरात्री'...कु. छाया पटेलची कविता. बहुतांश वेळ शब्द-शिक्षिका आणि सहाय्यक शुभदा देशमुख मात्र जांभया मोजतानाच आढळत होत्या.

'डमी बँक' 'खुले वाचनालय' 'संगीत कक्ष' ह्या दालनात मात्र बालकं आपली भरगच्च उपस्थिती लावून जात. जलतरंग, बासरी, पिआनो, इलेक्ट्रॉनिक हार्मोनियम, बोंगो, ढोलकी इत्यादी खूप अगदी फुटेपर्यंत बडवली, वाजवली गेलीत.

एकूणच हा मुक्त अभिव्यक्तीचा, शिक्षणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनातच क्रांतिकारक परिवर्तन करणारा एक अभिनव प्रयोग खूपच लोकप्रिय ठरला, सफल झाला. हे बाल–मेळाव्याचं खास कॉन्ट्रिब्यूशन.

रोज रात्री अशोक कुरतडकर आणि राजकुमारी कश्यप ह्यांच्या संयोजनाखाली मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम होत असे. त्यात शरद मुठे ह्या अ-बालक कलाकाराची खूपच डिमांड. 'आमच्या गल्लीतला बंडू, पेपर सोडवुनी आला' आणि 'मी आलो, मी आलो, रंगात रंग मिसळाया...' ह्या गाण्यांनी पोरांना पार वेडं करून सोडलं; परंतु प्रामुख्याने बालकांचाच कलाविष्कार आणि प्रतिभाविष्कार ह्या स्टेजवर होत असे. नवयुग विद्यालय नागपूरच्या 'झेल्या' नाटकातली झेल्याची भूमिका अभय तेलंगने खूपच गाजवली. जयश्री देशपांडेचं भाजीवालीचं नृत्य आणि जीवन विकास विद्यालयाचं कोळीगीतही लोकप्रिय ठरली. इतरही अनेक कार्यक्रमांनी प्रेक्षकांच्या खूप टाळ्या घेतल्या. वरोऱ्या गावाहून एवढ्या गारठ्यात बहुसंख्येने प्रेक्षक ह्या कार्यक्रमास आवर्जून येत.

श्री. चिंचाळकर ह्या अत्यंत प्रतिभाशाली प्राध्यापकाची, कलाकाराची मूळाक्षरांमधून अनेक प्रकारचे प्राणी, आकृती निव्वळ कल्पनाशक्तीच्या आधारावर निर्माण करण्याचे अपूर्व प्रात्यक्षिक खूप काही शिकवून

गले. श्री. मोनेंचा 'तारांगणदर्शन' हा चांदण्या रात्रीतला सौरमंडळाची ओळख करून देणारा दोन तासांचा कार्यक्रम म्हणजे शिक्षकांसाठी आणि आमच्यासाठी अभूतपूर्व मेजवानीच होती.

मामासाहेब क्षीरसागरांनी बाबा आमटे आणि साधनाताईंचीच गोष्ट सांगून तर सुप्रसिद्ध 'फास्टर फेणे' कार भा. रा. भागवतांनी एक विज्ञानकथा ऐकवून कथाकथनाच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमात खास रंगत आणली.

अरुण देशपांडेचा 'सूर्य टोपलीत' सौरशक्तीवर शिजणारा भात बालकांच्या खास कुतूहलाचा आणि चवीचा विषय होता. त्याचे सारे 'सौर ऊर्जेचे प्रयोग', 'पाण्यावर चालणारे घड्याळ' चौकसपणे पाहण्याचे विषय ठरले होते. 'कागदी विमानांचे' 'अेअरो मॉडेलिंगचे' त्याचे दालन विमान बनविणे आणि उडविणे शिकण्यासाठी सदा गच्च भरलेले असे.

दिलीप भंडारे आणि चंद्रकांत शहा ह्यांच्या कल्पक आणि परिश्रमपूर्ण संयोजनानं 'बाल आनंदमेळाव्याचं' स्वरूप अत्याकर्षक करून ठेवलेलं. मिसेस लाडखेडकरांचे ड्रिलचे प्रातःकालीन वर्गही लोकांना आवडले. हरिभाऊ बारपुत्यांच्या विविधांगी खेळांनी मुलांच्या सळसळत्या रक्तास खूपच उधाण आणले होते.

सर्वच कार्यक्रमांत अपंग शाळेतील आनंदवनातले विद्यार्थी तीनही दिवस इतर पाहुण्या बालकांसमवेत सहभागी होत असत, हे निश्चितच आगळे वैशिष्टच होते.

चंद्रकांत शहा, शरद मुठेंची कोरस गाणी, प्रतिभेला धुमारे फुटविणारी 'मुक्त अभिव्यक्ती', कथाकथन आणि अपंगांनाही कबड्डी खेळायला लावणारे हरिभाऊ बारपुत्यांचे खेळ हा बाल आनंदमेळाव्याचा आत्मा होता.

तीन दिवस अपूर्व धुंद सहजीवन उपभोगल्यानंतर ह्या अविस्मरणीय बाल आनंदमेळाव्यातून परतताना बालकांच्या ओठांवर शरद मुठेंनी शिकविलेल्या समूहगीताचेच सूर रेंगाळत होते...

हे दणकट माझे बाहू। हे मजबूत दोन्ही पाय। असती ही निधडी छाती। सांगाया धरतीवरती।

.. अशक्य हा शब्द ना मज माहीत... ॥

—श्याम मानव

रंगभूमी

# घालीन लोटांगण

## ठोकळेबाजपणातून न सुटलेला फार्स

शिरीष सहस्रबुद्धे

श्रीनिवास भणगे हे लेखक-दिग्दर्शकाचं नाव हौशी रंगभूमीवर गाजलेलं आहे आणि व्यावसायिक रंगमंचावर ताजं आहे, एवढ्या कारणासाठी तुम्ही 'घालीन लोटांगण'बद्दल काही खास अपेक्षा बाळगाल तर निराशा पदरी पडेल. 'वरद रंगभूमी' या पुण्यातल्याच, (बहुधा) नव्या संस्थेनं दिलेलं हे नाटक म्हणजे फार्सचं जे उदंड वेडं पीक सध्या आपल्याकडे आलंय्, त्याचाच एक भाग आहे. फार्सला जायचं झालं म्हणजे आज-काल फार भीती वाटायला लागली आहे. वस्तुतः माझा आणि माझ्यासारख्या अनेक सर्वसामान्य रसिकांचा हा आवडता नाटचप्रकार; पण त्याला आज वाढीव संख्येच्या पार्श्वभूमीवरही जी गुणात्मक अवकळा प्राप्त झाली आहे, ती पुन्हा पुन्हा जाऊन अनुभवणं फार त्रासदायक होतं. फार्सचा प्राण चांगला विनोद, सकस विनोद हा तर मराठी रंगमंचावरून लुप्तच होऊन जाणार की काय, अशी धास्ती वाटण्यासारखे दिवस आले आहेत. प्रसंगनिष्ठ– परिस्थितिनिष्ठ विनोद, वैविध्यपूर्ण मानवी स्वभावांच्या आंतरक्रियेतून निर्माण होणारा विनोद, तुमच्या-आमच्या आयुष्यातल्या लहान-मोठ्या विसंगतींवर, वागण्यातल्या मूर्खपणावर, सामाजिक जीवनातल्या हास्यास्पद घटना/प्रवृत्तींवर हसत खेळत बोट ठेवणारा विनोद हा आमच्या नाटककारांनी वर्ज्य का ठरवावा ? आज अधिराज्य आहे, ते शब्दनिष्ठ विनोदाचं. (तोही विनोदाचा एक सन्मान्य प्रकारच आहे. पण–) आज-कालच्या बहुसंख्य फार्सेसमधला शब्दनिष्ठ विनोद हा चावट द्वयर्थी शब्दयोजनेतून थोडक्यात, कमी-अधिक प्रमाणात लैंगिक संदर्भातून व तदनुषंगिक कृती–हालचालींतून निर्माण होणारा असतो व त्याचा अतिरेक किंवा पुनरावृत्ती यामुळे हसू येण्याऐवजी चीड येते.

फार्समधल्या विनोदाच्या तोचतोचपणाबरोबरच फार्सचा म्हणून जो साचा तयार झाला आहे, तोही चिंताजनक आहे. फार्समध्ये हल्ली विविधतापूर्ण विनोदकारक स्थिती ( farcical situations ) क्वचितच दिसतात. एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा वस्तूबद्दल पात्रांचे होणारे गैरसमज व त्यातून उद्भवणारे ठराविक प्रकारचे घोटाळे असा साचेबंदपणा इतका बोकाळला आहे की, नाटक सुरू झाल्यापासून पंधराएक मिनिटांतच, त्याच्या पुढच्या वाटचालीचं चित्र अनुभवी प्रेक्षकांच्या नजरेसमोर उभं रहावं. या कारणांमुळेच फार्स म्हणजे शाब्दिक व शारीरिक कसरतींनी संयुक्त झालेले आचरट घोटाळे, असं समीकरण व्हायला लागलं आहे.

'घालीन लोटांगण' हा फार्स काही थोडे चांगले विनोद/विनोदी प्रसंग सोडता वरील साच्यापासून बिलकूल दूर जाणारा नाही आणि तेच त्याच्या अपयशाचे प्रमुख कारण आहे. फार्समध्ये हमखास दिसणारी बरीचशी साधनसामुग्री श्री. भणगे यांनी बिनचूक जमा करून आणली आहे. नाटकातल्या शांता या पात्राचेच उदाहरण घ्या. नवऱ्याला व मुलाला करड्या धाकात ठेवणाऱ्या अतिकजाग व फटकळ बाईचं हे पात्र आहे. अशी पात्रं व त्यांच्या खाष्टपणातून निर्माण होणारा विनोद आम्ही किती काळ आणि का म्हणून सहन करायचा ? (आठवा: 'दिनूच्या सासूबाई राधाबाई'पासून 'घरोघरी हीच बोंब'पर्यंतचे कित्येक फार्स आणि श्रीमती मनोरमा वागळे, लता थत्ते, आशा भेंडे इत्यादी महिलांनी सजविलेल्या त्राटिका !) कौटुंबिक जिव्हाळ्याच्या 'जुडी'छाप नाटकात जसं ताई/माई/आई/वहिनी अशासारखं एखादं त्यागमूर्ती पात्र असावंच लागतं, तसंच अढळपद फार्समध्ये या त्राटिकांना प्राप्त व्हायला लागलेलं आहे आणि फार्समधला हा ठोकळेबाजपणा अधिकच चिंताजनक आहे, कारण त्याच त्या कारणानं माणूस कदाचित रडू शकेल (अवघडच तेही, पण) त्या त्या कारणानं हसणं कसं शक्य आहे ?

ह्या नाटकाचं कथानक श्री. भणगे यांना स्वतःच्या किंवा अन्य कुणाच्या एखाद्या जुन्या कथा-कल्पनेवरून स्फुरलेलं आहे किंवा कसं, याची कल्पना नाही. तसा कुठे उल्लेखही नाही; पण एकंदर कथावस्तू मला

चांगलीच परिचयाची वाटली खरी. कदाचित यातली पात्रं व प्रसंग यासारखंच काहीबाही याआधी ठिकठिकाणी पाहिल्यानं असं झालं असेल. बाबासाहेब या श्रीमंत सुखवस्तू गृहस्थांच्या बंगल्यात राहणारे, त्यांच्या निरुद्योगी वकील पुतण्याचे (अप्पा) कुटंब हे सर्व घटनांचं केन्द्रस्थान. अप्पांच्या मुलाचं (श्याम) विद्युत देव नावाच्या मुलीवर प्रेम. आपल्या लग्नाला परवानगी मिळावी यासाठी श्याम व कजाग बायकोच्या छळातून सुटका करून घेण्यासाठी अप्पा, एकत्र येऊन शांताबाईंना थाप मारतात की, अप्पा आणि माया साने नावाच्या कुण्या अज्ञात. (किंबहुना काल्पनिक) स्त्रीचं लफडं वगैरे आहे. मग नवरा हातून जाऊ नये यासाठी त्राटिकादेवी एकदम गोगलगायीचा अवतार धारण करतात. दरम्यान बाबासाहेबांच्या 'यूथ क्लबा'तली माया साने याच नावाची एक तरुणी त्यांच्या आग्रहानुसार आपलं संशोधन पूर्ण करण्यासाठी घरात येऊन दाखल होते. साहजिकच बाप-लेकांची घबराट. मग ते तिला विद्युत देव या नावाखाली वावरायला लावतात. शिवाय माया साने याच नावाची कुणी स्त्री चोर गावात वावरत असल्याची बातमी येते. त्यामुळेही पुन्हा घबराट. खरी विद्युत व खोटी विद्युत यांच्यातला घोटाळा. चोर माया साने व साव माया साने यांच्याबाबतीत शेवटपर्यंत पुरेसे स्पष्ट न होणारे गैरसमज वगैरे मालमसाला आहे. (नाटकाचा शेवट वृत्तपत्रांतून जाहीर होऊ नये अशी संबंधितांची इच्छा असल्याची सूचना एका पत्रकार मित्राकडून मिळाली आहे. अशा नाटकाच्या शेवटाविषयी, बाकीचे कथानक कळल्यानंतरही लोकांची उत्कंठा कायम राहील असं वाटणाऱ्याच्या आशावादाचं मला इतकं कौतुक वाटतं की, ती सूचना मी पाळणार आहे.) असो.

लेखक म्हणून श्रीनिवास भणगे यांच्या कामगिरीबद्दल अनुकूल मुद्दा एवढाच म्हणता येईल की, फार्सच्या (मागे उल्लेख केलेल्या) साच्यात व्यवस्थित बसेल असा घटनांचा अन्वय त्यांनी चोख लावला आहे. पार्श्वभूमी, गुंतागुंतीची सुरुवात (पहिला अंक), गुंत्याचे अत्युच्च टोक गाठले जाणे (दुसरा अंक) व सावकाशपणे त्याची उकल (तिसरा अंक) अशा तऱ्हेची मांडणी ठीकठाक केली गेली आहे. तसंच, मागे म्हटल्याप्रमाणे काही बरे विनोद व विनोदी तुकडे यांचंही श्रेय त्यांना मिळायला हवं. फार्समधील चावटपणाचं 'लायसन्स' त्यांनी अवाजवी ताणलेलं नाही, हीही समाधानाची बाब. अर्थात तरीही लेखक म्हणून ते सर्वसाधारणतः यशस्वी ठरले आहेत, असं म्हणता येणार नाही. एक तर मोजक्या, चांगल्या विनोदाच्या काही पट संख्येचे सुमार विनोद त्यांच्या खाती जमा होतात, ज्यात 'हे म्हणजे मात्र अगदी टू मच हं,' यासारख्या वाक्यांचा आणि 'इथं भेटलात, तिथे भेटू नका,' अशा ख्रिस्तपूर्व काळातील प्रेमळ विनोदांचा समावेश होतो. दुसऱ्या अंकात शांतादेवी 'हसायला काय झालं? इथं कुणी नागवं नाचतंय् का?' असा एक प्रश्न काहीसा अचानकच विचारतात. हा विनोदी म्हणून घातला असल्यास तो अत्यंत संदर्भहीन, अकारण व अतएव अभिरुचिहीन वाटतो, एवढंच म्हणता येईल. किंबहुना शांतादेवी हे कजाग पात्र विनोदासाठी वापरताना श्री. भणगे यांनी अनेकवार अभिरुची सोडली आहे, हे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. ही बाई आपल्या नवऱ्याचा उल्लेख 'लाडका व्यंकू' म्हणून (शिवी दिल्यासारखा) करते. 'त्याच्या कानाखाली जाळ काढीन' अशा धमक्या देते आणि 'तो तिकडं डुकरासारखा शेण खातोय्' या भाषेत त्याच्या भानगडीचा उल्लेख करते. अशी पात्रं आणि असे प्रसंग वास्तवात असतात, असू शकतील. त्यांचं विनोदासाठी केलेलं स्टेजवरचं भडक प्रदर्शन आनंददायक वाटत नाही, नाटकाच्या वर्गीय चौकटीशीही त्याचा सांधा कुठे जुळत नाही. अप्पा हे पात्रही लेखकानं असंच अतिरेकी रंगवलं आहे, तर बाबासाहेब हे पात्र एकसुरी करून जवळजवळ वाया घालवलं आहे.

दिग्दर्शक म्हणून श्री भणगे यांची कामगिरी काही खास नाही. अप्पा व शांता ही त्यांची पात्रं सदैव ज्या कर्कश आवाजात तारस्वरानं बोलतात, ते अनेकदा असह्य होतं. ती दोघंही दोन-तीनदा भेसूर आवाजात ढसढसा रडतात तेव्हा एक तर स्टेजवर धावून जावं किंवा प्रेक्षागृहाबाहेर पळून जावं असं वाटायला लागतं. माया सानेचं पत्र आल्यानंतर 'श्यामच्या आई'चा आक्रस्ताळा अभिनय आणि स्टॉपरलाइटची तीच ती युक्ती हा बटबटीत प्रसंग त्यांच्या दिग्दर्शनाच्या मर्यादा स्पष्ट करतो. त्यांनी बसवलेला तिसरा अंक तर सर्कस आणि फ्रीस्टाइल यांच्या मिश्रणापासून बनतो, तर माया साने (सरला येवलेकर) यांना दिग्दर्शनाचा लाभ (बहुधा) मिळालेला दिसत नाही. सतत माना वेळावणारी, केस-पदर सावरत राहणारी आणि लाडिक बोलूनही एकंदर घटनेतून पूर्णतः अलिप्त राहणारी ही माया मानसशास्त्राची संशोधक न वाटता Case वाटते. विद्युत देव (सीमा टिपणीस) व बाबासाहेब (अविनाश देशमुख) ही दुय्यम पात्रेच त्यातल्या त्यात ठीक वाटतात. श्रीनिवास भणगे व चित्तरंजन कोल्हटकर यांनी अनुक्रमे श्याम व इन्स्पेक्टरच्या भूमिकांत, डोळे फिरवणे, चेहरा वेडावाकडा करणे आणि अन्य शारीरिक क्लृप्त्यांवरच भर द्यावा हे अत्यंत खेदजनक आहे–बाबा वैशंपायन यांच्यासारख्या अनुभवी नटाची नक्कल नीट पाठ नसण्याइतकेच! □

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# स्वर्ग-नरक

निर्माता बी. नागी रेड्डी हे नाव वाचताच एक श्रुतिस्मृतिपुराणोक्त–ऐतिहासिक–अद्ययावत–कौटुंबिक–रहस्यप्रधान–विनोदी–करुणरसभरित चित्रचिवडा खायला मिळणार, याचा अंदाज आला. नागीरेड्डी छाप असलेल्या घर घर की कहानी, नन्हा फरिश्ता ज्यूली इत्यादी पुराण्या उत्पादनांची चव तोंडावर रेंगाळू लागून पोटात सुंदर मळमळू लागले. तरीही संजीवकुमार व तनुजा ही दोन नावे डोळ्यांपुढे ठेवून या नव्या उत्पादनाची चव घेण्याचा हिय्या केला आणि 'स्वर्ग-नरक' चा पहिला घास तोंडात टाकला.

दोन जिवलग मैत्रिणी; पण दोघींचे स्वभाव मात्र अत्यंत भिन्न. एक शालीन, सोज्वळ वगैरे वगैरे तर दुसरी नटखट, शोख वगैरे वगैरे, भरीला भयंकर संशयी. (इथेच सगळा प्लॉट ध्यानी येतो.) तर पहिलीला म्हणजे गीताला (शबाना आझमी) अगदी उलट प्रकृतीचा पती मिळतो. विनोद (विनोद मेहरा) शराबी, बऱ्याच बाज्या असणारा, तर दुसरीला म्हणजे शोभाला (मौशमी चटर्जी) प्राध्यापक, तरी समंजस, खेळकर, उमदा असलेला नवरा मिळतो. प्रा. मोहन कपूर उर्फ मिकी (जितेंद्र). पुढे 'याला जीवन ऐसे नाव' असलेले जीवन बदलते. विनोद सन्मार्गाला लागतो. शोभाच्या संशयी स्वभावामुळे तिचा संसार उध्वस्त व्हायला येतो; पण राधाच्या (तनुजा ही शोभाच्या निरर्थक संशयाला कारणीभूत) आत्महत्येमुळे शोभाचे डोळे उघडतात आणि मग नेहमीचाच शेवट.

तर ही कथा अन् हे कलावंत हा स्वर्ग-नरकचा कच्चा माल कथा व दिग्दर्शन या दोन्ही चुली दसरी नारायणराव यांनी फुकल्या आहेत. नेमकी किती आच दिली म्हणजे पदार्थ जळत नाही वा कच्चा राहात नाही, एवढीच गोष्ट या आचारीसाहेबांना समजलेली नाही त्यामुळे ते एखाद्या गोष्टीच्या मागे लागले की पार पिच्छाच पुरवतात– 'एक ती राहील वा मी राहीन' अशा कृतनिश्चयाने. मागे ते (चित्रपटसृष्टीच्या अशाच निश्चयाने लागले असावेत ) आता चित्रपटात पहिल्यापासून ते प्रतीकात्मकतेच्या (म्हणजे ज्या ठिकाणी 'डायरेक्शन SS' म्हणून मोठ्यांदा आरोळी मारावीशी वाटते अशा ठिकाणांच्या) मागे लागले आहेत आणि शेवटापर्यंत हा प्रांत त्यांनी पार निर्वीर मर्वीतलम् करून टाकला. ही घ्या त्यांच्या प्रतीकात्मकतेची उदाहरणे.

१। गीता व शोभा यांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या स्थितीत जो फरक असतो, त्याचे प्रतीक त्यांचे घरनंबर. एकीचा घरनंबर १४ तर दुसरीचा ४१

२) गीताच्या सासूबाई मृत्युशय्येवर पडलेल्या. शेजारची समईची फडफडती ज्योत त्यांच्या आता जातो का मग जातो, अशा जिवाचे प्रतीक.

३) शवटी चतुर इसाप वा विद्वान विष्णुशर्म्याप्रमाणे संपूर्ण चित्रपटाचे सार दसरीसाहेब प्रतोकातून समजावून देतात.

'म्हणजे आतापर्यंत तुम्ही जे काय पाहिलं ना, ते दुधाप्रमाणं आहे हो म्हणजे आता तुम्ही म्हणाल की, बुवा कसं ? तर असं की, दुधाचं कस असतं की, घरी आणल्यावर आपणं त्यात पाणी टाकतो. जेव्हा दूध तापत ठेवलेलं असतं तेव्हा या पाण्याची होते वाफ. जेव्हा सगळं पाणी निघून जातं तेव्हा दूध उतू जातं आणि आगीत पडतं. म्हणजे पुन्हा त्याच्यावर पाणी मारलं की ते पुन्हा गार होतं. तसं आहे हे म्हणजे आता तुम्ही म्हणाल की काय? तर ते हे की, पती-पत्नीच्या संसाररूपी दुधातील प्रेमरूपी पाण्याची जर संशयरूपी उष्णतेने वाफ झाली, तर तो संसार त्या आगीत होरपळून निघतो.'

तात्पर्य– गवळी आपल्याला पाणीदार दूध देतो, ते दूध झटकन् उतू जाऊ नये म्हणून.

प्रतीकात्मकतेमध्ये पुरेसे रणकंदन केल्यानंतर दसरीसाहेबांनी तलवारीचे टोक चित्रपटातील नाट्याकडे वळविले ते पार अतिनाट्य, भडकपणाच्या अटकेपलीकडे झेंडे नाचवूनच थांबले. त्यांच्या पराक्रमाचे हे उदाहरण पहा ना–

शोभाचा संशय विनाकारण इतका वाढतो, इतका वाढतो. इतका वाढतो की, कॉलेजातील अनोळखी मुलांपुढे ती आपल्या नवऱ्याबद्दल तारे पाजळते. हे सगळे लफडे 'वाढता वाढता वाढे' होत शेवटी राधाच्या आत्महत्येपाशी आणि मोहनच्या वेडापाशी येऊन थांबते. चित्रपटात सगळीकडेच असा प्रकार आहे– आपल्या उनाड मित्रांकडे चाललेल्या विनोदला त्याची आई म्हणते, 'तुला आज माझे प्रेत तुडवूनच जावे लागेल.' आणि तो गेल्यानंतर 'गेलासच शेवटी तू ठीक आहे, तू तुडवले नाहीस तरी मी प्रेत होऊन पडणारच !' असा चेहरा करून ती माता पाहता पाहता प्रेत होऊन पडते. नंतर मग पश्चात्तापदग्ध विनोद परततो. ( या ठिकाणी एकच छोटीशी भर घालायला पाहिजे होती. विनोद उलटा चालत येतो, मग सगळ्या घटना भराभर उलट्या घडत जाऊन त्याची आईही जिवंत होते. म्हणजे मग दुधात साखर पडली असती. )

थोडक्यात कथा आणि चित्रपटाची मांडणी अत्यंत खळखळाट झालेली आहे.

संपूर्ण चित्रपटामध्ये एकमेव गोष्ट दसरीसाहेबांच्या या विजयी तडाख्यातून वाचली. ती म्हणजे पं. सोहनलाल त्रिपाठी. कथेतील ही व्यक्तिरेखा, ती उभी करण्यासाठी घेतलेले प्रसंग आणि ती व्यक्तिरेखा साकारण्यासाठी केलेली निवड - संजीवकुमार, या सगळ्याच गोष्टी कशा कोण जाणे पण बाकी चित्रपटाच्या सर्व रसायनांपासून अलिप्त, त्यामुळेच चविष्ट राहिल्या हा हा म्हणता आपल्या शब्दांच्या, अभिनयाच्या जाळ्यात लोकांना अडकवून त्यांना हातोहात बनवणारा धर्त पं. त्रिपाठी, त्याचा मिष्किल निर्लज्जपणा, नाटकीपणा, 'finished' म्हणण्याची लकब, दुसऱ्याची प्रत्येक गोष्ट विशेषत: पैसे 'adjust' करून घेण्याची सवय आणि फक्त लोकांच्या टोप्या बदलण्याचा आणि त्यातून स्वत: कमिशन खाण्याचा धंदा– सगळेच केवळ भन्नाट ! थकलेले भाडे मागायला आलेल्या तणतण घरमालकाला शांत करून वर त्याच्याच घरी शातियज्ञ करण्याचे कबूल करून घेणारा व त्यासाठी त्याच्याकडूनच पैसे उकळणारा त्रिपाठी, थिएटरच्या मालकाची 'तुम्ही त्या अमुक अमुक नटासारखे दिसता' म्हणून तारीफ करून हाउसफुल्ल सिनेमाची तिकिटे मिळविणारा त्रिपाठी, दूधवाल्याच्या पोराचा दाखला आणून देण्यासाठी एका प्रिन्सिपॉलच्या बायकोचा माहेरकर बनणारा त्रिपाठी – या सगळ्याचा प्रसंगांमधून ती व्यक्तिरिखा सुरेख आकार घेते आणि संजीवकुमारने हा प्रत्येक आकार आपल्या अकृत्रिम अभिनयाने अत्यंत ठसठशीत बनविला आहे जणू काय या सगळ्या व्यक्तिरेखेला गालबोट लावण्यासाठीच शेवटी दसरीसाहेबांनी त्रिपाठीच्या तोंडी एक लंबेचवडे भाषण टाकून नवराबायकोची कर्तव्ये, संसार, प्रेम इत्यादी गोष्टी समजावून दिल्या आहेत.

बाकी पात्रांबद्दल म्हणजे –

मौशमी गोड दिसते, तनुजा बऱ्याच दिवसांनी पुन्हा पडद्यावर आल्यामुळे उगाचच तिचे छोटेसे काम चांगले वगैरे वाटते.

– एवढ्याच गोष्टी उल्लेखनीय.

चित्रपटाचे संगीत राजेश रोशनचे आहे. आशा व किशोरचे 'नहीं नहीं कोई तुमसा तुमसा हँसीं' हे गीत सुरेख. बाकी सगळा आनंद ! गीतकार आनंद बक्षी म्हणजे आणखी मोठा आनंद! सगळ्या गीतांचे चित्रण म्हणजे तर मोठा विनोदच आहे आपण गीतातील प्रत्येक शब्दाला न्याय दिलाच पाहिजे, अशा अट्टाहासाने प्रत्येक गीत चित्रित केले आहे उदाहरणार्थ – 'तुझ्या केसांचा रेशमी स्पर्श मला घेऊ दे' म्हटले की, लगेच प्रेमा नारायणाच्या केसांवरून चालणारा विनोद मेहरा, किंवा 'आग है लगी हुई' अशी ओळ आली की, लगेच मागे कडबा पेटून आग वगैरे लागलेली ( हा बहुधा राधाच्या प्रेताला दिलेला भडाग्नी असावा. ) आणि त्या पार्श्वभूमीवर गाणे गात जितेंद्र हिंडणार. 'I love you' आणि 'वासांसि जीर्णानि' हा एका गाण्यात कोंबलेला विरोधाभास म्हणजे तर प्रेक्षकावर सर्व बाजूंनी केलेला अत्याचार आहे. 'I love you' या हरींद्रनाथ चट्टोपाध्यायांच्या गीताला वापरलेला ख्रिस्टीन हा नवा आवाज एवढी एकच बाब, तीही केवळ नवी म्हणून उल्लेखनीय.

अर्थात आपल्याकडील प्रेक्षकाच्या भोळेपणाचा गैरफायदा घेऊन बरोबर भट्टी मांडून केलेले हे नवे बी. नागीरेड्डी उत्पादन पूर्वीच्या उत्पादनांप्रमाणेच रौप्यमहोत्सवी ठरणार, हे आताच्या गर्दीवरूनच ताबडतोब लक्षात येते. □